CMYK

सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | रविवार, दि.३ मे २०२६ | वर्ष – ४ थे | अंक १९ | पाने : ८ | किंमत रु. ६/– | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# पश्चिम बंगालमध्ये BJP सत्तेत आली तर शेअर बाजारात तेजी येणार ?

वृत्तसंस्था

**कोलकाता :** भाजपला पश्चिम बंगालमध्ये सत्ता मिळाल्यास भारतीय शेअर बाजारावर त्याचा सकारात्मक परिणाम होऊ शकतो, असा अंदाज बाजार विश्र्लेषकांकडून व्यक्त केला जात आहे. विशेषतः गुंतवणूकदारांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण होण्याची शक्यता असून अल्प काळात बाजारात तेजी पाहायला मिळू शकते.

ब्रोकरेज फर्म कोटक इन्स्टिट्यूशनल इक्विटीजने याबाबत विश्र्लेषण करताना म्हटले आहे की, पश्र्चिम बंगालमधील निवडणूक निकाल जर एक्झिट पोलप्रमाणे भारतीय जनता पक्षाच्या बाजूने लागले, तर ४ मे २०२६ नंतर भारतीय इक्विटी बाजार सकारात्मक प्रतिक्रिया देऊ शकतो. पश्र्चिम बंगालमध्ये भाजपला आघाडी मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात असताना आसाम, केरळ, तामिळनाडू आणि पुदुच्चेरीमध्ये विद्यमान सरकारे सत्तेत कायम राहू शकतात, असे संकेतही एक्झिट पोलमधून मिळत आहेत.




विश्र्लेषकांच्या मते, पश्र्चिम बंगालसारख्या मोठ्या राज्यात भाजपची सत्ता आल्यास केंद्र सरकारला आर्थिक आणि धोरणात्मक निर्णय अधिक वेगाने राबवण्यास मदत होऊ शकते. त्यामुळे गुंतवणूकदारांचा आत्मविश्र्वास वाढण्याची शक्यता आहे. याचा थेट परिणाम बँकिंग, पायाभूत सुविधा, ऊर्जा आणि औद्योगिक क्षेत्रातील शेअर्सवर होऊ शकतो.

मात्र, बाजारातील ही तेजी दीर्घकाळ टिकेलच असे नाही, असा इशाराही तज्ज्ञांनी दिला आहे. सध्या जागतिक स्तरावर कच्च्या तेलाच्या वाढत्या किंमती ही भारतासाठी मोठी चिंता आहे. त्यातच कमकुवत मान्सूनमुळे अन्नधान्य महागाई वाढण्याचा धोका आणि चालू खात्यातील तूट वाढण्याची शक्यता बाजारात दबाव निर्माण करू शकते. त्यामुळे निवडणूक निकालांमुळे आलेली तेजी काही काळानंतर कमी होऊ शकते.

याशिवाय, २०२७ च्या सुरुवातीपर्यंत कोणत्याही मोठ्या राज्याच्या निवडणुका नसल्यामुळे केंद्रातील राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारला जवळपास दहा महिन्यांचा 'इलेक्शन–फ्री' कालावधी मिळू शकतो. या काळात सरकार आर्थिक सुधारणा, ऊर्जा सबसिडीतील बदल आणि भारत–अमेरिका व्यापार करारासारख्या मोठ्या निर्णयांवर लक्ष केंद्रित करू शकते, असेही विश्र्लेषणात म्हटले आहे.शेअर बाजाराबाबत बोलायचे झाल्यास, तज्ज्ञांच्या मते बाजार काही काळ मर्यादित स्तरातच व्यवहार करु शकतो. निवडणुकीचा उत्साह ओसरल्यानंतर पुन्हा एकदा गुंतवणूकदारांचे लक्ष कंपन्यांचे निकाल, जागतिक अर्थव्यवस्था, तेलाच्या किंमती आणि महागाईवर असेल.दरम्यान, कॉर्पोरेट क्षेत्रातील वाढीबाबत मात्र सकारात्मक संकेत दिले जात आहेत. निफ्टी ५० कंपन्यांचा निव्वळ नफा आर्थिक वर्ष २०२७ मध्ये जवळपास १९ टक्क्यांनी वाढू शकतो, तर २०२८ मध्येही मजबूत वाढ कायम राहण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. त्यामुळे दीर्घकालीन गुंतवणूकदारांसाठी भारतीय बाजारात संधी कायम राहू शकते, असे मत बाजार तज्ज्ञ व्यक्त करत आहेत.

## मॉलची लिफ्ट पडली बंद

**नागपूर :** नागपूर शहरातील सीताबर्डी परिसरातील फॉर्च्यून मॉलमध्ये शुक्रवारी संध्याकाळी लिफ्ट बिघाडाची गंभीर घटना घडली. मॉलमधील एक लिफ्ट अचानक बंद पडल्याने त्यामध्ये अडकलेल्या पाच ते सहा नागरिकांना तब्बल २० ते २५ मिनिटे अडकून राहावे लागले. या कालावधीत लिफ्टमध्ये गुदमरल्यासारखी परिस्थिती निर्माण झाल्याने नागरिकांमध्ये भीती आणि संतापाचे वातावरण पसरले.

## उपमुख्यमंत्र्यांची जनगणना

**मुंबई :** उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी आज डिजिटल जनगणना प्रक्रियेत सहभाग नोंदवत स्वतःची जनगणना पूर्ण केली. देशातील १६ वी राष्ट्रीय जनगणना हा एक महत्त्वपूर्ण आणि ऐतिहासिक टप्पा ठरत असून, कालपासून स्व–गणना (डशश्रष एर्पीशीरींळेप) प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. विशेष म्हणजे, ही भारतातील पहिली डिजिटल जनगणना असल्यामुळे प्रत्येक नागरिकाचा सहभाग अत्यंत गरजेचा आहे.

## चिमुकलीच्या मृत्यूने संताप

**पुणे :** पुणे जिल्ह्यातील भोर गावात एका ४ वर्षीय चिमुरडीच्या मृत्यूमुळे एकच खळबळ उडाली आहे. पुणे–सातारा महामार्गावर संतप्त जमावाने शुक्रवारी रात्री वाहतूक कोंडी केल्याने वाहतूक कोंडी झाली. त्यात शनिवारी सकाळपासून नसरापूर गावात ठिय्या आंदोलन पुकारलं आहे. आमच्या गावात जे घडलं आहे त्यासाठी आम्हाला न्याय हवा असून आरोपीला फाशीची शिक्षा द्यावी अशी मागणी केली जात आहे.

## पुन्हा पीटीचा तास

**मुंबई :** राज्यातील शाळांमधील क्रीडा शिक्षणाला पुन्हा चालना मिळण्याची चिन्हे स्पष्ट झाली असून, दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या क्रीडा शिक्षकांच्या चार हजार ८६० पदांवर तातडीने भरती करण्याचे निर्देश शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी दिले आहेत. या निर्णयामुळे अनेक शाळांमध्ये थांबलेले 'पीटी'चे तास पुन्हा नियमित होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

## अर्थसंकल्प मंजूर

**मुंबई :** मुंबई महापालिकेच्या २०२६–२७च्या ८० हजार ९५२ कोटी रुपयांच्या अर्थसंकल्पाला महापालिका मुख्यालयातील सभागृहात गुरुवारी मध्यरात्री मंजुरी मिळाली. १२ दिवस आणि ९४ तास अशा विक्रमी वेळेत पार पडलेल्या अर्थसंकल्पीय चर्चेत २२७पैकी १८८ नगरसेवकांनी सहभाग घेतला आणि या अर्थसंकल्पीय चर्चेचा गुरुवारी मध्यरात्री १ वाजता समारोप झाला.

## 'गॅस'ला दरवाढीचा चटका

**मुंबई :** निवडणुकांची धामधूम संपल्यावर केंद्र सरकारने विविध इंधनदरांमध्ये मोठी वाढ केली आहे. व्यावसायिक वापराच्या १९ किलोच्या एलपीजी सिलिंडरची किंमत शुक्रवारपासून ९९३ रुपयांनी वाढवली गेली आहे. यामुळे हा सिलिंडर किरकोळ बाजारात मुंबईत ३,०२४ रुपयांना मिळेल. व्यावसायिक एलपीजीमधील ही आजवरची सर्वांत मोठी वाढ ठरली आहे.

## उष्णता कळस गाठणार

**मुंबई :** यंदाच्या मे महिन्यामध्ये महाराष्ट्र, गुजरातसह पूर्व किनारपट्टीवरील राज्ये, तसेच हिमालयाच्या पायथ्याशी उष्णतेच्या लाटा सरासरीहून अधिक जाणवण्याची शक्यता आहे. भारतीय हवामान विभागाने शुक्रवारी जारी केलेल्या मे महिन्यासाठीच्या अंदाजात ही माहिती देण्यात आली आहे.

## राज्यातील ५०० हून अधिक विद्यार्थ्यांचे निकाल रोखले

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर : माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने राज्यभरात चर्चेत राहिलेल्या चौसाळा, कन्नड प्रकरणातील ५०१ मुलाचे निकाल राखीव ठेवले आहेत. सामुदायिक कॉपी प्रकरणात कन्नड तालुक्यातील जैतापूर येथील राष्ट्रीय उच्च माध्यमिक विद्यालयातील १३० तर बीड जिल्ह्यातील चौसाळा कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयातील ३७१ विद्यार्थ्यांचा निकाल राखीव ठेवला आहे. तसेच उत्तरपत्रिका तपासणीत हस्ताक्षर बदल, पान फाडले अशी ४१ प्रकरणे समोर आली. त्या विद्यार्थ्यांचाही निकाल जाहीर करण्यात आला नाही.**

**बारावीच्या इंग्रजीच्या पेपरला बीड तालुक्यातील चौसाळा येथील परीक्षा केंद्राच्या आवारात व वर्गाच्या खिडक्यांच्या असापास लोकांची गर्दी केली असल्याचे ड्रोनने टिपलेले चित्रीकरण राज्यभर गाजले. यानंतर शिक्षण विभागाने गैरप्रकाराची पडताळणी केली असता वर्गामध्ये मास कॉपी करत असल्याचे व त्यांना पर्यवेक्षक, केंद्रसंचालक प्रत्यक्ष, अप्रत्यक्षपणे सहकार्य करत असल्याचे समोर आले होते. मंडळाने आज जाहीर केलेल्या निकालात या परीक्षा केंद्रावर पेपर देणाऱ्या सर्व ३७१ विद्यार्थ्यांचे निकाल राखीव ठेवले आहे.**

**तसेच छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात कन्नड तालुक्यातील जैतापूर येथील राष्ट्रीय उच्च माध्यमिक विद्यालयाला शिक्षणाधिकाऱ्यांनी इंग्रजी विषयाच्या पेपरला पहिल्याच दिवशी भेट दिली तेव्हा सामूहिक कॉपीचा प्रकार समोर आला होता.**

## बारावीचा निकाल जाहीर झाला पण टक्क्यांना लागलेली गळती कायम

तभा वृत्तसेवा

**मुंबई :** महाराष्ट्र उच्च माध्यमिक आणि महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने बारावीची परीक्षा दरवर्षी घेण्यात येते आणि यंदाच्या परीक्षेचा अखेर आज निकाल लागला आहे.



याच पार्श्र्वभूमीवर राज्य मंडळाचे अध्यक्ष त्रिगुण कुलकर्णी यांनी पत्रकार परिषद घेत १२ वीच्या निकालाबाबत माहिती दिली. त्रिगुण कुलकर्णी यांनी दिलेल्या माहितीनुसार यंदा राज्याचा निकाल ८९.७९टक्के लागला आहे, तर कोकण विभाग ९४.१४ टक्क्यांनी अव्वल स्थानावर आहे. तर लातूर विभागाचा निकाल तुलनेत कमी म्हणजे ८४.१४ टक्के इतका आहे.

फेब्रुवारी आणि मार्च महिन्यात बारावी परीक्षा १५३ विषयांचे परीक्षा घेण्यात आल्या, नऊ विभागीय मंडळातून एकूण १४ लाख ५८ हजार एवढ्या मुलांनी परीक्षा दिली. आज निकाल जाहीर होताच राज्याचा ८९.७९ टक्के इतका निकाल लागला. बारावीचा गेल्या वर्षीचा निकाल पहिला असता ९१.८८ टक्के निकाल लागला होता. यावर्षी सुद्धा मुलींनी बारावीच्या निकालात बाजी होती मुलींच्या निकालाची टक्केवारी ९४.५४ टक्के इतकी होती. तर मुलांची उत्तीर्ण होण्याची टक्केवारी ८९.५१ टक्के इतकी होती. निकाल घटण्यामागचे मुख्य कारण म्हणजे यावरही कॉपीमुक्त अभियान हे चांगल्या प्रक्रारे राबवले गेले असून गेल्या वर्षी एकही कर्मचाऱ्यावरती कारवाई केली जात नव्हती तर यावेळी तस न करता १०० जणांवर योग्य ती कारवाई करण्यात आली आहे. गेल्यावर्षी ९१.८८ निकाल होता तो यावर्षी २.० टक्क्याने घसरला आहे. सरकार तसेच बोर्डाकडून राबवल्या गेलेल्या या अभिनयामुळे टक्का जरी घसरला असला तरी कारवाई आणि कॉपी करण्याचे प्रमाण देखील घसरले आहे. यंदा टक्केवारी घसरली असली तरी, १२ विच्या निकालात यंदाही मुलींनीच बाजी मारली आहे. सर्व विभंगोय मंडळातून ९३.१५ टक्के मुली उत्तीर्ण झाल्या, तर ८६.८० टक्के मुलं उत्तीर्ण झाले आहे.

## घरगुती सिलेंडरच्या किंमतीतही वाढ

तभा वृत्तसेवा




**मुंबई :** गेल्या १५ वर्षांत घरगुती गॅस सिलेंडरच्या किंमतींमध्ये मोठी वाढ झाली असून त्या दुपटीहून अधिक झाल्या आहेत. आधीच महागाईचा भार सहन करणाऱ्या सर्वसामान्यांसाठी ही चिंतेची बाब ठरत आहे. गेल्या महिन्यात ६० रुपयांची वाढ झाल्यानंतर आता पुन्हा दरवाढ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. १ मे रोजी व्यावसायिक गॅस सिलेंडरच्या दरात तब्बल ९९३ रुपयांची वाढ करण्यात आली, ज्याचा थेट परिणाम हॉटेल आणि खानावळींच्या खर्चावर होण्याची शक्यता आहे. परिणामी, बाहेर जेवण महाग होण्याची शक्यता असून नोकरदार वर्ग आणि विद्यार्थ्यांच्या खर्चात वाढ होऊ शकते.

सूत्रांच्या माहितीनुसार, घरगुती एलपीजी सिलेंडरच्या दरात ४० ते ५० रुपयांची वाढ होऊ शकते. सध्या सिलेंडरचे दर आधीच १००० रुपयांच्या आसपास पोहोचले आहेत. अशा परिस्थितीत आणखी दरवाढ झाल्यास सर्वसामान्यांचे मासिक बजेट विस्कळीत होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.गॅस दरवाढीचा सर्वाधिक फटका गृहिणींना बसण्याची शक्यता आहे. वाढत्या खर्चामुळे अनेक कुटुंबांना पर्यायी उपायांचा विचार करावा लागू शकतो. काही ठिकाणी पारंपरिक चुलीचा वापर पुन्हा वाढेल का, असा प्रश्र्नही उपस्थित होत आहे.

## एअर इंडियाचा मोठा निर्णय!दररोज १००हून अधिक देशांतर्गत अन् आंतरराष्ट्रीय उड्डाणे रद्द करणार

वृत्तसंस्था

**नवी दिल्ली :** अमेरिका–इराण युद्ध चिघळून हवाई इंधनाचे दर वाढल्याने टाटा उद्योग समूहाच्या मालकीच्या एअर इंडियाने दररोज किमान १००विमान उड्डाणे रद्दकरण्याचा निर्णय शुक्रवारी जाहीर केला. आंतरराष्ट्रीय विमानांसाठीच्या इंधनाच्या (एटीएफ) किंमतीत झालेल्या मोठ्या वाढीमुळे भारतातील सर्वच प्रमुख विमान कंपन्यांना खर्च व महसूल यांचे गणित जुळवणे कठीण झाले आहे. अनेक मार्गांवर सेवा देणे एअर इंडियाला किफायतशीर राहिलेले नाही, हे यामागील प्रमुख कारण असल्याचे कंपनीचे म्हणणे आहे. एअर इंडियाच्या या निर्णयाचा देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय अशा दोन्ही सेवांवर परिणाम होणार हे स्पष्ट आहे. एअर इंडियाच्याउड्डाणांची सर्वांत मोठी कपात युरोप, उत्तर अमेरिका, ऑस्ट्रेलिया आणि सिंगापूर यांसारख्या लांब पल्ल्याच्या आंतरराष्ट्रीय हवाई मार्गांवर अपेक्षित आहे. या मार्गांवर विमान इंधनाचा वापर सर्वाधिक आहे आणि नफ्याचे गणित जुळवताना कंपनीवर सतत दबाव वाढत आहे. दिल्ली आणि मुंबईला लंडन, पॅरिस, न्यूयॉर्क, टोरोंटो, सॅन फ्रान्सिस्को, सिडनी आणि मेलबर्नशी जोडणाऱ्या प्रमुख मार्गांवरील उड्डाणांची संख्या यामुळे कमी होण्याची चिन्हे आहेत.सिंगापूरसारख्या जास्त मागणी असलेल्या ठिकाणच्या विमानांच्या फेऱ्यांमध्येही कपात होऊ शकते. जागतिक स्तरावर जेट इंधनाच्या किंमती मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. एअर इंडियाचा हा निर्णय याच पार्श्र्वभूमीवर घेण्यात आला आहे. एका आकडेवारीनुसारआखाती युद्धभडकल्यानंतर गेल्या काही आठवड्यांत एटीएफच्या सरासरी किंमतीत जवळपास ८० टक्क्यांनी वाढ झाली असून, त्यामुळे कार्यान्वयन खर्चात लक्षणीय वाढ झाली आहे. अलीकडेच इंडिगो, एअर इंडिया व जेट एअरवेजने केंद्र सरकारच्या हवाई उड्डाण मंत्रालयास पत्र लिहून कैफियत मांडली होती. आंतरराष्ट्रीय उड्डाणांच्या भाड्यात वाढ न केल्यास सेवा बंद कराव्या लागतील, असा इशाराही दिला होता.



## नवी मुंबईतून ४६ देशांमध्ये सुरू होणार विमानसेवा

तभा वृत्तसेवा

**नवी मुंबई :** देशांतर्गत उड्डाणाला मोठा प्रतिसाद मिळाल्यानंतर आता नवी मुंबई विमानतळावरून मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यापासून ४६ देशांमध्ये आंतरराष्ट्रीय विमानसेवा सुरू होणार आहे. त्याचबरोबर या विमानतळावरून देशातील प्रमुख शहरांमध्ये ३० नवीन देशांतर्गत मार्गांचाही विस्तार करण्यात आला आहे.या वेळापत्रकात ३० नवीन देशांतर्गत मार्ग जोडले गेले आहेत, जे भारतातील व्यावसायिक, पर्यटन आणि धार्मिक केंद्रांशी जोडतील. दिल्ली (९), गोवा (७), बंगळुरू (६) आणि कोचीन (५) कडे सर्वाधिक दैनंदिन उड्डाणे असतील. त्यानंतर हैदराबाद, कोलकाता, लखनऊ, वाराणसी आणि इंदूरचा क्रमांक लागतो.नवीन वेळापत्रकाच्या गरजेनुसार इंडिगो, आकासा एअर आणि एअर इंडिया एक्स्प्रेस या तीन भारतीय विमान कंपन्या विमानतळावरून अतिरिक्त उड्डाणे चालवतील, ही विमान उड्डाणे दर आठवड्याला १,०९२ इतकी भरण्याची अपेक्षा आहे,

## धोकादायक वळणावर भीषण अपघात सिमेंटच्या ट्रेलरखाली पिकअप चिरडली

तभा वृत्तसेवा

**रायगड : जिल्ह्यातील बोडणी घाटात आज सकाळी एक भीषण अपघात घडून एका मजुराचा मृत्यू झाला असून इतर काही जण जखमी झाले आहेत. घाटातील धोकादायक वळण पुन्हा एकदा जीवघेणे ठरल्याचे या अपघातातून स्पष्ट झाले आहे. सिमेंटने भरलेला अवजड ट्रेलर नियंत्रण सुटून पलटी झाल्याने खाली जात असलेल्या पिकअप वाहनावर कोसळला आणि पिकअपचा अक्षरशः चेंदामेंदा झाला.**



**मिळालेल्या माहितीनुसार, आंबा तोडणीसाठी काही मजूर पिकअपमधून घाटमार्गे निघाले होते. याच दरम्यान विरुद्ध दिशेने येणाऱ्या सिमेंट ट्रेलरचा चालक घाटातील तीव्र वळणावर वाहनावर नियंत्रण ठेवू शकला नाही. ट्रेलर अचानक घसरून पलटी झाला आणि त्याचा संपूर्ण भार पिकअपवर कोसळला. अपघात इतका भीषण होता की पिकअपचे मोठे नुकसान झाले आणि त्यात अडकलेल्या मजुरांना बाहेर काढण्यासाठी मोठी कसरत करावी लागली. घटनेची माहिती मिळताच स्थानिक ग्रामस्थ आणि पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. जखमींना बाहेर काढण्यासाठी स्थानिकांनी मोठ्या धाडसाने मदतकार्य सुरू केले. काही वेळातच रुग्णवाहिका दाखल होऊन जखमींना जवळच्या रुग्णालयात हलवण्यात आले. मात्र, एका मजुराचा जागीच मृत्यू झाला असल्याचे डॉक्टरांनी घोषित केले.**

**बोडणी घाटातील वळणांवर वारंवार अपघात होत असल्याने स्थानिकांमध्ये संतापाची भावना व्यक्त होत आहे. रस्त्यांची दुरवस्था, अपुरी सुरक्षा व्यवस्था आणि वेगावर नियंत्रण नसल्यामुळे असे अपघात घडत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या घाटात यापूर्वीही अनेक अपघात झाले असून प्रशासनाने अद्याप ठोस उपाययोजना न केल्याने नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे.**

## महाराष्ट्रात दर तासाला महिलांवर अत्याचार: रोहित पवार

तभा वृत्तसेवा

**पुणे :** भोर तालुक्यातील नसरापूर येथील चिमुकलीवर झालेला अत्याचार आणि तिच्या हत्येच्या निर्घृण घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. या प्रकरणातील पीडित कुटुंबाची भेट घेण्यासाठी आज आमदार रोहित पवार नसरापूर येथे पोहोचले होते. कुटुंबाचे सांत्वन केल्यानंतर माध्यमांशी बोलताना रोहित पवारांनी राज्यातील बिघडलेल्या कायदा–सुव्यवस्थेर भाष्य केले. राज्यात दर तासाला एका महिलेवर अत्याचार होतोय आणि गुन्हेगारांना पोलिसांचा धाक उरलेला नाही अशा शब्दांत त्यांनी सरकारवर टीका केली आहे. महाराष्ट्रात दिवसाला २४ अत्याचार घडत असून दरवर्षी ५० हजार महिलांवर अत्याचार होत असल्याची भीषण आकडेवारी त्यांनी माध्यमांसमोर मांडली. बीड, बदलापूर आणि बारामतीमधील अलीकडच्या घटनांचा दाखला देत त्यांनी सरकारवर निशाणा साधला.




नसरापूरच्या घटनेतील आरोपीबाबत धक्कादायक माहिती समोर आली आहे. हा नराधम यापूर्वीही दोनदा अशाच प्रकारच्या गुन्ह्यात पोलिसांच्या जाळ्यात अडकला होता. मात्र दोन्ही वेळेस तो जामिनावर बाहेर आला. दोन गुन्हे करूनही तिसरी घटना करण्याचे धाडस त्याच्यात येतेच कसे असा सवाल रोहित पवारांनी उपस्थित केला. हा नराधम पुन्हा बाहेर येणार असेल तर या कायद्याचा उपयोग काय अशी संतप्त भावना त्यांनी व्यक्त केली. राज्यात महिलांवरील अत्याचाराच्या घटना थांबवण्यासाठी महाविकास आघाडी सरकारने आणलेला 'शक्ती कायदा' सध्या केंद्राकडून परत आला आहे. सरकारने आता तातडीने विशेष अधिवेशन बोलवावे आणि हा कायदा लागू करण्यासाठी पावले उचलावीतअशी मागणी पवारांनी केलीआहे.रोहित पवार यांनी यावेळी सरकारकडे काही महत्त्वाच्या मागण्या केल्या. या प्रकरणाचा तपास जलदगतीने करून १५ दिवसांत चार्जशीट दाखल करावी आणि आरोपीला फाशीची शिक्षा द्यावी अशी आग्रही मागणी त्यांनी केली. पीडित मुलीच्या आईला सरकारने तातडीने आर्थिक मदत द्यावी आणि कुटुंबातील एका महिलेला शासकीय नोकरी देण्यात यावी असेही त्यांनीनमूदकेले. नुसत्या घोषणा न करता सरकारने आता ठोस कृती करण्याची वेळ आली असल्याचे सांगत त्यांनी प्रशासनाला धारेवर धरले. राजकारण बाजूला ठेवून महिलांच्या सुरक्षेसाठी सरकारने 'शक्ती' दाखवण्याची गरज असल्याचेमतत्यांनी यावेळी व्यक्त केले.



# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## आरटीई अंतर्गत फक्त ११९३ प्रवेश

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. २ मे :** आरटीई २५ टक्के प्रवेश लॉटरी पद्धतीने निवड झालेल्या २२६९ बालकांपैकी पहिल्या टप्प्यात केवळ ११९३ प्रवेश झाले असून, आणखी १०६८ प्रवेश शिल्लक असल्याचे स्पष्ट झाले आहे. प्रवेश घेण्यात पालकांकडून दिरंगाई होत असल्याने शिक्षण संचालकांनी ८ मेपर्यंत मुदतवाढ दिली आहे.

लातूर जिल्ह्यात इंग्रजी माध्यमाच्या २०७ शाळा असून, या शाळांमध्ये २५ टक्के आरटीईप्रमाणे २२६९ प्रवेश करायचे आहेत. गेल्या बारा दिवसांपासून प्रवेश प्रक्रिया सुरू असली तरी बऱ्याच पालकांकडे शिक्षण

विभागाचे कर्मचारी न पोहोचल्याने अनेकांनी प्राथमिक शिक्षण विभागाकडे गाऱ्हाणे केले. पालकांची ही अडचण ओळखून शिक्षण संचालकांनी ८ मेपर्यंत मुदवाढ दिली. आतापर्यंत २२६९ पैकी ११९३ प्रवेश झाले असून, ८ प्रवेश रद्द झाले आहेत. १०६८ प्रवेश आणखी व्हायचे आहेत. यासाठी आणखी आठ दिवसांची मुदत दिली असून, पालकांना मुदतवाढीमुळे दिलासा मिळाला आहे. प्राथमिक शिक्षण विभागाने पालकांना सहकार्य केल्यास प्रवेश लवकर होतील, अशी पालकांची अपेक्षा आहे.



## विविध वृत्त...

### बौद्ध साहित्य संमेलनाध्यक्षपदी प्रा.डॉ.प्रशांत गायकवाड



**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. २ मे :** दि. १० मे २०२६ रोजी भालचंद्र ब्लड बँक, लातूर या ठिकाणी होणाऱ्या दुसऱ्या बौद्ध साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी प्रा. डॉ.प्रशांत गायकवाड यांची निवड करण्यात आली आहे. संमेलनाचे उद्घाटन रोहित पिसाळ यांच्या हस्ते होणार आहे.

या संमेलनाच्या चर्चा सत्रामध्ये डॉ. नारायण कांबळे, डॉ.विजय गैबीमोरे, डॉ.गिरीश मोरे, अमित मेधावी यांच्यासह अनेक साहित्यिक उपस्थित राहणार आहेत. समारोपासाठी ज्येष्ठ आंबेडकरी नेते प्रा. सुकुमार कांबळे यांची उपस्थिती राहणार आहे. तरी या संमेलनास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन अध्यक्ष-चंद्रकांत शिंदे, कार्याध्यक्ष-राजेंद्र कांबळे, उपाध्यक्ष-भगवान लोखंडे, डी. एस.नरसिंगे, सचिव-यु.डी.गायकवाड, कोषाध्यक्ष - एम.एम.बलांडे, राजेंद्र बनसोडे, मुख्य निमंत्रक - ॲड.धम्मदिप बलांडे, रविंद्र राजेगावकर, शांतरक्षीत सुरवसे, डॉ.लहु वाघमारे, देवदत्त बनसोडे, अशोक बनसोडे, मारूती सरवदे, अलका गायकवाड, मंगलताई कांबळे, पल्लवी घोबाळे आदींनी केले आहे.

### लोकशाही दिन ४ मे रोजी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. २ मे :** प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. त्यानुसार मे महिन्यातील जिल्हास्तरीय लोकशाही दिन ४ मे २०२६ रोजी दुपारी १ वाजता लातूर येथील जिल्हाधिकारी कार्यालयात होणार असल्याचे जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत कळविण्यात आले.

### लॉर्ड श्रीकृष्णमध्ये निबंध स्पर्धा



**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. २ मे :** लातूर परिसरातील मातोश्री कलावती प्रतिष्ठान संचालित लॉर्ड श्रीकृष्ण इंग्लिश स्कुल मध्ये जलशक्ती पंधरवड्यानिमित्त निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. सर्व प्रथम शाळेतील विद्यार्थ्यांनी या उपक्रमाची सुरवात प्राचार्या रुपाली कुलकर्णी, शाळेचे समन्वयक रौफ शेख, शाळेच्या समन्वयिका रुपाली कोक टे, नम्रता झांबरे, प्रियांका नागलबोने, विद्या पाटील, संगीता शेटे, शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या उपस्थितीमध्ये जल शपथ घेऊन केली. शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी जलशक्ती पंधरवड्याच्या उपक्रमांतर्गत शाळेतर्फ घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धेत भाग घेतला. या स्पर्धेमधील विविध संकल्पना शाळेमध्ये राबवण्याचा मानस आहे असे शाळेच्या प्राचार्या रुपाली कुलकर्णी यांनी सांगितले. या स्पर्धेमध्ये सहभागी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष श्रीकृष्ण लाटे, कविता लाटे, शाळेच्या प्राचार्या रुपाली कुलकर्णी, पालक यांनी कौतुक केले. सदरील स्पर्धा यशस्वी करण्यासाठी शिक्षक, शिक्षिकांनी परिश्रम घेतले.

### सिग्नल टाईमिंग कमी करण्याची मागणी

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २ मे : वाढत्या उन्हामुळे वाहन चालकांची लाही-लाही होत आहे. त्यामुळे सिग्नल टाईमिंग कमी करण्याची मागणी वाहनधारकांकडून होत आहे.

# जिद्दीच्या वारशातून लातूर जिल्ह्याचा विकास साधूया : पालकमंत्री

## महाराष्ट्र राज्य स्थापना दिनी लातूर येथे राष्ट्रध्वज वंदन समारंभ उत्साहात



**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. २ मे :** भूकंपाच्या संकटाने हादरलेल्या लातूर जिल्ह्याने अत्यंत जिद्दीने स्वतःला पुन्हा उभे केले आणि आपली क्षमता सिद्ध केली. तोच जिद्दीचा वारसा पुढे नेत. आपण राज्याच्या विकास प्रक्रियेत्त लातूरचे नाव अग्रभागी नेऊया आणि जिल्ह्याचा सर्वांगीण विकास साधूया, असे आवाहन पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी आज येथे केले.

महाराष्ट्र राज्याच्या ६७ च्या स्थापना दिनानिमित्त बाभळगाव रोडवरील पोलीस मुख्यालय प्रांगणात मुख्य शासकीय राष्ट्रध्वज चंदन समारंभात पालकमंत्री श्री.. भोसले बोलत होते. या प्रसंगी जिल्हा परिषद अध्यक्षा उषा-ताई पाटील, प्रभारी जिल्हाधिकारी तथा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, पोलीस अधीक्षक अमोल तांबे, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त मानसी मीना यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी, पत्रकार आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते, पालकमंत्र्यांनी यावेळी सर्व जिल्हावासीयांना महाराष्ट्र दिन, कामगार दिन आणि बुद्ध पौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या.

संयुक्त महाराष्ट्रासाठी बलिदान दिलेल्या हुतात्म्यांना अभिवादन करून

आणि महापुरुषांच्या विचारांचे स्मरण करून पालकमंत्री श्री. भोसले म्हणाले, महाराष्ट्राने गेल्या ६६ वर्षांत तंत्रज्ञान, उद्योग आणि शेती क्षेत्रात मोठी प्रगती केली आहे. देशाला पाच ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था बनवण्याच्या पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या स्वप्नात महाराष्ट्र आघाडीवर राहील, असा विश्र्वास त्यांनी व्यक्त केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखाली लातूर जिल्ह्याचा विकास वेगाने होत असल्याचे त्यांनी सांगितले.

शेती विकास आणि जलसंधारणासाठी जिल्ह्यात जलयुक्त शिवार अभियान २.०, गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार अभियान राबविले जात आहे. मनरेगा आणि भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेतून गतवर्षी ७३० हेक्टरवर फळबाग लागवड करण्यात आली आहे. जिल्ह्यात मागील वर्षी पूर, अतिवृष्टीने शेतपिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना ९२८ कोटी २८ लाख रुपयांची मदत वितरीत करण्यात आली आहे, असे पालकमंत्री श्री. भोसले यावेळी म्हणाले.

प्रलंबित जिल्हा रुग्णालयाचा प्रश्न मार्गी लागला असून या रुग्णालयाचे नुकतेच

भूमिपूजन झाले आहे. लवकरच याठिकाणी ५०० खाटांचे सुसज्ज जिल्हा रुग्णालय उभे राहील. त्यामुळे आरोग्य सेवा अधिक बळकट होणार आहे. तसेच मुख्यमंत्री सहायता निधी आणि आयुष्मान भारत महात्मा ज्योतिचा फुले जनआरोग्य योजनेतून गरजू रुग्णांवर कोटचवधी रुपयांचे मोफत उपचार करण्यात आले आहेत. मुख्यमंत्री सहायता निधीतून मदत मिळविण्याची प्रक्रिया आता पूर्णपणे ऑनलाईन व अधिक गतिमान झाल्याने रुग्णांना मदत होणार असल्याचे पालकमंत्र्यांनी यावेळी नमूद केले.

सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत जिल्ह्यात आतापर्यंत ७ हजार

किलोमीटर रस्त्यांची कामे झाली आहेत. लातूर शहरासाठी ६० किलोमीटरचा रिंग रोड मंजूर असून, त्यासाठी ४८ किलोमीटर भूसंपादन पूर्ण झाले आहे. या मार्गाला राष्ट्रीय महामार्गाचा दर्जा मिळावा, यासाठी प्रस्ताव सादर केला आहे. आशियाई विकास बँकेच्या मदतीने जिल्ह्यात ८६ किलोमीटर रस्त्यांची कामे सुरू आहेत. अर्थसंकल्पात १४७ कोटी रुपयांची नवीन कामे मंजूर झाली आहेत, असे पालकमंत्री श्री. भोसले म्हणाले.

येणारा काळ हा कृत्रिम बुद्धिमत्तेचा आहे. भूकंपानंतर लातूरला पुन्हा उभे करणाऱ्या या मातीतील मुलांनी नव्या तंत्रज्ञानाचा स्वीकार करावा, लातूरचा विद्यार्थी नोकरी मागणारा नव्हे, तर नोकरी देणारा बनला पाहिजे, हेच आपले स्वप्न असल्याचे पालकमंत्र्यांनी यावेळी सांगितले. सध्या उन्हाळा अधिक तीव्र

आहे. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि कामगार बांधवांनी आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी. जिल्ह्यातील पाणी टंचाईसाठी २० कोटी ९६ लाख रुपयांचा आराखडा मंजूर केला आहे. सध्या २ टैंकर सुरु असून २५ विहीरींचे अधिग्रहण करण्यात आले आहे. यंदा एल निनोमुळे कमी पाऊस अपेक्षित आहे, त्यामुळे खरीप हंगामासाठी विशेष तयारी केली जात आहे. पाणी टंचाईचे संभाव्य संकट लक्षात घेवून नागरिकांनी उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करावा, असे आवाहन पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी केले. पालकमंत्री श्री. भोसले यांनी

यावेळी पोलीस परेडचे निरीक्षण केले. उपविभागीय अधिकारी अरविंद रायबोले यांनी पोलीस परेडचे नेतृत्व केले. पोलीस पथकांसह गृहरक्षक दल, राष्ट्रीय छा सेना, पोलीस बॅण्ड पथक, चान पथक, वज्र चाहन, बॉम्ब शोधक पथक, जलद प्रतिसाद पथक, रुग्णवाहिका यांच्यासह विविध शासकीय विभागांचे चित्ररथ या पथसंचलनात सहभागी झाले होते. यावेळी उपस्थित स्वातंत्र्यसैनिक, शहीद जवानांच्या वीरपत्नी, वीरमाता आणि वीरपिता यांची पालकमंत्री श्री. भोसले यांनी भेट घेऊन त्यांचा सत्कार केला आणि महाराष्ट्र राज्य स्थापना दिनाच्या शुभेच्छा दिल्या. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा यावेळी सन्मान करण्यात आला, तसेच जिल्हा युवा पुरस्कार, पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार, टॅलेंट सर्च परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांना यावेळी प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उद्धव फड यांनी केले.

## जीवनाला आकार देणाऱ्या शिक्षकांचे संस्कार, ज्ञान कायम जिवंत राहते : कराड

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. २ मे :** शिक्षक म्हणजे गुरु आणि गुरु म्हणजे विचार हा विचार कधीच सेवानिवृत्त होत नसतो तो विचार सातत्याने ज्वलंत राहणारा आहे. शिक्षक हे केवळ शिकवत नाही तर विद्यार्थ्यांच्या जीवनाला आकार देण्याचे काम करतात त्यांचे संस्कार आणि ज्ञान कायम जिवंत राहतात खऱ्या अर्थाने शिक्षक हे कधीच निवृत्त होत नाहीत तर ते कायम मार्गदर्शकाच्या भूमिकेतून कार्यरत राहणारे व्यक्तिमत्व आहे असे प्रतिपादन भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष ऋषिकेशदादा रमेशआप्पा कराड यांनी केले.

रेणापूर येथील रेणुका शिक्षण संस्थेच्या श्रीराम माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य सिद्धेश्र्वर मामडगे यांच्या सेवापूर्तीचा गौरव सोहळा शुक्रवार १ मे २०२६ रोजी मराठवाडा विभागाचे शिक्षक आ. विक्रम काळे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला याप्रसंगी ऋषिकेशदादा कराड हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी माजी आ. बब्रुवान खंदाडे, जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण सभापती सौ. शिवकन्याताई गोडभरले, पसं उपसभापती शरद दरेकर, रेणापुरचे प्रथम नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे, जेष्ठ मार्गदर्शक ओमप्रकाश गोडभरले, शिक्षण संस्थेचे अध्यक्ष देविदास कुटवाड, सचिव पंडितराव उगले, यांच्यासह इतर अनेकांची उपस्थिती होती.

शाळेत जाईपर्यंत आई-वडिल घडवतात आणि आयुष्याला दिशा देण्याचे काम शिक्षक करीत असतात. शिक्षण ही अखंड चालणारी प्रक्रिया असून शिक्षकांच्या गुरूंच्या मार्गदर्शनामुळेच अनेकांच्या जीवनात मोठे परिवर्तन घडले असे सांगून यावेळी बोलताना ऋषिकेशदादा कराड म्हणाले की, सिद्धेश्र्वर मामडगे यांनी शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या त्याचबरोबर संस्थेच्या प्रगतीत मोलाची कामगिरी केली असून आज जरी ते सेवानिवृत्त होत असले तरी उर्वरित आयुष्यातील वाटचालीचा समाजासाठी, कुटुंबासाठी आणि स्वतःसाठी नवा अध्याय सुरू करत आहेत. त्यांच्या अनुभवाचा आणि ज्ञानाचा प्रकाश सतत पसरत राहील त्यांच्या हातून या पुढील काळातही समाजाची सेवा घडो अशा सदिच्छा दिल्या.

गावचे सरपंच, चेअरमन, पतसंस्थेचे चेअरमन जिथे जाईल तिथे मिळालेल्या संधीच सोनं करण्याचा प्रयत्न विविध पुरस्कार प्राप्त सिद्धेश्र्वर मामडगे सरांनी केला असल्याचे उद्गगार काढून आ. विक्रम काळे म्हणाले की, हजारो विद्यार्थी घडविण्याचे काम त्यांच्या हातून झाले असून शिकून किती गेले यापेक्षा शिकलेले काय करतात हे महत्त्वाचे आहे. मामडगे सरांनी अत्यंत निष्ठेने कर्तव्य निभावले आहे. प्रत्येक कामात स्वतःला झोकून देऊन कार्य केले असल्याचे त्यांनी बोलून दाखवले. प्रारंभी अनिल कुटवाड यांनी आपल्या प्रास्ताविकातून सिद्धेश्र्वर मामडगे यांच्या कार्याचा आढावा दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वामी आणि शेवाळे यांनी केले. या कार्यक्रमास शैक्षणिक सामाजिक व इतर विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## 'स्व-गणना' सुविधेचा लाभ घेवून जनगणना प्रक्रियेत सहभाग नोंदवावा : पालकमंत्री




**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. २ मे :** देशाच्या भविष्यातील विकासाचे अचूक नियोजन करण्यासाठी जनगणना प्रक्रिया अत्यंत महत्वाची आहे. ही प्रक्रिया अधिक सुलभ आणि आधुनिक करण्यासाठी केंद्र सरकारने प्रथमच 'स्व-गणना' ही विशेष सुविधा उपलब्ध करून दिली आहे. या सुविधेचा लातूर जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घेऊन या प्रक्रियेत सहभागी होण्याचे आवाहन पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी केले आहे. त्यांच्या उपस्थितीत स्व-गणना मोहिमेला सुरुवात करण्यात आली.

१ मे ते १५ मे २०२६ या कालावधीत नागरिकांना घरबसल्या स्वतःच्या कुटुंबाची माहिती नोंदवता येणार आहे. यासाठी नागरिकांनी ाश.लशर्पीी.र्सी.ळप या अधिकृत पोर्टलवर जाऊन कुटुंब प्रमुखाच्या मोबाईल क्रमांकाद्वारे नोंदणी करणे आवश्यक आहे. एकदा माहिती यशस्वीरीत्या भरली की, नागरिकांना एक 'डए खऊ' प्राप्त होईल. १६ मे पासून जेव्हा शासकीय प्रगणक घरोघरी भेटी देतील, तेव्हा त्यांना केवळ हा 'आयडी' दाखवल्यास जनगणनेची प्रक्रिया तातडीने पूर्ण होईल. या सुविधेमुळे नागरिकांचा वेळ वाचणार असून माहितीमध्ये अचूकता राहण्यास मदत होणार आहे.

भारताची जनगणना २०२७: आता तुम्हीच करू शकता तुमची नोंदणी क्र. १२३४५६७८९०१ लातूर जनगणनेच्या या पहिल्या टप्प्यात मुख्यत्वे घरांची माहिती संकलित केली जाणार असून, दुसरा टप्पा २०२७ मध्ये पार पडेल. प्रशासनाकडून विचारल्या जाणाऱ्या प्रश्र्नांची नागरिकांनी अचूक उत्तरे द्यावीत आणि या राष्ट्रीय कार्यात प्रशासनाला पूर्ण सहकार्य करावे. आपली अचूक नोंदणी, हेच देशाच्या उज्ज्वल भविष्याचे नियोजन आहे, असे नमूद करत पालकमंत्र्यांनी स्व-गणना सुविधेचा लाभ घेण्याचे आवाहन केले.

## राजकुमार बेलुरे व विजय कुलकर्णी यांचा सेवागौरव सोहळा




**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २ मे :** येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयातील नाईक राजकुमार बेलुरे (४० वर्षे सेवा ) व सेवक विजय कुलकर्णी (३५ वर्षे सेवा ) हे आपल्या प्रदीर्घ आणि यशस्वी कारकीर्दीनंतर नियत वयोमानानुसार दि. ३० एप्रिल २०२६ रोजी सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त त्यांचा सेवागौरव सोहळा संपन्न करण्यात आला.

याप्रसंगी मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा केंद्रीय कार्यकारिणी सदस्य प्रवीण सरदेशमुख, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य संजय गुरव, स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष धनंजय तुंगीकर, शालेय समितीचे अध्यक्ष गंगाधर खेडकर, सत्कारमूर्ती राजकुमार बेलुरे व सुरेखा बेलुरे तसेच विजय कुलकर्णी व अनुराधा कुलकर्णी, विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती माता व भारत माता यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली.

याप्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे यांनी सत्कारमूर्तींनी केलेल्या कार्याविषयी माहिती सांगून, त्यांना सेवानिवृत्तीनंतरच्या भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.यावेळी स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष धनंजय तुंगीकर यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, शाळा सुरू झाल्यापासून ते संपेपर्यंत कार्य करणारे असे आजचे सत्कारमूर्ती आहेत. त्यांचे श्रम हे अमूल्य आहेत. त्यांचा असलेला जनसंपर्क, शाळेसाठी दिलेले योगदान, सर्व कामातील पारंगतता याबद्दल माहिती सांगितली.

याप्रसंगी केंद्रीय कार्यकारिणी सदस्य तथा कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रवीण सरदेशमुख यांनी अध्यक्षीय समारोपात सत्कारमूर्तींचे गुणवैशिष्ट्ये सांगताना असे सांगितले की, गृहसंपर्क असणारे, कर्तव्यनिष्ठ , प्रामाणिक व विद्यार्थीप्रिय व शिक्षकप्रिय असे सेवक आहेत त्यांनी संस्थेच्या उभारणीमध्ये रात्रंदिवस काम केले. सेवानिवृत्तीनंतरच्या काळात भारत भ्रमण करावे, चारधाम यात्रा करावी तसेच कुटुंबाला जास्तीत जास्त वेळ द्यावा अशी इच्छा व्यक्त करून त्यांना सेवानिवृत्तीच्या शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी विद्यालयाच्या वतीने सत्कारमूर्ती राजकुमार बेलुरे व विजय कुलकर्णी यांचा यथोचित सपत्नीक सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक,परिचय व स्वागत रंजना साकोळे यांनी केले. सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन दिपाली मुचाटे यांनी केले तर कांचन तोडकर यांच्या कल्याणमंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, केंद्रीय विद्यासभा संयोजक तथा उपमुख्याध्यापक महेश कस्तुरे, पर्यवेक्षक राजश्री कुलकर्णी, इंदू ठाकूर, अंजली निर्मळे, राम जोशी,धनंजय कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली अभ्यासपूरक मंडळ प्रमुख रेणुका गिरी, सहप्रमुख मीरा चामवाड, कार्यक्रम प्रमुख रंजना साकोळे, सहप्रमुख सुवर्णा कुलकर्णी , व्यवस्थेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## न्यू'वाले इंग्लिश स्कूल'चे यश

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२ मे :** स्थानिक अस्मिता फुटबॉल लीग २०२५-२६ अंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय फुटबॉल स्पर्धेत बसवणप्पा वाले न्यू इंग्लिश मीडियम स्कूल (खाडगाव रोड) च्या संघाने शानदार कामगिरी करत विजेतेपद पटकावले. संत तुकाराम नॅशनल मॉडेल स्कूल येथे २९ व ३० एप्रिल रोजी ही स्पर्धा पार पडली. यामध्ये शाळेच्या इयत्ता ९ वी व १० वीच्या संघाने आपल्य कौशल्याच्या जोरावर प्रथम क्रमांक पटकावून चषकावर नाव कोरले. या यशाबद्दल संस्थेचे सचिव मकरंद सावे, प्राचार्य भोगडे, उपप्राचार्य बाकलीकर व सुपरवायझर भारती यांनी खेळाडूंचे कौतुक केले. क्रीडा शिक्षक गणेश गिराम यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी हा विजय मिळवला.

## 'संघर्षयोद्धा राजा हरिश्चंद्र जाधव' पुस्तकाचे प्रकाशन



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २ मे :** हैदराबाद मुक्ती लढ्यातील थोर सैनिक राजा हरिश्र्चंद्र जाधव यांच्या जीवनावर आधारित 'हैदराबाद मुक्ती लढ्यातील संघर्षयोद्धा राजा हरिश्चंद्र जाधव' या पुस्तकाचे नुकतेच विमोचन माईर्स एमआयटी विश्वशांती विद्यापीठाचे संस्थापक प्रा. डॉ. विश्वनाथ कराड यांच्या हस्ते करण्यात आले.

ज्येष्ठ विधीज्ञ तथा सामाजिक कार्यकर्ते ॲड. बळवंत जाधव यांचे वडील राजा हरिश्चंद्र जाधव यांच्या जीवनातील सामाजिक व कौटुंबिक मागोवा या पुस्तकात घेण्यात आला आहे. डॉ. विवेक सौताडेकर या पुस्तकाचे लेखक व संपादक आहेत.

या पुस्तकाची प्रस्तावना प्रा. डॉ. विश्र्वनाथ कराड यांची असून, या पुस्तकात ॲड. कालिदास देशपांडे, प्रा. ॲड. बी. व्ही. मोतीपवळे, ॲड. व्यंकट बेद्रे, डॉ. हंसराज बाहेती, पत्रकार जयप्रकाश दगडे, गोपाळ कुलकर्णी तसेच वैभव सूर्यवंशी, शेख हबीब बशीर, एस. नजीर, श्रीहरी कांबळे, बी. एम कांबळे, अंकुश जाधव, ॲड. तेजस्वी जाधव, ॲड बळवंत जाधव आदींचे लेख आहेत. यावेळी उषामती कराड, ॲड. बळवंत जाधव, ॲड. मंचकराव डोणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

## संक्षिप्त वृत्त...

### महावितरण कंपनीच्या विरोधात पाथरीत नागरीकांचा मोर्चा : वारंवार खंडीत होणाऱ्या वीज पुरवठ्यामुळे नागरीक हैराण

**पाथरी,/प्रतिनिधी-** गेल्या काही दिवसांपासून वारंवार खंडीत होणाऱ्या वीज पुरवठ्याच्या निषेधार्थ पाथरीतील नागरीकांनी तेथील वीज वितरण कंपनीच्या उप अभियंत्यांच्या कार्यालयावर गुरुवारी मोठा मोर्चा काढला.

शहरातील बहुतांशी भागात गेल्या काही दिवसांपासून सातत्याने वीज पुरवठा खंडीत होतो आहे. प्रभाग क्रमांक ३ च्या कार्यक्षेत्रात सातत्यानेच तो प्रकार नागरीक अनुभवत आले आहेत. या भागातील वीज पुरवठा सुरळीत करावा, डीपीवरील भार कमी करावा, डि.पी.ची संख्या वाढवावी, डीपीची देखभाल दुरुस्ती ठेवावी यासह अन्य मागण्यांकरीता या भागातील नागरीकांनी सातत्याने पाठपुरावा केला, परंतु महावितरण कंपनीच्या अभियंत्यांनी त्याकडे कानाडोळा केल्या. त्यामुळे गुरुवारी शिवाजी नगर, शाहू नगर, नेताजी नगर, नगरपालिका कॉलनी, भिम नगर, गणेश नगर, व्हिआयपी कॉलनी, रशीद कॉलनी, ओंकार नगर, शिक्षक कॉलनी आदी भागातील संतप्त नागरीकांनी वीज वितरण कंपनीवर मोर्चा काढला. नगर पालिकेचे उपाध्यक्ष आलोक चौधरी, नगरसेविका चंद्रकला ढवळे यांनी या मोर्चाचे नेतृत्व केले. मोर्चात महिलांची संख्या लक्षणीय होती. संतप्त नागरीकांनी महावितरण कंपनीच्या कारभारावर टीकेचे झोड उठविले.

### गोदावरी नदीपात्रात तराफा उलटल्याने दोघांचा बुडून मृत्यू : मरडसगांव येथील दुर्देवी घटना : एकाचा शोध सुरुच

**पाथरी,/प्रतिनिधी :** तालुक्यातील मरडसगांव या ठिकाणी गुरुवारी सकाळी ११ वाजेच्या सुमारास गोदावरी नदीच्या पात्रात तराफा उलटल्याने दोघांचा बुडून मृत्यू झाला. यापैकी एका व्यक्तीचा मृतदेह हाती आला तर दुसऱ्या व्यक्तीचा मृतदेह रात्री उशीरापर्यंत शोधूनही हाती आला नाही.

मरडसगांव येथील ज्ञानोबा भाग्यवंत हे ७८ वर्षीय गृहस्थ एका सहकाऱ्यासह बोरगांव (ता.माजलगाव) येथून तराफ्याने गोदावरी नदीपात्र ओलांडून गावी परतत होते. त्यावेळी तराफा उलटल्याने ते दोघे पाण्यात बुडाले. तो प्रकार कळाल्या पाठोपाठ काहींनी तात्काळ नदीपात्रात उड्या मारुन शोधकार्य सुरु केले. त्यावेळी एका व्यक्तीचा मृतदेह हाती आला तर ७८ वर्षीय ज्ञानोबा भाग्यवंत यांचा मृतदेह शोधूनही सापडला नाही. महसूल व पोलिस प्रशासनास ही माहिती कळाल्याबरोबर त्यांनी धाव घेतली. एक बोटही मागविण्यात आली. त्याद्वारे त्या व्यक्तीस शोधण्याचे कार्य सुरु होते.

### नृसिंह पोखर्णीत 'नरहरी श्यामराज की जय'च्या जयघोषात श्री नृसिंह जन्मोत्सव सोहळा : हजारो भाविकांची उपस्थिती : आतषबाजी; ४० हजार लाडू प्रसादाचे वाटप

**परभणी,/प्रतिनिधी :** तालुक्यातील श्रीक्षेत्र पोखर्णी या तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी नृसिंह जन्मोत्सव सोहळा गुरुवारी सायंकाळी ६ वाजून ४२ मिनिटांनी हजारो भाविकांच्या साक्षीने व 'नरहरी श्यामराज की जय'च्या जयघोषात गुलालाची उधळण, ढोल-ताशांचा गजर आणि फटाक्यांच्या आतषबाजीसह साजरा करण्यात आला.

महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून तसेच इतर राज्यांतूनही भाविक मोठ्या संख्येने येथे दाखल झाले होते. सकाळपासूनच दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी उसळली होती. त्यामुळे मंदिर परिसराला यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते. श्रीक्षेत्र नृसिंह पोखर्णी हे महाराष्ट्रातील एक जाज्वल्य दैवत मानले जात असून अनेक कुटुंबांचे श्रद्धास्थान व कुलदैवत आहे. भाविकांची वाढती संख्या लक्षात घेता प्रशासनाकडून कडक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी, अधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ह.भ.प. अच्युत महाराज दस्तापुरकर यांच्या कीर्तनाने वातावरण भक्तिमय झाले. 'खांबावरील लाथ मारीली दुर्जने; स्तंभी नारायण प्रकटले' या ओळीवर कीर्तन रंगात आले असताना, सूर्यास्ताच्या क्षणी सायंकाळी ६ वाजून ४२ मिनिटांनी नृसिंह जन्माचा सोहळा साजरा करण्यात आला. यावेळी संपूर्ण परिसर 'नरहरी श्यामराज की जय'च्या जयघोषाने दुमदुमून गेला.

नृसिंह जन्मोत्सवानिमित्त नृसिंह संस्थानच्या वतीने भाविकांसाठी ४० हजार लाडू प्रसादाची व्यवस्था करण्यात आली होती. मंदिराच्या गाभाऱ्यात ठेवलेला प्रसाद दर्शनानंतर भाविकांना वाटप करण्यात आला, अशी माहिती संस्थानचे अध्यक्ष एम. आर. वाघ यांनी दिली. उत्सवानिमित्त मंदिर व परिसर आकर्षक विद्युत रोषणाईने उजळून निघाला होता. तसेच लहान मुलांसाठी रहाट-पाळणे, खेळणी आणि विविध व्यावसायिकही दाखल झाल्याने परिसराला जत्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते.

दरम्यान, सामाजिक बांधिलकी जपत विविध संस्थांच्या सहकार्याने भव्य आरोग्य तपासणी शिबीर व रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले. अनेक नागरिकांनी आरोग्य तपासणी करून घेतली, तर मोठ्या संख्येने रक्तदात्यांनी रक्तदान केले.

### परभणी जिल्हा पोलिस अधिक्षकपदी पंकज कुमावत यांची नियुक्ती : रविंद्रसिंह परदेशी राज्य गुप्त वार्ता विभागात

**परभणी,/प्रतिनिधी :** परभणी जिल्हा पोलिस अधिक्षकपदी पंकज कुमावत यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

राज्याच्या गृह विभागाने गुरुवार ३० एप्रिल रोजी राज्यातील २१ वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांच्या बदल्यांसंदर्भात आदेश लागू केले. त्यात परभणीचे जिल्हा पोलिस अधिक्षक रविंद्रसिंह परदेशी यांची राज्य गुप्त वार्ता विभागात उपायुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्या जागेवर अमरावती येथील अप्पर पोलिस अधिक्षक पंकज कुमावत यांची अधिक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली. परभणीचे अप्पर पोलिस अधीक्षक सुरज गुंजाळ यांची मालेगावात अप्पर पोलिस अधिक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्या रिक्त जागेवर अन्य कोणाचाही नियुक्ती करण्यात आली नाही. गृह विभागाचे सहसचिव सुग्रीव धपाडे यांनी या संदर्भातील शासन आदेश निर्गमित केले आहेत.

### ऊस उत्पादक 'पेमेंट'च्या प्रतिक्षेत : कारखानदार चिडीचूप : अपवाद बळीराजा व योगेश्वरी शुगर्स

परभणी,/प्रतिनिधी : तालुक्यासह जिल्ह्यातील व परजिल्ह्यातील सुध्दा लाखे मे. टन ऊसाचे गाळप केलेल्या साखर कारखानदारांनी ऊस उत्पादक शेतकऱ्यांना एप्रिल अखेरपर्यंतसुध्दा ऊसाचे पेमेंट वितरित केले नाही. या जिल्ह्यात यावर्षी मोठ्या प्रमाणावर साखर कारखानदारांनी ऊसाचे गाळप केले. तालुक्यासह जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणावर ऊस खेचून नेतेवेळी परजिल्ह्यातूनसुध्दा या साखर कारखानदारांनी ऊस खेचून आणला अन् एकमेकांबरोबर स्पर्धा करीत लाखो मे. टन ऊसाचे गाळप केले. यावर्षी या जिल्ह्यात सहकारी असो की खाजगी साखर कारखानदारांनी विक्रमी असे ऊसाचे गाळप केले आहे. परंतु, ऊस उत्पादक शेतकऱ्यांना बहुतांशी साखर कारखानदारांनी ऊसाचे पेमेंट अद्यापपर्यंत वितरित केले नाही, अशी दुर्देवी स्थिती आहे. पूर्णेतील बळीराजा व पाथरीतील योगेश्वरी शुगर्स अपवाद अन्य कारखान्यांनी एप्रिल अखेरपर्यंतही ऊस उत्पादक

# कडाक्याच्या उन्हामुळे सेलू तालुक्यात उष्माघाताचा धोका मोठा वाढला

**उपजिल्हा रुग्णालयात विशेष वॉर्डची सुविधा; नागरिकांना खबरदारीचे आवाहन**

**परभणी ,/प्रतिनिधी-** कडाक्याच्या उन्हामुळे सेलू तालुक्यात उष्माघाताचा धोका वाढला : उपजिल्हा रुग्णालयात विशेष वॉर्डची सुविधा; नागरिकांना खबरदारीचे आवाहन करण्यात आले होते.

परभणी जिल्ह्यासह सेलू तालुक्यात सध्या उन्हाचा कडाका मोठ्या प्रमाणात वाढला असून तापमानाचा पारा ४२ ते ४३ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचला आहे. वाढत्या उष्णतेमुळे नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होण्याची शक्यता लक्षात घेऊन सेलू येथील उपजिल्हा रुग्णालय प्रशासनाने तातडीने उपाययोजना सुरू केल्या आहेत. उष्माघाताच्या रुग्णांवर त्वरित उपचार करता यावेत यासाठी रुग्णालयात स्वतंत्र 'स्पेशल वॉर्ड' तयार करण्यात आला असून त्यामध्ये चार बेड राखीव ठेवण्यात आले आहेत.



गेल्या काही दिवसांपासून दुपारच्या वेळेत रस्त्यांवर शांतता पाहायला मिळत असून उष्णतेच्या लाटेमुळे नागरिक हैराण झाले आहेत. विशेषतः ग्रामीण भागातून विविध कामानिमित्त शहरात येणाऱ्या नागरिकांना या तीव्र उन्हाचा मोठा फटका बसत आहे. उष्माघाताचा धोका टाळण्यासाठी प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचा इशारा दिला आहे.

नागरिकांनी स्वतः च्या आरोग्याची काळजी घेत आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. बाहेर जाताना पिण्याचे पाणी किंवा फळांचा रस सोबत ठेवून शरीर हायड्रेट ठेवणे आवश्यक आहे. पातळ, सैल आणि सुती कपडे परिधान करावेत. थेट सूर्यप्रकाशापासून बचाव करण्यासाठी छत्री, टोपी किंवा टॉवेलचा वापर करून डोके झाकावे. शक्यतो अनवाणी बाहेर जाणे टाळावे तसेच दुपारी १२ ते ४ या वेळेत अत्यावश्यक कामाशिवाय बाहेर पडणे टाळावे. जर अतिमहत्वाचे काम असल्यास योग्य ती खबरदारी घेण्याचे आवाहन यावेळी आरोग्य विभागाने केले आहे.

### चार बेडचा विशेष वॉर्ड कार्यान्वित...

**तालुक्यातील वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर उपजिल्हा रुग्णालयात उष्माघाताच्या रुग्णांसाठी चार बेडचा विशेष वॉर्ड कार्यान्वित करण्यात आला आहे. येथे आवश्यक औषधसाठा आणि तातडीच्या उपचारांची सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. नागरिकांनी उन्हात बाहेर पडताना डोक्याचे संरक्षण करावे, भरपूर पाणी प्यावे आणि काही त्रास जाणवल्यास तात्काळ रुग्णालयात संपर्क साधावा, असे आवाहन सेलू येथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी केले आहे.**

## शिवशाही बसच्या धडकेतील शिक्षक उपचारादरम्यान मयत

**मानवत/प्रतिनिधी-** मानवत बायपास रोडवर काही दिवसांपूव शिवशाही बस व दुचाकी यांच्यात झालेल्या भीषण अपघातात गंभीर जखमी झालेले पाथरी येथील शिक्षक भगवानराव पाथरीकर (वय ५६) यांचे शुक्रवार, दि. १ मे २०२६ रोजी नांदेड येथील रुग्णालयात उपचारादरम्यान दुःखद निधन झाले.

भगवानराव पाथरीकर हे पाथरी शहरातील शिवाजीनगर परिसरातील रहिवासी होते. मानवत बायपास रोडवर झालेल्या शिवशाही बसच्या धडकेत ते गंभीर जखमी झाले होते. अपघातानंतर त्यांना तातडीने उपचारासाठी नांदेड येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र उपचार सुरू असताना त्यांच्या प्रकृतीत बिघाड होत गेला आणि अखेर आज त्यांची प्राणज्योत



मालवली.स्वभावाने शांत, मनमिळावू व कर्तव्यदक्ष शिक्षक म्हणून त्यांची ओळख होती. त्यांच्या निधनाची वार्ता समजताच पाथरी शहरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.त्यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी, एक मुलगा व दोन विवाहित मुली असा परिवार आहे. त्यांच्या दोन्ही मुली एमबीबीएस शिक्षित आहेत.

## जिंतूर शहरामध्ये बौध्द पोर्णिमा निमित्त शांतता रॅली संपन्न

**जिंतूर,/प्रतिनिधी-** भारतीय बौद्ध महासभा तालुका शाखा जिंतूरच्या वतिने २५७० व्या बुद्ध पौर्णीमेनिमित्त तालुकाध्यक्ष मोहन घनसावंत यांच्या मार्गदर्शनाखाली व महिला तालुकाध्यक्ष सुनितााताई पाटिल यांच्या अध्यक्षतेखाली जिंतूर शहरातील प्रमुख रस्त्या वरूण तथागत भगवान बुद्धाच्या भव्य प्रतिमेची मिरवणुक काढण्यात आली. समता सैनिक दलाचे कंपनी कमांडर महेन्द्र बनसोडे यांच्या हस्ते धम्म ध्वजाचे ध्वजा रोहन करण्यात आले तर बौद्धाचार्य शिवाजी लाटे सर, बौद्धाचार्य विकास अण्णा मोरे, बौद्धाचार्य राजेन्द्र घनसावध, बौद्धाचार्य गणेशराव खिल्लारे सर यांनी पंचशील याचना तर भन्ते महानंद यांनी धम्म वंदना घेऊन उपस्थिताना धम्मदेसना दिला. आयु. अनिता अनिल चव्हाण यानी उपस्थिताना खीरदान दिले.कार्यक्रमास अशोक वानखेडे साहेब, शैलेंद्र कांबळे, बळीराम उबाळे, रावसाहेब हरभरे, आशाताई खिल्लारे, लक्ष्मीबाई कांबळे याची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वितेसाठी ॲड. रमेश भडगळ, भारशंकर सर. सतीश अंभोरे, नितीन वाकळे,कमलबाई खिल्लारे,विक्रम घनसावध , यानी परिश्रम घेतले.




**भारतीय बौद्ध महासभा तालुका शाखा जिंतूरच्या वतिने २५७० व्या बुद्ध पौर्णीमेनिमित्त तालुकाध्यक्ष मोहन घनसावंत यांच्या मार्गदर्शनाखाली व महिला तालुकाध्यक्ष सुनिताताई पाटिल यांच्या अध्यक्षतेखाली जिंतूर शहरातील प्रमुख रस्त्या वरूण तथागत भगवान बुद्धाच्या भव्य प्रतिमेची मिरवणुक काढण्यात आली.**

## जिंतूर महामार्ग पोलीस केंद्र कार्यरत आशा शेल्हाळे यांना पोलिस महासंचालकांचे सन्मानचिन्ह प्रदान

**जिंतूर,/प्रतिनिधी-** परभणी पोलिस दलात विविध प्रकारच्या प्रवर्गात केलेल्या उत्तम कामगिरीबद्दल आणि राष्ट्रपती यांचे गुणवत्तापूर्ण सेवेचे पदक व शौर्यपदक प्राप्त पोलिस अधिकारी, अंमलदार यांना पोलिसमहासंचालकांचे सन्मानचिन्ह नुकतेच एका कार्यक्रमात सफौ.आशा शेल्हाळे यांना परभणी जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर व परभणी पोलीस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले आहे.

यामध्ये परभणी जिल्ह्यातील तीन पोलीस कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. यात जिंतुर महामार्ग सुरक्षा पथकाच्या सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक आशा शिवाजीराव शेल्हाळे यांनी मागील पंधरा वर्षात विविध प्रकारच्या गुन्हाचा तपास यशस्वीरित्या पूर्ण करून उलगडा करून चांगली कामगिरी केल्यामुळे सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्रची दावेदार ठरली आहे यामुळे आशा शेल्हाळे यांचा सर्वस्तरातून कौतुक अभिनंदन



होत असून जिंतूर महामार्गचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विनायक जाधव, पोलीस निरीक्षक गजेंद्र सरवदे, पि एस आय प्रकाश नेवल, इरफानोद्दीन इनामदार, प्रताप सरनाईक,नितराज नेताम, ए एस आय मदन मेटके, सय्यद शाकीर, अतुल कांदे,अमोल शेंडगे, व्यंकटेश नरवडे,वालमिक चव्हाण, सूर्यकांत हाके,महेश केदारी यांच्यासह सर्व कर्मचाऱ्यांनी त्यांचे कौतुक व अभिनंदन केले

# शक्तीपीठ द्रुतगती महामार्गाची सुधारित अधिसूचना जारी
## हा महामार्ग राज्य महामार्ग (विशेष) क्रमांक १० म्हणून घोषित

**परभणी,/प्रतिनिधी-** शक्तीपीठ द्रुतगती महामार्गाची सुधारित अधिसूचना जारी : हा महामार्ग राज्य महामार्ग (विशेष) क्रमांक १० म्हणून घोषित करण्यात आला आहे.

पवणार ते पत्रादेवी (नागपूर-गोवा) महाराष्ट्र शक्तीपीठ द्रुतगती महामार्गाची सुधारित अधिसूचना सार्वजनिक बांधकाम विभागाने जाहीर केली असून या महामार्गास राज्य महामार्ग (विशेष) क्रमांक १० म्हणून घोषितही केले आहे.

महाराष्ट्र महामार्ग अधिनियम (१९५५ चा अधिनियम ५५) च्या कलम ३ नुसार प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करीत राज्य सरकारने २८ फेब्रुवारी रोजी प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेसोबत जोडलेल्या परिशिष्टामध्ये नमूद केल्यानुसार जमीनीस पवनार ते पत्रादेवी (नागपूर-गोवा) महाराष्ट्र शक्तीपीठ द्रुतगती महामार्ग म्हणून संबोधित केले आहे. त्यास राज्य महामार्ग (विशेष) क्रमांक १० म्हणून घोषित केले आहे. त्या अधिसूचनेतील अनुक्रमांक ८६०२ ते १२४२४ आणि अनुक्रमांक १२४४२ ते अनुक्रमांक १२४४८ वरील नोंदी, अधिसूचना दिनांक १५ ऑक्टोंबर २०२४ रोजीच्या शासन राज्यपत्रानुसार वगळण्यात आले आहेत. आता अनुसूचीमधील १९७४ ते ३१५८ व अनुक्रमांक ५२३० ते १२५८९ या नोंदी वगळण्यात येवून त्या ऐवजी नव्याने नोंदी अनुसूचीमध्ये समाविष्ट करण्यात आल्या आहेत. शक्तीपीठ द्रुतगती महामार्ग हिंगोली जिल्ह्यातील औंढा नागनाथ तालुक्यातील रांजाळा येथून परभणी तालुक्यातील नांदगाव खु. या ठिकाणी दाखल होणार आहे. सर्व्हे क्रमांक ५३, ५४ तसेच नदी लगत गट क्रमांक ३९४, ३९१ लगत पासून हा महामार्ग नांदगाव बु., असोला, पिंगळी, पोखर्णी नृं., दैठणा, शिर्शी बु., कान्हेगांव मार्गे परळी तालुक्यातील कोठाळी तांडा मार्गे बीड जिल्ह्यात जाणार आहेत.



## अग्रलेख...

# काही चांगलेही घडते आहे...

महाराष्ट्र हे एक गतिमान राज्य आहे. या राज्याच्या प्रत्येक क्षेत्रात दररोज काही ना काही उल्लेखनीय घडत असल्याने 'सळसळत्या घडामोडींनी भारलेले राज्य' म्हणून उभा देश महाराष्ट्राकडे पाहात असतो. आज महाराष्ट्राच्या राज्य निर्मितीचा ६७ वा वर्धापन दिन साजरा होत असून उभे राज्य महाराष्ट्र दिनाचा उत्साही सोहळा साजरा करीत आहे. गेल्या ६६ वर्षांत महाराष्ट्राने शैक्षणिक, सांस्कृतिक, औद्योगिक आणि राजकीय क्षेत्रांतही यशाची नवनवी शिखरे पादाक्रांत केली आणि देशातील सर्वात प्रगत राज्य म्हणून हे राज्य नावारूपाला आले. महाराष्ट्र दिनाचा सोहळा साजरा करताना राज्याच्या सर्वांगीण प्रगतीचा हा उंचावलेला आलेख महाराष्ट्रातील प्रत्येकास सुखावणारा असाच आहे. महाराष्ट्र दिनाच्या पूर्वसप्ताहात राज्यात घडलेल्या उल्लेखनीय घडामोडींची नोंद घ्यावीच लागेल. गेल्या आठवडाभरात राज्याच्या राजकारणापासून समाजकारणापर्यंत आणि उद्योग क्षेत्रापासून पर्यावरणापर्यंत अनेक क्षेत्रांमध्ये परिवर्तनाच्या नव्या पर्वाची नांदी सुरू झाली आहे.

'महाराष्ट्र आता मागे पाहणार नाही' ही फडणवीस सरकारची राजनीती आहे. त्यामुळेच निर्णयांचा धडाका आणि अंमलबजावणीची गतिमान मोहीम राज्याच्या विकासाला नवी दिशा देताना दिसते. महाराष्ट्र दिनाच्या पूर्वसप्ताहातील काही निर्णय आणि अंमलबजावणीच्या प्रारंभातून राज्याच्या शैक्षणिक व औद्योगिक उपक्रमांची एक नवी मालिका आकाराला येत आहे. समाजाचे आरोग्य, मानसिक स्वास्थ्य आणि सुरक्षित व आश्वस्त भविष्याची हमी देणारी दुष्काळमुक्त महाराष्ट्राची घोषणा याच आठवड्यात मुख्यमंत्र्यांनी केली आणि पुढील विकासाची दिशा निश्चित करणाऱ्या एका अथक 'जलयात्रे'चा याच आठवड्यात आरंभ झाला. भविष्यात राज्याच्या कोणत्याही कोपऱ्यात दुष्काळ राहणार नाही यासाठी सरकारचे प्रयत्न सुरू असल्याची ग्वाही या निमित्ताने देताना नदीजोड प्रकल्प, शेततळी आणि दुष्काळाच्या सावटातून सावरण्यासाठीच्या उपायांची मुहूर्तमेढही याच आठवड्यात रोवली गेली. महाराष्ट्राच्या जलविद्युत निर्मिती क्षेत्रात पाच हजार कोटींहून अधिक रकमेच्या गुंतवणुकीच्या प्रकल्पांचा मुहूर्त झाला आणि 'अल निनो'च्या प्रभावामुळे आगामी पावसाळ्यावर दाटलेल्या दुष्काळाचे सावट दूर करण्याकरिता उपायांची आखणी व अंमलबजावणीही याच आठवड्यात सुरू झाली. लालफितीच्या कारभारातून राज्याला मुक्त करण्याचा संकल्प आणि गतिमान कार्यशैलीची नवी नीती याच आठवड्यात उदयास आली. महाराष्ट्र आता देशातील इतर राज्यांशी नव्हे, तर जागतिक अर्थव्यवस्थेशी स्पर्धा करीत असून प्रगतीचा हा वेग असाच कायम राहिल्यास पुढील काही वर्षांत महाराष्ट्र अरब देशांना आणि सिंगापूरलाही मागे टाकेल, अशी ग्वाही देणाऱ्या उद्योगकेंद्री धोरणाची घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली. महाराष्ट्रात डेटा सेंटर उभारणी सुरू आहे, ऊर्जा क्षेत्राची वाटचाल नव्या प्रगतीच्या दिशेने सुरू झाली आहे, येत्या पाच वर्षांत नवीनीकरणीय ऊर्जा क्षेत्राचा वाटा एकूण ऊर्जा निर्मितीच्या निम्म्याहून अधिक स्तरापर्यंत पोहोचलेला असेल. याआगोदरच्या आठवड्यात राज्यात एकाच दिवशी अडीच लाख कोटी रुपये गुंतवणुकीच्या १८ विशाल आणि अतिविशाल प्रकल्पांना मान्यता देण्यात आली. राज्यातील एक लाख रोजगारक्षम तरुणांसाठी रोजगाराच्या नव्या संधींची क्षितिजे उजळली. आजवर मोठ्या आणि अतिविशाल प्रकल्पांची केंद्रे केवळ मुंबई-पुण्यासारख्या महानगरांच्या भोवती वसलेली होती. आता रोजगारांच्या संधींना महाराष्ट्राचा कानाकोपरा खुणावू लागला आहे. गडचिरोलीसारख्या शेवटच्या टोकाच्या जिल्ह्यात आठ हजार रोजगारनिर्मितीची क्षमता असलेला प्रकल्प उभा राहणार आहे.

प्रगतीचा हा रथ असा वेगवान घोडदौड करीत असताना, गेल्या आठवडाभरात चर्चा मात्र महाराष्ट्राच्या राजकारणाची रंगली. महाराष्ट्राच्या राजकारणात फारसे अस्तित्व राहिलेले नसतानाही महाविकास आघाडीच्या राजकारणाची आणि विशेषतः आगामी विधान परिषद निवडणुकीतील उद्धव ठाकरे यांच्या भूमिकेची उत्सुकता महाराष्ट्रात शिगेला पोहोचली. मुळात उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेस गेल्या काही वर्षांत उतरती कळा लागली. राज्याच्या सत्ताकारणात त्यांचा गट बराचसा बेदखल झाला आहे. ठाकरे गटाच्या प्रवक्त्यांकडून केल्या जाणाऱ्या वक्तव्यांची चर्चा वगळता, राज्याच्या धोरणात्मक बाबींमध्ये या गटाच्या भूमिकेस फारसे महत्त्वही राहिलेले नाही आणि ठाकरे यांचा गट महाविकास आघाडीसोबत असल्याचे चित्र धूसर स्थितीतच आहे. महाविकास आघाडीच्या अस्तित्वाचा मुद्दा आला की, या आघाडीतील ज्या पक्षांची आणि नेत्यांची चर्चा अपरिहार्य असते, त्यामध्ये उद्धव ठाकरे यांचेही नाव घेतले जात असते. विधान परिषदेच्या आगामी निवडणुकीत महाविकास आघाडीचा निवडून येऊ शकेल असा एकमेव चेहरा तेच असतील का, याची चर्चा महाराष्ट्रात होणे साहजिकच होते. महाराष्ट्राच्या विकासाच्या वाटचालीचा नवा अध्याय समोर येत असताना आणि राज्यात काही चांगलेही घडते आहे, याची खात्री देणाऱ्या निर्णयांची कार्यवाही सुरू झालेली असताना उद्धव ठाकरे यांच्या उमेदवारीविषयी तर्कवितर्क लढविले जावेत, हे काही अनपेक्षित नसले, तरी अनाठायी ठरावे असे होते. अखेर त्यावर पडदा पडला आहे. आता या निवडणुकीत ते उमेदवार नसणार हे स्पष्ट झाल्यानंतर त्याचेही विश्लेषण सुरू होणे अपरिहार्य आहेच. उद्धव ठाकरे यांनी विधान परिषद निवडणुकीतून माघार का घेतली असावी, त्यामागे त्यांची काही राजनीती असावी की केवळ नाईलाज असावा? त्यांनी निवडणूक लढविली असती तर महाराष्ट्राच्या राजकारणावर असा कोणता प्रभाव पडला असता किंवा निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतल्याने महाराष्ट्राच्या राजकारणाचे असे कोणते नुकसान होणार आहे, यावरही तर्कवितर्क सुरू होतील. त्यामुळे एका बाजूला राज्याच्या विकासाला दिशा देणारे बरेच काही घडत असताना उद्धव ठाकरे यांच्या उमेदवारीविषयीच्या निर्णयाचा मागोवा घ्यायला हवा.

उद्धव ठाकरे यांची विधान परिषदेच्या सदस्यत्वाची मुदत मे महिन्यात संपुष्टात येत आहे. गेल्या सहा वर्षांतील मुख्यमंत्रिपदाची अल्पकाळाची कारकीर्द वगळता, त्यांचा विधान परिषदेतील कार्यकाळ चमकदार राहिलेला नाही, असेच चित्र आहे. शिवसेनेत फूट पडल्यामुळे मुख्यमंत्रिपद गमावण्याची वेळ आल्यावर पदाचा राजीनामा देताना त्यांनी विधान परिषद सदस्यत्व सोडण्याचेही जाहीर केले होते, पण त्यांनी तसे केले नाही. उलट, त्यानंतरच्या काळातील त्यांचा सभागृहाच्या कामकाजात सहभागदेखील उल्लेखनीय ठरला नाही. अधिवेशनकाळात प्रश्नोत्तरे किंवा राज्यहिताच्या महत्त्वाच्या विषयांवरील चर्चेतही ते फारसे सहभागी झाले नाहीत; उलट त्यांची अधिवेशनकाळातील सभागृहातील अल्प उपस्थिती चर्चेचा मुद्दा ठरला होता. त्यामुळे विधिमंडळाचे सदस्य असताना त्यांनी बजावलेली एकूण सुमार कामगिरी पाहता, पुन्हा सभागृहातील विरोधी बाकावरील एक जागा अडविण्यासाठी त्यांनीच निवडणूक लढवावी हा महाविकास आघाडीतील काही नेत्यांचा आग्रह अनाठायी होता. त्यांच्या निष्क्रिय कामगिरीपेक्षा त्यांच्या गटाने उमेदवारी दिलेल्या अंबादास दानवे यांची कामगिरी निश्चितच उजवी आणि आक्रमक ठरली होती. उद्धव ठाकरे यांना उमेदवारी मिळावी ही महाविकास आघाडीच्या नेत्यांची इच्छा केवळ आघाडीच्या अस्तित्वाला नवसंजीवनी देण्याचा प्रयत्न होता. पण उद्धव ठाकरे यांनी त्याचा मोह आवरला आणि महाविकास आघाडीस संजीवनी देण्यापेक्षा ढासळत्या संघटनेस संजीवनी देण्याची गरज वेळीच ओळखली, हा त्यांच्या निर्णयाचा अर्थ असू शकतो. महाविकास आघाडी अगोदरच खिळखिळी झालेली आहे. ठाकरे यांनी उमेदवारी नाकारून पक्षाच्या आक्रमक नेत्यास उमेदवारी दिल्याने महाविकास आघाडी नव्या फुटीच्या उंबरठ्यावर उभी राहिली आहे. त्यामुळे ठाकरे किंवा महाविकास आघाडीचे भवितव्य हा शिळोप्याच्या गप्पांमध्ये तोंडी लावण्यापुरता मसाला म्हणून योग्य असला, तरी भविष्यात महाराष्ट्राची विकासाच्या दिशेने सुरू असलेली वाटचाल आणि जे काही चांगले घडत आहे, त्याची चर्चा होणे अधिक योग्य ठरेल. महाराष्ट्र दिनाच्या मुहूर्तावर दिसू लागलेल्या विकासाच्या नव्या वाटा आणि त्यावरील नव्या संधींची उजळलेली क्षितिजे यांची चर्चा अधिक व्हावयास हवी. ▮

## प्रासंगिक

सी. पी. राधाकृष्णन

# बुद्ध पौर्णिमा : करुणेची पूर्तता

चित्रा पौर्णिमेच्या या पवित्र दिवशी मंदिरांमध्ये उत्सव साजरे केले जात असताना, प्रत्येक घरात समृद्धी नांदो, अशी मी प्रार्थना करतो. बुद्ध पौर्णिमेनिमित्त सर्व बंधुभगिनींना शुभेच्छा देताना मला अत्यंत आनंद होत आहे. भारताने जगाला दिलेल्या अनेक देणग्यांमध्ये बौद्ध धर्म सर्वात अग्रस्थानी आहे. भगवान बुद्धांचे आयुष्य आणि शिकवण आजदेखील जगभरातील लाखो लोकांचे आयुष्य उजळून टाकत आहे. भारताने जगाला आत्मसाक्षात्काराचे महत्त्व शिकवले. बुद्ध या शब्दाचा अर्थच एक जागृत व्यक्ती असा आहे. मानवतेला आत्मसाक्षात्काराचा मार्ग दाखवणाऱ्या या महान विभूतीचा जन्म आणि त्यांना झालेला साक्षात्कार एकाच दिवशी होणे हे विशेष आहे.

राजपुत्र सिद्धार्थाचे बालपण अत्यंत ऐषोआरामात गेले. वयाच्या २९ व्या वर्षी आपला राजवाडा, पत्नी, पुत्र आणि सर्व ऐहिक संपत्तीचा त्याग करून आध्यात्मिक सत्याच्या शोधात त्यांनी घर सोडले. सहा वर्षांच्या कठोर आत्मक्लेशानंतर बोधगया येथील बोधी वृक्षाखाली त्यांना परमोच्च ज्ञानप्राप्ती झाली आणि त्यांनी बुद्धपद धारण केले. चार आर्य सत्यांचा साक्षात्कार आणि नैतिकतेच्या मार्गाचे आचरण यामधूनच एका नवीन तत्त्वज्ञानाचा आरंभ झाला; जे पुढे जागतिक इतिहासात भारताच्या स्थानासाठी अभिमान म्हणून अधिक बहरत गेले. वाराणसीजवळ सारनाथ येथे त्यांनी पाच तपस्वींना आपला पहिला उपदेश दिला. धम्मचक्कप्पवत्तन सुत्त किंवा धर्माचे चक्र फिरवणे म्हणून ओळखल्या जाणाऱ्या त्यांच्या शिकवणुकीतून बौद्ध धर्माचा पाया रचला गेला आणि बौद्ध धर्माचा अधिकृतपणे आरंभ झाला. कालांतराने, अनेक जण त्यांच्या शिकवणीकडे आकर्षित झाले. मगधचे राजा बिंबिसार यांनी राजगीर येथील वेणुवन (बांबूचे वन) मठ दान केले. श्रीमंत अनाथपिंडिकाने मठ बांधण्यासाठी संपूर्ण जेतवन वनाला सोन्याच्या नाण्यांनी मढवले. अशा कृतींमधून भारतात अस्तित्वात असलेल्या धर्मावरील गाढ श्रद्धेचे दर्शन घडते. बौद्ध धर्माची पायाभूत शिकवण असलेल्या चार आर्य सत्यांचा प्रसार मठांद्वारे केला जातो. इच्छा हे दुःखाचे मूळ कारण आहे, इच्छेचा नाश केल्याने दुःखावर मात करता येते आणि अष्टांग मार्गाचे अनुसरण करून व्यक्ती दुःखापासून मुक्ती मिळवू शकते.

**बुद्धांनी दिलेली शिकवण :** भूतकाळात रमू नका, आपले मन वर्तमानावर एकाग्र करा, सत्य हीच शक्ती आहे. आपले मन हे सर्व कृतींचे स्रोत आहे, म्हणूनच सकारात्मक विचारांची जोपासना करा. कठीण काळात मनाला भयग्रस्त होऊ देऊ नका. आयुष्याचा प्रवास हा अंतिमतः वैयक्तिक आहे. या प्रवासाला एका आध्यात्मिक मार्गाची जोड द्या. शब्द जखमा करू शकतात, म्हणूनच सौम्यपणे बोला. प्रेम आणि अहिंसा अत्यंत आवश्यक आहेत. नेहमी शिकत राहा; कधीच थांबू नका.



'मणिमेकलाई' आणि 'कुंडलाकेसी' यांसारख्या प्राचीन तमिळ महाकाव्यांमध्ये बौद्ध तत्त्वज्ञानाची अत्यंत सुंदररीत्या मांडणी केली आहे. प्राचीन ग्रंथसंपदेपैकी बरेचसे ग्रंथ काळाच्या ओघात नष्ट झाले असले, तरी त्यांचे योगदान आजही अमूल्य आहे. ज्यांच्या मनात कोणतीही मोह-माया उरलेली नाही, अशा सज्ञानी माणसांनी मद्यपान आणि जीवहत्या यांसारख्या गोष्टींचा त्याग केला. ते म्हणतात की, आपण एक बाब समजून घ्यायला हवी; ती म्हणजे जन्म आणि मृत्यू तसेच मृत्यूनंतर पुन्हा होणारा जन्म, हे चक्र म्हणजे निव्वळ झोपणे आणि जागे होण्यासारखेच आहे, हेच खरे सत्य आहे. जे लोक योग्य काम करतात त्यांना आयुष्यात सन्मानाचे स्थान मिळते आणि जे वाईट कर्म करतात त्यांना असंख्य यातना सोसाव्या लागतात. हे सत्य ज्यांना जाणून घेता आले, त्यांनाच या जगातील सर्व बंधने तोडता आली आहेत. अशा शब्दांत 'मणिमेकलाई' या महाकाव्यात बौद्ध धर्माचे सार मांडले आहे. (आथिराई पिच्चईयित्ता काथाई : ८४-९०). अहिंसा, चोरी न करणे, व्यभिचारापासून दूर राहणे, सत्याची कास धरणे आणि मादक पदार्थांपासून दूर राहणे या पाच नीतिमूल्यांवर त्यांनी भर दिला आहे. त्यांनी दुःखात अडकलेल्या जिवांच्या जगण्यात स्पष्टता आणली, त्यांचे आयुष्य उजळवून लावले, म्हणूनच तर त्यांना 'लाईट ऑफ एशिया' अर्थात आशियाची प्रकाशज्योत अशा शब्दांत गौरविले जाते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'मन की बात' या कार्यक्रमात सांगितलेली एक गोष्ट मला आठवते. त्यांनी म्हटले होते की, भगवान गौतम बुद्धांनी दिलेला जीवन संदेश आजही तितकाच प्रासंगिक आहे. शांततेची सुरुवात आपल्या आतूनच होत असते, स्वतःवर मिळविलेला विजय हाच सर्वोत्तम विजय असतो, ही शिकवण गौतम बुद्धांनी आपल्याला दिल्याची जाणीव पंतप्रधानांनी आपल्याला करून दिली होती. आज जग ज्या तणाव आणि संघर्षातून जात आहे, त्या पार्श्वभूमीवर बुद्धांची शिकवण अधिकच महत्त्वाची ठरली असल्याचेही पंतप्रधानांनी सांगितले होते. सम्राट अशोकांच्या उदाहरणातून भगवान बुद्धांच्या शिकवणीने घडून येणारे परिवर्तन आपल्याला ठळकपणे दिसून येते. सम्राट अशोक यांनी शिलालेखांच्या आणि स्तूपांच्या माध्यमातून बौद्ध विचारातील तत्त्वांचा देशभर प्रचार-प्रसार केला. आजही जगभरातील असंख्य लोक सांची आणि सारनाथ इथले स्तूप पाहण्यासाठी येतात. असे मानले जाते की, बौद्ध भिक्खूंनी तामिळनाडूमध्ये धर्म प्रसारासाठी मदत केली होती. आजही तामिळनाडूच्या अनेक भागांत बौद्ध धर्माच्या खुणा पाहायला मिळतात. बौद्ध भिक्खूंनी कोणत्याही भेदाभेदाशिवाय मोफत वैद्यकीय सेवा आणि शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करून दिल्या. त्यांनी 'त्रिपिटक' यांसारख्या पवित्र ग्रंथांची शिकवण दिली. दानधर्म, विशेषतः गरिबांना अन्नदान करणे, हे मूलभूत कर्तव्य मानले जात असे. भुकेलेल्यांना अन्न देणे म्हणजे एका अर्थाने जीवन देण्यासारखेच आहे, हीच भावना मांडली आहे.

बौद्ध धर्म, ज्याने आयुष्यभर शिक्षणावर भर देत मोठ्या प्रमाणावर शैक्षणिक संस्था आणि ग्रंथालयांची उभारणी केली. इ. स. पाचव्या शतकात नालंदा विद्यापीठ हे शिक्षणाचे एक मुख्य केंद्र म्हणून विकसित झाले होते. या विद्यापीठात सुमारे १०,००० विद्यार्थी आणि १५०० शिक्षकांचे संख्याबळ होते. तामिळनाडूतील कांचीपुरम येथेही एक प्रसिद्ध विद्यापीठ अस्तित्वात असल्याची ऐतिहासिक नोंद आहे. विक्रमशिला आणि ओदंतपुरी यांसारख्या विद्यापीठांनी असंख्य साहित्यकृतींसह देशाच्या बौद्धिक उंचीचे दर्शन जगाला घडवले. बौद्ध शिक्षण संस्था व विद्यापीठांमध्ये संपूर्ण आशियातून अनेक विद्वान अध्ययनासाठी भारतात येत असत. चिनी भिक्खू फॅक्सियन/फा-हियान यांनी बौद्ध धर्माच्या अध्ययनासाठी तब्बल १५ वर्षांची प्रदीर्घ यात्रा केली होती तर चिनी भिक्खू ह्युएनसांग यांनी भारतात १६ वर्षे नालंदा येथे अभ्यास करण्यात आणि अनेक ग्रंथ संकलित करण्यात घालवली. त्यानंतर ते चीनमध्ये परतले.

ह्युएनसांग यांच्या प्रवासवर्णनानुसार, त्यांनी तामिळनाडूतील कांचीपुरमलाही भेट दिली होती, जिथे त्यांनी एका बौद्ध विद्यापीठात वास्तव्य करून अध्ययन केले, हस्तलिखितांची प्रत तयार केली. असे म्हटले जाते की, त्यांनी विद्यापीठातील विद्यार्थ्यांना विशेष व्याख्याने दिली होती. कठोर तपश्चर्येनंतर अशक्त झालेल्या बुद्धांविषयी करुणा बाळगून सुजाताने त्यांना प्रेमाने दुधाची खीर अर्पण केली; ज्यामुळे त्यांचे प्राण वाचले आणि त्यांना बोधिवृक्षाखाली ध्यान करण्याची शक्ती मिळाली. बुद्ध पौर्णिमेच्या दिवशी आपण पायसम तयार करून आणि अर्पण करून त्यांच्या प्रेम आणि दयाळूपणाचे स्मरण करतो.

''प्रेम हे आनंदाचा स्त्रोत आहे, प्रेम हे जगाचा प्रकाश आहे, प्रेम हीच सर्वात मोठी शक्ती आहे-'' बुद्धांची ही शिकवण आजही तितकीच प्रासंगिक आहे. संपूर्ण जगात प्रेम आणि शांतता नांदो, हीच प्रार्थना. ▮

(लेखक हे भारताचे उपराष्ट्रपती आहेत.)

## विशेष

डॉ. विलास चिंतामण देशपांडे

# मराठी माणसाचे भाषिक भान

कोणत्या ना कोणत्या कारणास्तव विविध संस्कृती, धर्म बाळगणाऱ्यांची सरमिसळ होते. त्याचा परिणाम एखाद्या प्रांतात बोलल्या जाणाऱ्या प्रांत भाषेवर होणे स्वाभाविक आहे. त्याला मराठी भाषा अपवाद नाही. परिणामी त्या प्रांत क्षेत्रातील मराठीचे उच्चार व लेखन भ्रष्ट होण्याचा संभव असतो. एका वाक्यात दोनपेक्षा अधिक शब्द परभाषेतील आले की भाषा बाटते, (हा पारशी शब्द) असे इतिहासकार वि. का. राजवाडे सातत्याने सांगत असत. भाषा शुद्धी चळवळीचे जाज्वल्य पुरस्कर्ते राहिलेले विनायक दामोदर सावरकरही राजवाड्यांच्याच मताचे. पण 'ऋतुपर्ण'च्या ऐवजी 'रुतुपर्ण' या उच्चारण्याने आमची जीभच बाटते. आमच्या मराठीचे वर्णाक्षर आम्हाला कोण शिकवणार? प्रसार माध्यमांनी (विशेषतः इलेक्ट्रॉनिक) मानधन देऊन ठरवलेले वक्ते व तेथे कार्यरत असणारा कर्मचारी वर्ग मराठी माणसाचे उच्चार बिघडविण्याचेच काम करीत आहे, असे एकूण चित्र आहे. समाज माध्यमातील मजकुरांचे विशेषतः रोमन लिपीत लिहिलेल्या जात असलेल्या मराठीतून तर देवनागरी लिपीचे अतोनात नुकसान होत आले आहे.

सर्वसाधारणपणे गावाचे शहरीकरण होत असताना गावाला एक प्रकारे बकाल वातावरणाचा संसर्ग होण्याचा धोका उत्पन्न होत असतो. तथापि, ज्याचे उच्चार शुद्ध आणि अस्सल मराठी आहेत अशी माणसे नागपूरसारख्या मोठ्या शहरातून आढळतातच. परंतु उडत उच्चार करण्याच्या फॅशनचा सध्या प्रसार माध्यमांना प्रादुर्भाव झाला आहे. माध्यमांमधून होणाऱ्या चर्चा - कार्यक्रमातून उच्चार स्वातंत्र्य बोलणारे घेताना आढळतात. अशा प्रकारच्या लोकांची निवड जनजागृती करणाऱ्या ज्ञान प्रसाराच्या प्रांतात होणे भाषेच्या, शुद्धतेच्या व गोडीच्या दृष्टीने धोक्याचे आहे. अर्थात याला मनोरंजनाचे कार्यक्रम अपवाद ठरतात; पण तेही काही मर्यादेपर्यंतच. इतर भाषेतील शब्द प्रादेशिक भाषेत येणे हे विशिष्ट भाषेच्या विकासाचे लक्षण आहे, परंतु एखाद्या भाषेत किती शब्द आहेत; त्याबरोबरच त्यापैकी किती शब्द जास्तीत जास्त लोकांना समजतात, किती शब्द त्या विशिष्ट भाषेच्या प्रकृतीशी जुळणारे आहेत, किती शब्द त्या भाषेच्या कुशीतून जन्म घेणाऱ्यांच्या प्रत्यक्ष सामाजिक, सांस्कृतिक क्रियांशी व संकेतांशी संबद्ध आहेत, यालाही महत्त्व दिले गेले पाहिजे. मराठीच्या बाबतीत ते होताना दिसत नाही. टीव्हीवरील मराठी डेलीसोपच्या नावाखाली प्रसारित होणाऱ्या मालिका त्याचे साक्षात उदाहरण आहे.



लोकांच्या अंतरंगात जाऊन भिडण्याची तळमळ आणि संस्कृत व संस्कृतीचे ज्ञान यामुळे लोकहितवादी, लोकमान्य टिळक, आगरकर ही मंडळी सुगम, शुद्ध आणि भेदक मराठी लिहू लागली. अगदी अलिकडे स्वातंत्र्योत्तर काळात ना. वि. परूळेकर, ग. त्र्यं. माडखोलकर, गोविंद तळवलकर इत्यादी पत्रकारांच्या लेखनाचा दाखला देता येईल. जागतिकीकरणाच्या आगमनाने आजचे तरुण मात्र त्यांच्याच उपयोगाची, ज्ञानाची, व्यवसायासाठी पूरक तेवढीच मराठी वाचत आहे. अत्रे, खांडेकर, फडके, भावे, माडखोलकर इत्यादींचे लेखन त्यांच्या वाचनात नाही. याची कारणे आजच्या पुष्कळशा लेखकांचा मराठीशी संबंध मध्यस्थांमार्फत येण्यात सापडतात. बाळशास्त्री जांभेकर, लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख इत्यादींचे लेखन वाचण्यातून तरुणांना इंग्रजीपूर्व गद्याचा गाभा आत्मसात केल्याचा आनंद मिळवून देऊ शकतो. इंग्रजानंतरची आधुनिक दृष्टी व इंग्रजीपूर्वीचे मराठीचे बाळबोध वळण यांचा सुंदर मिलाफ त्यांच्या लेखनात झालेला आढळेल.

निकोप गद्य व स्वाभाविक सुगम शब्द संग्रह या भाषेच्या प्राथमिक गरजा आहेत. भारतात विविध प्रकारच्या बोली बोलल्या जातात, म्हणून राष्ट्रैक्याच्या नावाखातर या दोन अनमोल ठेव्यावर कोणत्याही प्रादेशिक भाषेने पाणी सोडू नये. जगाच्या पाठीवर महाराष्ट्र असा एकमेव प्रांत आहे की, येथील मराठी माणसाला आपल्या भाषेविषयी तीळमात्र अस्मिता नाही, प्रेम नाही. व्यवसायाची भाषा म्हणून इंग्रजीचा व अखिल भारतीय संपर्काची भाषा म्हणून प्रत्येक प्रांतातील सुशिक्षिताने इंग्रजी, हिंदीचा वापर जरूर करावा, आर्थिक विकासाच्या नावाखाली नवराष्ट्र निर्माण करण्याच्या हव्यासाने दीर्घपरंपरेच्या मराठी भाषेच्या शब्द संपत्तीचा जुगार मांडणे हा शुद्ध वेडेपणा आहे. भाषा सल्लागार समितीने महाराष्ट्र शासनाला ५६ पानांचे जीवन व्यवहाराच्या सर्व अंगांचा विकास व्हावा म्हणून मराठी भाषा धोरणाचा मसुदा दिल्यानंतर शासनाने मात्र २०२४ सालात ५६ पानाच्या धोरणाला आक्रसून १२ पानात बसवले. अर्थात त्यात सर्वसमावेशकता असण्याची शक्यता कमीच. १४ कोटी लोकसंख्या असलेल्या महाराष्ट्रात परप्रांतीयांचे संख्याबळ जवळपास ५ कोटी आहे. त्यांना मराठी आलेच पाहिजे, असा आग्रह शासनाच्या पातळीवर सातत्याने होत नाही. या प्रांतातील प्रमुख व्यवसाय व निम्नस्तरीय धंद्यावर परप्रांतीयांची पकड आहे. कारण परप्रांतांसाठी मराठी शिकणे आवश्यकच आहे, असे कुठेही धोरणात म्हटलेले नाही. आर्थिक बळ कमावण्याचे बाबतीत मराठी समाज दुबळा ठरलेला आहे. यात प्रसार माध्यमेही आलेत. मग त्यांचा वचक तो काय असणार? आम्ही मराठी बोलणार नाही, असे ठामपणे आपल्या थोबाडावर फेकणारे शब्द उगाच नाही गैर मराठी माणसाच्या तोंडून बाहेर पडतात.

अगदी नर्सरीपासून मुलांना इंग्रजी/हिंदी बळजबरीने शिकवली जात असताना मराठीसाठी आम्ही विविध सवलती जाहीर करण्यात काय अर्थ आहे? धडाधड मराठी माध्यमांच्या शाळा बंद पडत असताना आणि त्यास शासनाचा मूक पाठिंबा कसा मिळतो आहे, हे नव्याने सांगण्याची गरज नाही. मग कोवळ्या वयात मातृभाषेला पारखी झालेल्या (की केलेल्या?) मुलांना मराठीविषयी आस्था, प्रेम तरी कसं उपजणार? त्याचा दुष्ट परिणाम येथील सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक तसेच उच्चार लेखन क्षेत्रांवर तर होणारच. मराठीचा वापर शक्य होईल तिथे टाळणे हेच मराठी समाजाचे भाषा धोरण आहे का, असे वाटावे अशी स्थिती आहे. शासनाने त्यांचे मराठी भाषाविषयक धोरण त्यांना पाहिजे तसं राबवावे; मात्र मराठी भाषिकांनी आपल्या सांस्कृतिक-भाषिक स्वभावाविषयीचे वैयक्तिक आणि सामूहिक धोरण निश्चित केले पाहिजे. नाही तर नजीकच्या भविष्यात मराठी समाजाचे काही खरे नाही.. ▮

९९६००३११४८

## अर्थविशेष

हितेश पारसे

# फ्लॅट उशिरा मिळाला... आता आयकर भरावा लागेल का?

पुनर्विकास हा आजच्या शहरी वास्तवाचा एक अत्यंत महत्त्वाचा भाग बनला आहे. जुन्या, जीर्ण झालेल्या इमारती पाडून आधुनिक सुविधा असलेली नवीन इमारत उभारणे आणि त्याबदल्यात विद्यमान फ्लॅटधारकांना नवीन फ्लॅट देणे- ही संकल्पना रहिवाशांसाठी फायदेशीर वाटत असली तरी आयकराच्या दृष्टीने ती अत्यंत बारकाईने समजून घेण्यासारखी आहे. अनेक वेळा फ्लॅटधारक असा समज करून घेतात की त्यांनी आपला फ्लॅट विकलेला नसतो, त्यामुळे कर लागू होणार नाही; परंतु आयकर कायद्याच्या दृष्टीने वास्तव वेगळे आहे. पुनर्विकासाच्या व्यवहारात फ्लॅटधारक बिल्डरला त्याच्या मालमत्तेवरील विकास हक्क देतो आणि त्या बदल्यात नवीन फ्लॅट, अतिरिक्त क्षेत्र, भाडे, कॉर्पस किंवा काही वेळा रोख रक्कम मिळवतो. आयकर कायद्यातील 'ट्रान्सफर' या संकल्पनेत अशा प्रकारचा व्यवहार स्पष्टपणे समाविष्ट होतो, त्यामुळे हा व्यवहार भांडवली नफा (कॅपिटल गेन) निर्माण करणारा ठरतो.

भांडवली नफ्यावर कर लागू होतो, मात्र करदात्यांना दिलासा देण्यासाठी कायद्यात सेक्शन ५४ आणि सेक्शन ५४ एफ सारख्या तरतुदी आहेत. या तरतुदींनुसार, जर करदात्याने जुन्या मालमत्तेच्या बदल्यात नवीन निवासी घर घेतले किंवा बांधले आणि ते काम ३ वर्षांच्या आत पूर्ण झाले, तर भांडवली नफ्यावर करमाफी मिळू शकते. ही तरतूद पुनर्विकासाच्या व्यवहारात विशेषतः महत्त्वाची ठरते, कारण बहुतेक वेळा फ्लॅटधारकांना नवीन फ्लॅटच मिळतो. परंतु या करमाफीची सर्वांत महत्त्वाची अट म्हणजे नवीन घर ३ वर्षांच्या आत पूर्ण झाले पाहिजे. याच ठिकाणी प्रत्यक्ष व्यवहार आणि कायद्याची अट यांच्यात संघर्ष निर्माण होतो. वास्तवात, अनेक पुनर्विकास प्रकल्प वेळेत पूर्ण होत नाहीत. प्रकल्पाला लागणाऱ्या विविध मंजुरी, पर्यावरणीय परवानग्या, आर्थिक अडचणी, बांधकामातील विलंब किंवा काही वेळा बिल्डरच्या व्यवस्थापनातील त्रुटी यामुळे प्रकल्प ३ वर्षांच्या आत पूर्ण होणे शक्य होत नाही. अशा परिस्थितीत आयकर विभाग कडक भूमिका घेतो आणि असे म्हणू शकतो की करदात्याने सेक्शन ५४ किंवा ५४ एफ मधील अट पूर्ण केलेली नाही, त्यामुळे त्याला दिलेली करमाफी रद्द केली जावी. याचा थेट परिणाम म्हणजे आधी वाचवलेला भांडवली नफा करयोग्य ठरतो, त्यावर व्याज लावले जाते आणि काही प्रकरणांमध्ये दंड देखील आकारला जाऊ शकतो. परंतु, न्यायालयांनी या विषयाकडे केवळ तांत्रिक दृष्टिकोनातून न पाहता, व्यावहारिक आणि न्याय्य दृष्टिकोनातून पाहिले आहे. सीआयटी विरुद्ध संबंदम उदयकुमार या प्रकरणात न्यायालयाने स्पष्ट केले की, जर करदात्याने आपली जबाबदारी पूर्ण केली असेल आणि विलंब हा बिल्डरच्या नियंत्रणाबाहेरील कारणांमुळे झाला असेल, तर केवळ ३ वर्षांची अट पूर्ण झाली नाही म्हणून करमाफी नाकारता येणार नाही. त्याचप्रमाणे, सीआयटी विरुद्ध श्रीमती बी. एस. शांतकुमारी या प्रकरणात न्यायालयाने असे नमूद केले की पूर्ण बांधकाम झाले नाही तरी करदात्याने प्रामाणिकपणे गुंतवणूक केली असल्यास सूट दिली जाऊ शकते. तसेच पीसीआयटी विरुद्ध राम कुमार सुरी या प्रकरणातही न्यायालयाने हेच मत मांडले की करदात्याला बिल्डरच्या चुकांसाठी शिक्षा करता येत नाही. या सर्व निर्णयांमधून एक मूलभूत तत्त्व स्पष्ट होते- 'भरीव अनुपालन' म्हणजे करदात्याने प्रामाणिकपणे कायद्याचे पालन करण्याचा प्रयत्न केला असल्यास, तांत्रिक त्रुटींवरून त्याला करमाफी नाकारू नये. याशिवाय, सरकारने पुनर्विकासातील करप्रश्न सोडवण्यासाठी कलम ४५(५अ) ही विशेष तरतूद लागू केली आहे, जी या क्षेत्रात एक गेम चेंजर मानली जाते. या तरतुदीनुसार, वैयक्तिक किंवा एचयूएफ करदात्यांच्या बाबतीत भांडवली नफा तेव्हा करयोग्य ठरतो जेव्हा प्रकल्पाचा पूर्णतः प्रमाणपत्र (सीसी) जारी होतो. याचा अर्थ असा की, जरी पुनर्विकास करार आधीच्या वर्षात झाला असला तरी कर भरण्याची जबाबदारी पुढे ढकलली जाते आणि ती सीसी मिळाल्यानंतरच्या वर्षात येते. त्यामुळे, जर बिल्डरने प्रकल्प पूर्ण करण्यात उशीर केला, तर करदात्यालाही कर भरण्याची वेळ पुढे ढकलण्याचा फायदा मिळतो. तथापि, हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की कलम ४५(५अ) हा केवळ कर भरण्याचा कालावधी निश्चित करतो; कलम ५४अंतर्गत मिळणाऱ्या करमाफीच्या अटी स्वतंत्रपणे लागू राहतात.

व्यावहारिक पातळीवर पाहता, पुनर्विकासातील सर्वांत मोठी गरज म्हणजे योग्य कर नियोजन आणि योग्य करार रचना जर करारात योग्य प्रकारे अटी नमूद केल्या नसतील किंवा कलम ४५(५अ) लागू होईल याची काळजी घेतली नसेल, तर करदात्याला अनावश्यक कराचा भार सहन करावा लागू शकतो. तसेच, काही वेळा फ्लॅटधारक बिल्डरकडून काही रोख मोबदला (रोख घटक) आधी स्वीकारतात, ज्यामुळे कर त्वरित लागू होण्याची शक्यता वाढते. याशिवाय, नवीन फ्लॅट पूर्णत्वाचे प्रमाणपत्र मिळण्यापूर्वी विकल्यास कलम ५४ अंतर्गत मिळणारी सूट धोक्यात येऊ शकते. म्हणूनच, पुनर्विकास हा केवळ बांधकामाचा व्यवहार नसून तो कायदेशीर आणि करदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. योग्य सल्ला, योग्य दस्तऐवजीकरण आणि योग्य नियोजन केल्यास करदात्याला मोठ्या प्रमाणावर कर वाचवता येतो आणि भविष्यातील वाद टाळता येतात. एकंदरीत, बिल्डरने ३ वर्षांच्या आत फ्लॅट दिला नाही तरी करदात्याने घाबरण्याची गरज नाही. कायद्याच्या कडक अटी असूनही न्यायालयीन निर्णय करदात्याच्या बाजूने आहेत आणि कलम ४५(५अ) मुळे कराची देयता पुढे ढकलता येते. योग्य नियोजन आणि व्यावसायिक सल्ल्याच्या मदतीने पुनर्विकासातील आयकराचा धोका मोठ्या प्रमाणात कमी करता येतो आणि करमाफीचा पूर्ण लाभ घेता येतो. ▮

९०९६३३२३५३

(लेखक कर व मालमत्ता हस्तांतरण सल्लागार आहेत.)

## वाचक पत्रे

### मराठी अस्मितेचा आणि संघर्षाचा गौरव सोहळा आज

१ मे हा दिवस प्रत्येक मराठी माणसासाठी केवळ दिनदर्शिकेतील एक तारीख नसून तो स्वाभिमानाचा, बलिदानाचा आणि गौरवाचा सण आहे. १९६० साली याच दिवशी नकाशावर 'महाराष्ट्र' हे स्वतंत्र राज्य अवतरले. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भाषेच्या आधारावर राज्यांची पुनर्रचना करण्याची मागणी जोर धरू लागली होती. परंतु, तत्कालीन केंद्र सरकार मुंबईसह महाराष्ट्र राज्य देण्यास अनुकूल नव्हते. या अन्यायाविरुद्ध 'संयुक्त महाराष्ट्र समिती'च्या नेतृत्वाखाली अभूतपूर्व लोकचळवळ उभी राहिली. मुंबई महाराष्ट्राला मिळावी यासाठी झालेल्या आंदोलनात १०६ आंदोलकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. त्यांच्या या बलिदानामुळेच केंद्र सरकारला नमते घ्यावे लागले. अखेर १ मे १९६० रोजी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाली. १ मे हा दिवस साजरा करताना आपण केवळ आनंद व्यक्त न करता, महाराष्ट्राची परंपरा जपण्याचा आणि राज्यात असलेल्या लव्ह जिहादसारख्या गंभीर समस्या समूळ नष्ट करून राज्याला खऱ्या अर्थाने अधिक प्रगत आणि सुरक्षित करण्याचा संकल्प केला पाहिजे.

**वर्षा आवदे**/नागपूर

●● ●●

### नको करू पर्यावरणाचा नाश...

पर्यावरण संरक्षण ही काळाची गरज ओळखून समाजात प्रत्येक स्तरावर याकरिता काम करणे हे मनुष्याचे कर्तव्य आहे. कारण निसर्ग हे मानव, प्राणी, पक्षी आणि वनस्पती यांना लाभलेले एक मोठे वरदान आहे. पृथ्वीवरील सजीवांचे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी पर्यावरणाचे रक्षण व संवर्धन करणे अत्यंत गरजेचे आहे. परंतु, सध्याच्या औद्योगिक आणि आधुनिक युगात मानवी क्रियाकलापांमुळे पर्यावरणाचा समतोल बिघडत चालला आहे. पर्यावरणाचे रक्षण करणे म्हणजे केवळ झाडे लावणे नव्हे, तर निसर्गाचा समतोल राखणे होय. मानवाच्या स्वार्थी आणि बेजबाबदार वागणुकीमुळे पर्यावरणाचे नुकसान होत आहे. विकासकामांच्या नावाखाली वनांची कत्तल होत आहे. उद्योगधंदे, वाहनांचा धूर आणि रासायनिक कचऱ्यामुळे हवा, पाणी आणि जमीन प्रदूषित होत आहे. शिवाय प्लॅस्टिक प्रदूषणामुळे जलचरांचे, जमिनीवरील प्राण्यांचे आणि जमिनीचे आरोग्य धोक्यात आले आहे. पर्यावरणाचा समतोल न ठेवल्याने, हरितगृह वायूंचे प्रमाण वाढल्यामुळे पृथ्वीचे तापमान वाढत आहे, ज्यामुळे हवामान बदल होत आहे. तसेच तापमानात बरेच बदल होताना पाहायला मिळतात आणि जागतिक तापमानवाढ यासारखे शब्द कानावर पडतात. पर्यावरणाचा ऱ्हास यामागे नैसर्गिक संसाधनांचा गैरवापर हे एक कारण आहे. यात प्रामुख्याने पाणी, खनिजे आणि इतर नैसर्गिक साधनांचा अमर्याद वापर केल्यामुळे ती संपत चालली आहेत. तेव्हा पर्यावरणाचे रक्षण व संवर्धनाचे उपायांतर्गत प्रथम पर्यावरणाचा ऱ्हास थांबवण्यासाठी आणि वसुंधरेचे रक्षण करण्यासाठी विचार करणे आणि उपाययोजना करणे आवश्यक आहे. दरवर्षी नवीन झाडे लावणे आणि ती जगवणे हे सर्वात महत्त्वाचे पाऊल वृक्षारोपण आणि संवर्धनातंर्गत करणे गरजेचे आहे. पुनर्वापर आणि कमी वापर करणे, प्लॅस्टिकचा वापर टाळणे आणि कचरा कमी करणे तसेच सौर ऊर्जा, पवन ऊर्जा यांसारख्या हरित उर्जेचा अपारंपरिक आणि प्रदूषणमुक्त ऊर्जा स्रोतांचा वापर वाढवण्याकडे विशेष भर देणे व याकरिता आकर्षक विविध योजना राज्यस्तरावर राबविणे गरजेचे आहे. प्रदूषण नियंत्रणावरही विशेष कार्य करण्याची विविध विभागाने कार्य करणे आवश्यक आहे. जसे सांडपाण्यावर प्रक्रिया करणे, वाहनांचा कमी वापर करणे आणि कारखान्यांचा धूर फिल्टर करणे, सामाजिक दायित्वाच्या दृष्टिकोनातून पर्यावरणाचे महत्त्व समजून घेणे आणि इतरांनाही त्याबद्दल जागरूक करणे अपरिहार्य आहे. कारण पर्यावरणाचा समतोल बिघडणे म्हणजे मानवाच्या अस्तित्वाला धोका निर्माण होणे होय. त्यामुळे आपली पृथ्वी वाचवण्यासाठी आणि भावी पिढीसाठी स्वच्छ, सुंदर पर्यावरण ठेवण्यासाठी प्रत्येकाने आपली नैतिक जबाबदारी ओळखून पर्यावरणाचे रक्षण वरील मुद्यांचे आधारे करणे आवश्यक आहे असे मला वाटते. ▮

**संजय श्रौती**/९८६०४५१८४०

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.

प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87

stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# सुट्टीची घ्या मजा परंतु अभ्यासाला नको रजा ....

मनुष्य हा असा एक प्राणी आहे जो निरंतर शिक्षण घेत असतो .मग ते सामाजिक ,आर्थिक अध्यात्मिक असो वा वैज्ञानिक, शाळेअंतर्गत असो वा शाळाबाह्य. शिक्षण हे अविरत चालू राहणारी प्रक्रिया आहे. आपल्या दैनंदिन हालचालींमधून छोट्या छोट्या कार्यामधून आपल्याला वेगवेगळे अनुभव येत असतात आणि त्यामधूनच आपण काही ना काही शिकत असतो. सातत्याने त्याची घडण होत असते .सध्याचे युग स्पर्धेचे, काहीतरी नाविन्यपूर्ण करण्याचे, घडण्याचे आणि घडविण्याचे आहे. त्यामुळे सातत्याने काहीतरी शिकण्याचा ध्यास मनी घेतला पाहिजे. विशेषतः विद्यार्थ्यांमध्ये याची जाणीव सातत्याने होणे आवश्यक आहे. उन्हाळ्याच्या सुट्टीची मजा घेत आपल्या ध्येयाकडे वाटचाल कशा प्रकारे करावे याचे योग्य नियोजन करणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांसाठी

-आत्मपरीक्षण करणे गरजेचे आहे -आपण कुठल्या विषयांमध्ये कमी पडत आहोत,त्यासाठी काय करणे आवश्यक आहे याचे आत्मपरीक्षण करणे गरजेचे आहे.

*- आपल्या मधील सुप्त गुण शोधून त्याला विकसित करणे गरजेचे आहे.

बी द बेस्ट याप्रमाणे कुठलेही कार्य हाती घेतले तर त्याला आपल्या कुशलतेचा वापर करून परिपूर्ण करण्याचा प्रयत्न करणे गरजेचे आहे.

मूलभूत संकल्पना समजून घेऊन वारंवार अवांतर वाचन करून लेखन आणि त्याचे मनन करणे गरजेचे आहे .

.नवीन काही चांगले शिकताना सुरुवातीला ते कठीण वाटू शकते परंतु सातत्याने सराव केले असता सोपे होत त्यासाठी सातत्याने सराव करणे गरजेचे आहे .

तुम्ही जीवनात काय मिळवतायेत हे तुमच्या रोजच्या सवयीवर अवलंबून असते. त्यामुळे चांगल्या सवयी अंगीकारणे महत्त्वाचे आहे.

यश हे रोजच्या छोट्या सवयीमधून निर्माण होते . अपयश हे वाईट सवयी मधून तयार होते .

दररोज केलेले छोटे छोटे सकारात्मक बदल आपणास यशस्वी करतात.*-

व्यायाम करणे, ध्यानधारणा करणे, वेळेचे नियोजन करणे, अत्यंत आवश्यक आहे. विज्ञान ,गणित, इंग्रजी विषयांची शब्दसंपत्ती वाढवणे गरजेचे आहे .वाचन करताना अर्थ लक्षात येईल, लिहिताना त्याचे स्पेलिंग चुकणार नाही ,आणि बोलताना स्पष्ट उच्चार केला तर तुमची भाषाशैली सुधारेल कारण तुम्हाला माहिती आहे उच्चारातून विद्वत्ता ,आवाजातून नम्रता, वर्तनातून शील आणि स्वभावातून संस्कार समजतात म्हणून शब्द ,आवाज आणि वर्तन याची विद्यार्थ्यांमध्ये जडणघडण होणे गरजेचे आहे .

किमान प्रत्येक विषयाचे दररोज पाच शब्द समजून घेऊन लक्षात ठेवणे गरजेचे आहे. गणिताचे पाढे लिहिणे, इंग्रजीच्या कविता समजून घेऊन लक्षात ठेवणे, विज्ञान ,इतिहास, भूगोल धड्यांचे वारंवार वाचन करणे ,हिंदी, मराठी या सारख्या भाषा विषयांचे धडे समजून घेऊन वारंवार वाचणे आवश्यक आहे. हे जरी तुम्ही सकाळी तीन तास आणि संध्याकाळी तीन तास सुट्टीमध्ये बसून सर्व विषयाचा अभ्यास करून घेतला तर पुढील येणाऱ्या वर्षांमध्ये तुमच्या संकल्पना स्पष्ट होऊन तुम्ही शैक्षणिक कौशल्य विकसित करू शकता . त्याचबरोबर ध्येयनिश्चित करणे, वेळेचे बंधन पाळणे, परमेश्वराची भक्ती करणे ,संयम ठेवणे, रागावर ताबा मिळविणे, अन्न, पाणी, विज वाया न घालवणे, मोठ्यांचा आदर करणे या गोष्टी देखील अतिशय महत्त्वाच्या आहेत . सर्व अभ्यास करत असताना आपले छंद देखील जोपासले गेले पाहिजेत, ज्या गोष्टींमध्ये , मैदानी खेळामध्ये, संगीत ,नृत्य इत्यादी मधील आवड आहे त्यातील कौशल्य विकसित करणे गरजेचे आहे.

अशक्य असे काहीच नसते ... एखाद्या कामामध्ये अडचण निर्माण झाली की असा ग्रह होतो की ते काम अशक्य आहे. परंतु कुठलेही कार्य प्रयत्नाने सातत्याने आणि नियोजनाने परिपूर्ण होऊन यशस्वी होते. त्याकरता सुट्टी मध्ये भरपूर खेळा, भरपूर मजा करा परंतु नियोजनपूर्वक अभ्यास करा .

स्वतःमध्ये चांगले गुण निर्माण करणे इतरांचे चांगले गुण घेणे, सत्य बोलणे ,आळस सोडणे, वडीलधाऱ्यांचा आदर करणे, मोबाईलचा वापर टाळणे , इत्यादी गोष्टी तुम्ही दररोज करण्याचा प्रयत्न केला तर नक्कीच तुम्हाला यश प्राप्त होऊ शकते. चला तर मग चांगल्या गोष्टींची सुरुवात करू आणि आपणच आपल्या आयुष्यात सुंदर रंग भरू.

सौ .अश्विनी वासुदेवराव टेकाळे (जोशी) . सहशिक्षिका बीड

# आहात तसाच जीवनाचा स्विकार करा आपोआपच जीवन बदलेल -ॲड.श्रीकांत माळकर

## महिला आत्मभान प्रशिक्षण शिबीराचे उद्‌घाटन



अंबाजोगाई :- योगेश्वरी शिक्षण संस्था संचलित योगेश्वरी क्रीडा प्रबोधिनी,कमल खुरसाळे स्मृती न्यास,श्रीमती गोदावरीबाई कुंकूलोळ योगेश्वरी कन्या शाळा व स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित महिला आत्मभान प्रशिक्षण शिबीराच्या उद्घाटन समारंभात यशोगाथा... जिद्द व ध्येयवेड्या माणसांची या विषयावर मार्गदर्शन करताना ॲड. श्रीकांत माळकर समोर प्रशिक्षणार्थी विद्यार्थिनी दिसत आहेत..... छाया:- जयराम लगसकर......

**अंबाजोगाई |** मुलींच्या सर्वांगिण विकासासाठी व व्यक्तिमत्वाला आकार देण्यासाठी अशी शिबीरे आवश्यक असतात योगेश्वरी शिक्षण संस्थेने गेल्या १७ वर्षापूर्वी आत्मभान शिबीर सुरू केले व ते आजही तितक्या जोमाने यशस्वीपणे सुरू आहे ही अत्यंत महत्वाची असून या शिबीरातून मुलींना भविष्याबद्दलची दिशा मिळेल आहात तसाच जीवनाचा स्विकार करा आपोआपच जीवन बदलेल असे मत कोल्हापुर येथील समुपदेशक ॲड.प्रा. श्रीकांत माळकर यांनी व्यक्त केले.

ते योगेश्वरी शिक्षण संस्था संचलित योगेश्वरी क्रिडा प्रबोधिनी,श्रीमती कमल खुरसाळे स्मृती न्यास,स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालय, श्रीमती गो.कु.यो. कन्या विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी आयोजित महिला आत्मभान प्रशिक्षण शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर होते.व्यासपीठावर यो.शि.संस्थेचे सचिव कमलाकर चौसाळकर, सल्लागार एन.के. गोळेगांवकर,एम. एस. लोमटे,संचालक सय्यद पाशुमियाँ,डॉ.जे.बी. मोटेगावकर, आर.व्ही. सोनवळकर, प्राचार्य डॉ.प्रशांत देशमुख,शालेय पदाधिकारी आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना ॲड. श्रीकांत माळकर म्हणाले की, नकारात्मकता जीवनातून काढून टाकली पाहिजे त्याच बरोबर परिस्थिती बद्दल तक्रार नसावी तरच पुढील प्रवास सुखकारक होईल. वरचेवर काळ बदलत असून समाज माध्यमे हे एक अविभाज्य घटक बनली आहेत. त्याच्यातील जे चांगले आहे ते घेतले पाहिजे येणाऱ्या संकटांना सकारात्मकपणे सामोरे जाण्याची तयारी ठेवावी असेही ते म्हणाले. अध्यक्षीय समारोपात चंद्रशेखर बर्दापुरकर म्हणाले की, योगेश्वरी शिक्षण संस्थेने सुरू केलेल्या महिला आत्मभान प्रशिक्षण शिबीराच्या माध्यमातून स्वतःचे व्यक्तिमत्व विकसित करण्याची संधी मुलींना प्राप्त झाली असून यातूनच जीवनात जडणघडण होते.परीक्षेतील गुण म्हणजे गुणवत्ता नव्हे तर जीवनातील स्वतःची उत्तम जडण घडण,चांगली वर्तणुक याची सांगड घालून आपण जगत असलेले व्यक्तिमत्व म्हणजे जीवन व प्रगती असल्याचे त्यांनी सांगितले.प्रारंभी प्रास्तविकातून मुख्याध्यापिका एम. एस.कुलकर्णी यांनी शिबीरा बाबतचा उद्देश सांगितला.पोलीस भरतीत निवड झाल्याबद्दल यो.शि.संस्थेच्या माजी विद्यार्थिनी सोनाली खाडप, पुजा गडदे , दिव्या कदम यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस मान्यवरांच्या उपस्थितीत महापुरुषांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करण्यात आली.

यावेळी शहरातील

# नोंदणी व मुद्रांक विभागाच्या नव्या इमारतीचे लोकार्पण संपन्न






**अंबाजोगाई |** नोंदणी व मुद्रांक विभाग अंतर्गत सह दुय्यम निबंधक वर्ग-२ कार्यालय, अंबाजोगाई येथील नव्या इमारतीचा लोकार्पण सोहळा शुक्रवार, दि. १ मे २०२६ रोजी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

या कार्यक्रमाचे शुभहस्ते केज विधानसभा मतदारसंघाच्या आमदार मा. सौ. नमितताई अक्षय मुंदडा यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगर परिषद अंबाजोगाईचे अध्यक्ष श्री. नंदकिशोरजी मुंदडा होते.

यावेळी विशेष निमंत्रित म्हणून अप्पर जिल्हाधिकारी श्रीमती अश्विनी जिरंगे, उपविभागीय अधिकारी श्री. दीपक वाजले, तहसीलदार श्री. विलासी लाटा, नोंदणी उप महानिरीक्षक तथा मुद्रांक उपनियंत्रक (छत्रपती संभाजीनगर) श्री. व्ही. एस. भालेराव तसेच सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी (बीड) श्री. ए. बी. आटोळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे आयोजन श्री. जी. पी. स्वामी (वाय) व सह दुय्यम निबंधक वर्ग-२ अंबाजोगाई श्री. पी. डी. दहिवाळ यांच्या वतीने करण्यात आले होते. उपस्थित मान्यवरांनी नव्या इमारतीमुळे नागरिकांना अधिक सोयीस्कर व दर्जेदार सेवा मिळतील, असा विश्वास व्यक्त केला.

या इमारतीच्या बांधकामाचे काम मे. यश कन्स्ट्रक्शन कंपनीकडून पूर्ण करण्यात आले असून, कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

# सुंदरराव सोळंके महाविद्यालयाचे बारावी परीक्षेत उज्वल यश

**माजलगाव (प्रतिनिधी)|** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या फेब्रुवारी 2026 बारावीच्या परीक्षेचा निकाल जाहीर झाला असुन यामध्ये सुंदरराव सोळंके महाविद्यालयाने निकालाची उज्वल परंपरा कायम ठेवली आहे.यामध्ये विज्ञान शाखाचा ८३.०८ टक्के, कला शाखेचा ४३.९५ टक्के, वाणिज्य शाखेचा ५० टक्के, व्यावसायिक अभ्यासक्रम ६६.१२ टक्के निकाल लागला आहे .

बारावीच्या परीक्षेत सुंदरराव सोळंके महाविद्यालयातील विज्ञान शाखेतुन प्रथम रेदासनी आलेक प्रमोद(८७.५ %), द्वितीय कुलकर्णी सुमेधा महेश (८५.८३% ), तृतीय इंद्राणी वरद दत्तप्रसाद(८३.१७ %), कला शाखातुन प्रथम बोरगे प्रज्ञा साहेबराव (७३.१७ %),द्वितीय पठाण सादिया अन्सर खान (७२.६७ %),तृतीय राऊत करण कारभारी (६८.८३%) तर वाणिज्य शाखा: प्रथम शर्मा सक्षम मनोज (८२.१७%), द्वितीय कासट खुशी विवेकानंद (७९.८३%), तृतीय धारक आदित्य भगवानराव (७८%) तर व्यावसायिक अभ्यासक्रम: प्रथम नवघरे रूपाली दगडोबा (७९.१७%), द्वितीय घेवारे अश्विनी आसाराम (७५% ), तृतीय यादव रंजना प्रकाश (७३.५०%) यांनी यश संपादन केले. बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे म.शि. प्र. मंडळाचे अध्यक्ष आ.प्रकाश सोळंके, सरचिटणीस आ. सतीश चव्हाण यांच्यासह विकास समिती सदस्य ॲड.भानुदासराव डक,माजी आ. राधाकृष्ण होके पाटील, सत्यप्रकाश रुद्रवार, डॉ.बी.एल.चव्हाण, प्राचार्य डॉ.जी. के.सानप, प्रभारी प्राचार्य डॉ.एन.के. मुळे, उपप्राचार्य प्रकाश गवते, उपप्राचार्य पवन शिंदे, पर्यवेक्षक महादेव अलझेंडे ,स्वप्निल टाक, प्रबंधक प्रशांत चव्हाण यांनी अभिनंदन केले.

# श्री घाटनागनाथ प्राथमिक आणि जोधाप्रसादजी मोदी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात महाराष्ट्र दिनानिमित्त ध्वजारोहण

**अंबाजोगाई |** येथील श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित मानव विकास निवासी मूकबधिर, मतिमंद व अपंग विद्यालय तसेच घाटनागनाथ प्राथमिक विद्यालय आणि जोधाप्रसादजी मोदी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय यांचा १ मे महाराष्ट्र दिन साजरा करून ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी प्रमुख अतिथी सामाजिक कार्यकर्ते मतीन जरगर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे संस्थापक सचिव राजकिशोर मोदी, नगरपालिकेचे गटनेते सय्यद ताहेर, बांधकाम सभापती नजीर मुन्ना पठाण, मार्गदर्शक प्रा.वसंत चव्हाण, सुनिल जगताप, ॲड.अनिल लोमटे, भिमसेन लोमटे, जावेद गवळी, माजी मुख्याध्यापक चंद्रकांत गायकवाड, पुरूषोत्तम चोकडा, कचरूलाल सारडा, सुनिल वाघाळकर, सुधाकर टेकाळे, विशाल पोटभरे, अशोक देवकर, सुभाष पानकोळी, अंबाजोगाई पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँकेचे मुख्यकार्यकारी अधिकारी धनंजय देशपांडे, सोमनाथ धोत्रे, चेतन मोदी, सय्यद अमजद, सुदाम देवकर, बद्रीनाथ सोमवंशी, जीवन घाडगे, सुशीलकुमार वाघमारे, बाबुराव मुंडे, अजय रापतवार आदी मान्यवरांसह याप्रसंगी सर्व शाळेचे मुख्याध्यापक आनंद टाकळकर, विनायक मुंजे, संध्या सोळंके आणि आप्पासाहेब चव्हाण हे उपस्थित होते. सर्व मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये ध्वजारोहण करून राष्ट्रगीत, राज्य गीत आणि वंदे मातरम यांचे उत्कृष्ट सादरीकरण शंकर सिनगारे व त्यांच्या विद्यार्थ्यांनी केले. ध्वजारोहणाची संपूर्ण जबाबदारी बालाजी अंबाड आणि नानासाहेब गायके यांनी यशस्वीपणे पार पाडली. याप्रसंगी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

याप्रसंगी दिनांक १ मे २०२६ रोजी इयत्ता ५ वी ते ९ वीच्या विद्यार्थ्यांना वार्षिक निकाल पत्रक देऊन गौरविण्यात आले. महाराष्ट्र दिनी विद्यार्थ्यांमध्ये महाराष्ट्रा बद्दल अभिमान वाढवा यासाठी विविध प्रेरणादायी गीते गाण्यात आली.

# परळीत सोमवारी मांस विक्री बंदीचा ऐतिहासिक निर्णय; सर्वानुमते ठराव मंजूर



परळी वैजनाथ (वार्ताहर)

परळी नगरपरिषदेच्या दि. 30 एप्रिल 2026 रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत “प्रत्येक सोमवारी मांस विक्री बंदी” या महत्त्वपूर्ण विषयास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. परळी हे बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक पवित्र तीर्थक्षेत्र असल्यामुळे नागरिक व भाविकांच्या भावना लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला.

यापूर्वी दि. 20 एप्रिल 2026 रोजी झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीत हा विषय समाविष्ट करण्यात आला होता. त्यानंतर आजच्या सर्वसाधारण सभेत हा विषय मांडून अंतिम मंजुरी देण्यात आली.

परळी नगरपरिषदेच्या थेट लोकनिर्वाचित नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांच्या नेतृत्वाखाली हा निर्णय घेण्यात आला असून, त्यांच्या “विकास पर्व 2.0” या संकल्पनेतून जनभावना, धार्मिक संवेदनशीलता आणि स्थानिक गरजा यांचा समतोल साधणारे प्रशासन दिसून आले. शहराच्या सर्वांगीण विकासाबरोबरच परळीच्या पवित्रतेचा सन्मान राखण्याचा त्यांचा दृष्टीकोन या निर्णयातून अधोरेखित झाला आहे.

या निर्णयासाठी मा. पंकजाताई गोपीनाथराव मुंडे (पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री, महाराष्ट्र राज्य) व मा. आमदार धनंजय मुंडे यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच उपनगराध्यक्षा सौ. खैसर राजा खान पठाण, गटनेते तसेच सर्व नगरसेवक-नगरसेविका यांच्या एकमताने हा ठराव मंजूर करण्यात आला.

या संदर्भात सामाजिक कार्यकर्ते श्री. शिवकुमार केदारी (हिंद नगर, परळी वैजनाथ) यांनी या निर्णयाचे स्वागत करत सर्व पदाधिकारी व सदस्यांचे मनःपूर्वक आभार मानले. तसेच या विषयाला व्यापक प्रसिद्धी देणाऱ्या सर्व पत्रकार, ऑनलाइन न्यूज चॅनल व टीव्ही प्रतिनिधी यांचेही त्यांनी विशेष आभार व्यक्त केले.

# बीडमध्ये सामुदायिक व्रतबंध सोहळा; परंपरा जपत संस्कारांचा उत्सव




बीड / प्रतिनिधी

बीड शहरात सामाजिक एकोप्याचे आणि संस्कार जपण्याचे उत्कृष्ट उदाहरण ठरणारा सामुदायिक व्रतबंध (उपनयन) सोहळा आयोजित करण्यात आला आहे. परशुराम संस्कार सेवा संघ बीड यांच्या वतीने दि. 4 मे 2026 रोजी साई पंढरी, अंकुश नगर येथे हा उपक्रम पार पडणार आहे.

संघाच्या वतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी हा उपक्रम राबविण्यात येत असून, गेल्या दहा वर्षांपासून सातत्याने समाजहिताचे कार्य सुरू आहे. आतापर्यंत जवळपास 200 बटूंचे व्रतबंध संस्कार यशस्वीरीत्या पार पडले असल्याची माहिती पदाधिकाऱ्यांनी दिली.

सदर उपनयन संस्कार सोहळा सोमवार, दि. 4 मे 2026 रोजी सकाळी 10.30 वाजता होणार असून, या कार्यक्रमात पूजा विधी साहित्य, सोवळे, बटूंना दंड, गुरुजींची दक्षिणा तसेच बटू आणि त्यांच्या सुमारे 100 नातेवाईकांच्या भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे. यासोबतच मातृभोजनाचाही समावेश करण्यात आला आहे. समाजातील सर्व स्तरांतील नागरिकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा आणि आपल्या संस्कृतीचे जतन करण्यासाठी या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन संघाच्या वतीने करण्यात आले आहे.

# शासकीय हमीभाव खरेदी केंद्रांवर हरभरा खरेदीस 15 मे पर्यंत मुदतवाढ द्यावी - धनंजय मुंडे

## लेखी पत्राद्वारे पणन मंत्री जयकुमार रावल यांना केली मागणी

परळी वैद्यनाथ (प्रतिनिधी) - केंद्र व राज्य सरकारने शासनामार्फत महाराष्ट्र राज्य मार्केटिंग फेडरेशन - नाफेड द्वारा शासकीय दराने सुरू केलेली चना (हरभरा) खरेदी २९ एप्रिल पर्यंत सरू ठेवण्याचे निर्देश होते मात्र सदर हमीभाव खरेदी पोर्टल २४ एप्रिल रोजीच बंद करण्यात आले असून शासकीय हमीभाव चना खरेदी केंद्रावर खरेदीसाठी १५ मे पर्यंत मुदतवाढ देण्यात यावी, अशी विनंती माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांनी लेखी पत्राद्वारे पणन मंत्री ना. जयकुमार रावल यांना केली आहे.



नाफेड द्वारा शासकीय हमीभाव खरेदी केंद्रांवर प्रति क्विंटल ५,८७५ रुपये प्रमाणे चना खरेदी करण्यात येत होता. यासाठी पणन विभागाने पोर्टलवर नोंद करण्यासाठी २९ एप्रिल पर्यंत मुदत दिली होती. मात्र २४ एप्रिल रोजीच हमीभाव खरेदी करिता नोंदणी करण्याचे पोर्टल बंद करण्यात आल्याने शेतकऱ्यांनी नोंदी करूनही हजारो क्विंटल चना (हरभरा) शिल्लक असल्याने संबंधित शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत.

त्यामुळे शासनाचे याची तात्काळ दखल घेऊन चना खरेदीस १५ मे पर्यंत मुदतवाढ देण्याची लेखी पत्राद्वारे मागणी धनंजय मुंडे यांनी केली असून, पणन विभाग सकारात्मक निर्णय घेईल, अशी अपेक्षा हरभरा उत्पादक शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

# नगर परिषदेची सर्वसाधारण सभा : परळीच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वानुमते अनेक महत्त्वाचे निर्णय !

## नागापूर येथील जलशुद्धीकरण प्रकल्पाजवळ १ मेगावॅट क्षमतेचा सौर प्रकल्प, पाणी पुरवठा, मुलभूत सुविधा, अग्निशमन आदी विषयांसंबधित निर्णयांवर सभागृहात शिक्कामोर्तब

परळी वैजनाथ (प्रतिनिधी) —

नगर परिषद परळी वैजनाथची सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या व विकासाभिमुख चर्चेच्या वातावरणात पार पडली. शहराच्या सर्वांगीण प्रगतीसाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय यावेळी सर्वानुमते घेण्यात आले. सभेत सदस्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत विविध विधायक सूचना मांडल्या. नागापूर येथील न.प.च्या जलशुद्धीकरण प्रकल्पाजवळ १ मेगावॅट क्षमतेचा सौर प्रकल्प, पाणी पुरवठा,मुलभूत सुविधा, अग्निशमन, सोमवारी मांस विक्री बंदी, सरस्वती नदी पुनरुज्जीवन प्रकल्प सात सदस्यीय अभ्यास समिती,आवश्यक रस्त्यांसाठी भूसंपादन प्रस्ताव करणे,आवश्यक साधनसामुग्री व मनुष्यबळ आदी सर्वंकष विषयांवर सभागृहात साधकबाधक चर्चा, संवाद व सर्वसमावेशी सुचनांनंतर महत्त्वपूर्ण निर्णयांवर शिक्कामोर्तब करण्यात आल्याची माहिती नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी दिली.

परळी वैजनाथ नगर परिषदेची सर्वसाधारण सभा नगराध्यक्ष सौ.पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली आज नगरपरिषद सभागृहात पार पडली या सर्वसाधारण सभेत विविध विषयावर सर्व सदस्यांची मते जाणून घेऊन चर्चा करण्यात आली त्यानंतर सभागृहाने अनेक महत्त्वपूर्ण विषयांना मंजुरी दिली. यामध्ये नागापूर येथील जलशुद्धीकरण प्रकल्पाजवळ नगर परिषदेच्या जागेवर १ मेगावॅट क्षमतेचा सौर प्रकल्प उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. सुमारे ४ कोटी २ लाख ९३ हजार रुपयांच्या या प्रकल्पामुळे शहरासाठी पाणी लिफ्ट करण्यासाठी होणारा दरमहा सुमारे २७ लाख रुपयांचा वीज खर्च वाचणार असून, नगर परिषदेच्या अर्थकारणाला मोठा दिलासा मिळणार आहे.तसेच शहरातील स्वच्छता व पर्यावरण व्यवस्थापन अधिक सक्षम करण्यासाठी जेटिंग सुविधेसह ट्रक-माउंटेड पाण्याचे दोन टँकर आणि डस्ट सक्शन मशीन खरेदीस मंजुरी देण्यात आली. यामुळे सार्वजनिक स्वच्छता, वृक्षांना पाणीपुरवठा आणि अग्निशमन विभागावरील ताण कमी होण्यास मदत होणार आहे.

पाणीपुरवठा विभागातील वार्षिक देखभाल-दुरुस्तीची कामे तत्काळ हाती घेऊन जलपुरवठा अधिक सक्षम करण्याची मागणीही सभेत करण्यात आली.तसेच घनकचरा व्यवस्थापनाशी संबंधित उपाययोजनांबाबत माहिती देत शहरातील मूलभूत सुविधा अधिक प्रभावी करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. शिवसृष्टी प्रकल्पासाठी लवकरात लवकर जागा उपलब्ध करून देऊन मंजूर




निधीतून काम सुरू करण्याची मागणी करण्यात आली. याशिवाय एमआरटीपी कायद्यानुसार विश्वकर्मा भवन ते चांदापूर रस्ता आणि भोई गल्लीतील पारंपरिक मार्ग तीर्थक्षेत्र योजनेत समाविष्ट करण्याबाबतही सभेत चर्चा झाली. वैद्यनाथ नगरीत सोमवारी मांस विक्री बंदीच्या ठरावाची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या.सरस्वती नदीवरील सुरु असलेल्या विकास कामांबाबत काही सदस्यांनी पर्यावरणीय दृष्टीकोनातून नदीपात्रात कॉंक्रिट न टाकण्याची मागणी केली. यावर सकारात्मक प्रतिसाद देत नगराध्यक्षांनी संबंधित प्रकल्पासाठी गटनेते वैजनाथ सोळंके यांच्या अध्यक्षतेखाली सात सदस्यीय समिती स्थापन करण्याची घोषणा केली. तसेच पर्यावरण तज्ञांच्या सल्ल्यानुसार आवश्यक बदल शासनाला कळविण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

अग्निशमन विभाग अधिक सक्षम करण्यासाठी अनुभवी पाच कंत्राटी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्याचा निर्णयही घेण्यात आला. यामुळे आपत्कालीन परिस्थितींना अधिक प्रभावी प्रतिसाद देता येणार आहे.दरम्यान, गंगासागर नगर ४० फूट रस्ता, अंबेवेस ते चांदापूर मार्ग तसेच भाजी मंडई परिसरातील रस्त्यांसाठी भूसंपादन प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला. सभेत सर्व सदस्यांनी परस्परांच्या मतांचा आदर राखत विकासाला प्राधान्य दिले. दीर्घ चर्चेनंतर अनेक महत्त्वपूर्ण निर्णय सर्वानुमते मंजूर करत सभा यशस्वीरित्या संपन्न झाली अशी माहिती नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी दिली.

या सर्वसाधारण सभेला नगराध्यक्ष सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांच्यासह उपनगराध्यक्षा खैसर राजा खान पठाण ,सर्व सभापती, सर्व सदस्य, सदस्या, मुख्याधिकारी, उपमुख्य अधिकारी, विभागप्रमुख अधिकारी आदी उपस्थित होते.

तब्बल दीड तास चालली सभा; प्रदीर्घ चर्चा, अनेक सदस्यांच्या आयत्या वेळेच्या विषयांना नगराध्यक्षांनी दिली संधी

दरम्यान आजच्या सर्वसाधारण सभेत अनेक विषयांवर प्रदीर्घ चर्चा करण्यात आली. तब्बल दीड तास सभागृहाचे कामकाज चालले. सर्वसाधारण सभेत प्राधान्याने विषय सूचीनुसार दिलेल्या विषयांवर आणि अध्यक्षांच्या अनुमतीने काही मोजक्या आयत्या वेळच्या विषयावर चर्चा होण्याचा प्रघात असतो. मात्र विषयसूची वरील विषयांवर साधक बाधक महत्त्वपूर्ण चर्चेला आवश्यक तो सर्व वेळ देऊन, सर्वांची मते जाणून घेऊन, सर्वांच्या सूचनांचा स्वीकार करून त्यावर आवश्यक त्या सर्व विभागांना निर्देशित करत नगराध्यक्ष सौ. पद्मश्रीताई धर्माधिकारी यांनी अतिशय प्रभावीपणे सभागृहाचे कामकाज चालवले. विशेष म्हणजे नगर परिषदेच्या इतिहासात आयत्या वेळच्या विषयांना फारसा वेळ दिला जात नाही परंतु सभागृहातील सदस्यांच्या भावना लक्षात घेत त्यांच्या त्यांच्या प्रभागातील काही निवडक विषय मांडण्याचा दृष्टिकोनातून आयत्यावेळी आलेल्या विषयांना अनुमती देत नगराध्यक्षांनी संबंधित सदस्यांचे म्हणणे ऐकून घेतले तसेच तात्काळ त्या त्या विभागांना निर्देशित केले. लोकशाही प्रक्रियेतील अतिशय महत्त्वाच्या अशा या सर्व समावेशक कामकाज चालविण्याच्या मुद्द्याने नगराध्यक्षांनी आपल्या कामकाजाची अनोखी चुणूक दाखवून दिली.

बैठक अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे.

स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी रविवारी | के १०० वर्ष– विषयावरील | नए क्षितिज’ या सरसंघचालकांचे | संघटन, आहेत. | समित्या, त्यांनी सल्ला, | कार्यपद्धती मार्गदर्शन | ते मूळचे स्वयंसेवक आहे. त्यामुळे त्यांच्या कार्याचे पुण्य त्यांच्याकडे | आमच्यावर येते, ते आम्ही घेतो. कारण ते मुळात इथून गेले. तेवढा | सभागृहात टाळ्यांचा कडकटाट झाला.

तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# शेतकऱ्यांच्या मागणीनुसार खतांचा पुरेसा साठा उपलब्ध ठेवा- झिरवाळ

## खरीप हंगाम, पाणीपुरवठा, कृषी नियोजनाचा घेतला आढावा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ मे**

जिल्ह्यातील शेतकऱ्यांची खरिप हंगामाच्या पार्श्वभूमीवर वाढती मागणी लक्षात घेता रासायनिक खतांचा कोणत्याही परिस्थितीत तुटवडा पडता कामा नये. खत पुरवठा सुरळीत राहण्यासाठी जिल्हा प्रशासनाने आवश्यक ती खबरदारी घेऊन साठा, वितरण व उपलब्धतेवर सातत्याने लक्ष ठेवण्याचे निर्देश अन्न व औषध प्रशासन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांनी दिले. तसेच जिल्ह्यात पाणीटंचाई, चारा टंचाईच्या अनुषंगाने आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात. खताची कृत्रिम टंचाई निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. सध्या उन्हाचा पारा जास्त असून उन्हापासून संरक्षण करावेत, असे आवाहन पालकमंत्री झिरवाळ यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित खरिप हंगाम २०२६ पूर्वतयारी, पाणीटंचाई निवारण, कृषी निविष्ठा उपलब्धता तसेच केंद्र व राज्य शासन पुरस्कृत योजनांच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी खासदार नागेश पाटील-आष्टीकर, आमदार हेमंत पाटील, आमदार तान्हाजी मुटकुळे, आमदार राजू नवघरे, जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, जिल्हा पोलीस अधीक्षक नीलभ रोहण, अपर जिल्हाधिकारी महेंद्रकुमार कांबळे, अपर पोलीस अधीक्षक कमलेश मीना, निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोधवड यांची प्रमुख उपस्थिती होती.

या बैठकीत प्रधानमंत्री पीक विमा योजना, खरिप हंगाम २०२५ तालुकानिहाय नुकसानभरपाई वाटप, रब्बी हंगामाचा आढावा, प्रधानमंत्री किसान सन्मान निधी वितरण, बियाण्यांची गरज, महाबीजमार्फत उपलब्धता, कापूस बियाण्यांच्या विशिष्ट वाणांची मागणी व पुरवठा, तसेच रासायनिक खतांचा साठा, मागणी व विक्री याबाबत सविस्तर माहिती सादर करण्यात आली. मंजूर आवंटनापैकी सुमारे ७७ टक्के खतसाठा उपलब्ध झाल्याचे बैठकीत सांगण्यात आले.

जिल्ह्यास डीएपी खताची दररोज सुमारे ५२ मेट्रिक टन गरज असून सद्यस्थितीत सुमारे ३ हजार मेट्रिक टन साठा उपलब्ध आहे. तसेच युरियाचा शेतकऱ्यांच्या पिकांसाठी लागणारा साठा मुबलक उपलब्ध असल्याची माहिती देण्यात आली. खत खरेदीसाठी शेतकऱ्यांनी सातबारा दाखविणे बंधनकारक नसल्याचेही स्पष्ट करण्यात आले. शेतकऱ्यांना वेळेवर आणि पुरेशा प्रमाणात खते उपलब्ध होतील यासाठी कृषी विभागाने विक्रेत्यांशी समन्वय ठेवून काटेकोर नियोजन करावे, असे पालकमंत्र्यांनी सांगितले.

खरिप २०२६ करिता निश्चित करण्यात आलेल्या कृषी मोहिमांचाही यावेळी आढावा घेण्यात आला. प्रत्येक कृषि सहाय्यकाने आपल्या कार्यक्षेत्रातील प्रत्येक गावात २० जलतारा खड्डे तयार करण्याचे नियोजन असून जिल्ह्यातील प्रत्येक गाव परिसरात खड्डे निर्माण केले जाणार आहेत. महाविस्तार मोबाईल ॲपच्या माध्यमातून कृषी विभागाची माहिती जास्तीत जास्त शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

अल निनोच्या संभाव्य परिणामांच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात शिवार फेऱ्यांचे नियोजन, पोकरा योजनेअंतर्गत कामांची गती, महात्मा गांधी रोजगार हमी योजनेतून फलोत्पादन वाढ, तसेच एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत क्षेत्रवाढीचे नियोजन यावरही सविस्तर चर्चा झाली. प्रधानमंत्री नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प टप्पा-२ तसेच मा. बाळासाहेब ठाकरे हळद संशोधन व प्रशिक्षण केंद्र, वसमत यासंदर्भातील कामांचाही आढावा घेण्यात आला. यावेळी पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांच्या हस्ते कृषि विभागाच्या दोन घडीपत्रिकांचे विमोचन करण्यात आले.

उन्हाळ्यातील पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेचाही स्वतंत्रपणे आढावा घेण्यात आला. जून, जुलै व ऑगस्टपर्यंत नागरिकांना सुरळीत पाणीपुरवठा करता यावा यासाठी विहीर अधिग्रहण, जलजीवन मिशनअंतर्गत कामे, तसेच टँकर नियोजनाची प्रक्रिया गतीने राबवावी, असे निर्देश पालकमंत्र्यांनी दिले. याच अनुषंगाने जिल्हा प्रशासनाकडून पाणीटंचाई निवारणासाठी नियमित आढावा बैठका घेतल्या जात असून आवश्यक ती पूर्वतयारी करण्यात येत असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

दरम्यान, लेखन फाउंडेशन, व्हिजन समिती व शिक्षण विभागाच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यातील ७० शाळांनी सहभाग घेऊन पायलट प्रोजेक्ट राबविण्यात आला होता. यामध्ये विविध स्पर्धामध्ये प्राविण्य मिळविलेल्या शिक्षक व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार आयोजित कार्यक्रमात पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांच्या हस्ते करण्यात आला. शासनाच्या विविध उपक्रमांमध्ये शिक्षण, कृषी व मूलभूत सुविधा या तिन्ही क्षेत्रांचा समन्वित विकास करण्यासाठी प्रशासनाने प्रभावीपणे काम करावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

# कयाधू नदीवरील पूलासह रस्त्याच्या चौपदरीकरणासाठी१८० कोटींचा निधी मंजूर

## आ. तान्हाजी मुटकुळे यांच्या पाठपुराव्याला यश

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ मे**



शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग ४६१ बी च्या ६.७८ किलो मीटर लांबीच्या रस्त्याचे पेव्हड शोल्डरसह चौपदरीकरण करण्यासाठी केंद्र सरकारने १८०. ३८ कोटी रूपयांच्या निधीला मंजूरी दिली आहे. हिंगोली विधानसभेचे आमदार तान्हाजीराव मुटकुळे यांनी या कामासाठी सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला अखेर यश आले असून केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी या प्रस्तावाला मंजुरी दिली असल्याची माहीती आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी दिली आहे.

हिंगोली शहरात गेल्या अनेक दिवसांपासून वाहतुकीची प्रचंड कोंडी होत होती. अवजड वाहने आणि अरूंद रस्त्यांमुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. ही समस्या लक्षात घेवून आमदार तान्हाजीराव मुटकुळे यांनी दिल्ली दरबारी हा विषय लावून धरला होता. तसेच केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची अनेकवेळा भेट घेवून या रस्त्याच्या कामांसाठी निधीची मागणी केली होती. कयाधू नदीवर परभणी, सेनगाव, औंढा नागनाथ तसेच इतर ठिकाणाहून अनेक वाहने चोवीस तास धावतात. रस्ता जूना आणि अरूंद असल्यामुळे या पूलावर नेहमीच वाहतुकीची कोंडी होत होती. वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत असल्यामुळे नागरिकांना या कोंडीचा मोठा त्रास सहन करावा लागत होता तसेच हा पूल अत्यंत अरूंद असल्यामुळे जीव धोक्यात घालून लोक या पूलावरून प्रवास करीत होते. नागरिकांची सुरक्षितता लक्षात घेवून भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे या महत्वाच्या प्रश्नाकडे लक्ष देत या पूलाच्या व चौपदरीकरण रस्त्याच्या कामांसाठी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचेकडे निधीची मागणी केली होती. अखेर या पूलासह रेल्वे उड्डाणपूल व रस्त्याचे चौपदरीकरणासाठी १८०.३८ कोटी रूपये मंजूर करण्यात आले आहेत. या कामामुळे हिंगोलीच्या विकासात भर पडणार आहे. तसेचप्रवास वेगवान आणि सुरक्षित होणार आहे.

हिंगोली शहराचा कायापालट करणे आणि नागरिकांचा प्रवास सुखकर करणे हे आमचे कर्तव्य आहे. कयाधू नदीवरील पूल आणि रेल्वे उड्डाणपूलासह होणारे चौपदरीकरण शहराच्या वैभवात भर टाकेल. या महत्वपूर्ण कामासाठी निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल मी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचा अत्यंत आभारी आहे. या कामामुळे शहराच्या व्यापार आणि विकास कामाला गती नवी गती मिळणार असल्याची प्रतिक्रिया आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी दिली.




**हिंगोली- भारतीय जनता पक्ष महिला आघाडी तसेच भाजपच्यावतीने शनिवारी शहरातून नारीशक्ती वंदन बिलाच्या समर्थनार्थ भव्य मोर्चा काढण्यात आला. यावेळी मोठ्या संख्येने भाजप महिला आघाडीच्या पदाधिकारी मोर्चात सहभागी झाल्या होत्या. यावेळी काँग्रेसचा निषेध करण्यात आला. छाया- सुनील पाठक**


## संक्षिप्त वृत्त

### ॲड जया करडेकर यांना पुरस्कार प्रदान



हिंगोली- महिला व बालकल्याण विभाग जिल्हा हिंगोली च्या वतीने सन २०२२-२३ चा पुण्यश्लोक अहिल्या देवी होळकर पुरस्कार हिंगोली शहरातील ॲड. जया देवराव करडेकर यांना जाहीर झाला होता. महिला सबलीकरण, बाल संरक्षण सामाजिक न्याय, विकासात्मक उपक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी ॲड. जया करडेकर यांना सन २०२२-२३ चा पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर पुरस्कार जाहीर झाला होता. एक मे महाराष्ट्र दिनानिमित्त शहरातील संत नामदेव पोलीस कवायत मैदान येथे महाराष्ट्र दिनानिमित्त पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांच्या हस्ते ॲड. जया करडेकर यांना सन्मानचिन्ह मानपत्र व धनादेश देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी आमदार तानाजी मुटकुळे आमदार राजू नवघरे, जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, जिल्हा परिषद चे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, जिल्हा पोलीस अधीक्षक डॉक्टर निलाभ रोहन आदींची उपस्थिती होती. महिला व बालकल्याण विभागाच्या वतीने देण्यात येणारा हा प्रतिष्ठेचा पुरस्कार ॲड जया करडेकर यांना मिळाल्याबद्दल विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या वतीने त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

### पालकमंत्र्यांच्याहस्ते बॅडमिंटन हॉलचे उद्घाटन



हिंगोली- येथील जिल्हा कोषागार कार्यालयासमोरील तालुका क्रीडा संकुलामध्ये उभारण्यात आलेल्या बॅडमिंटन हॉलचे उद्घाटन राज्याचे अन्न व औषध प्रशासन, विशेष सहाय मंत्री तथा पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांच्या हस्ते आज करण्यात आले. यावेळी पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांनी बैडमिंटन खेळण्याचा आनंद घेतला. यावेळी आमदार तान्हाजी मुटकुळे, आमदार राजू नवघरे, जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, प्र.जिल्हा क्रीडा अधिकारी आत्माराम बोथीकर, तहसीलदार श्रीकांत भुजबळ यांच्यासह क्रीडा प्रशिक्षक, क्रीडा प्रेमी नागरिक उपस्थित होते .

# कयाधू नदी स्वच्छत मोहीमेचे पालकमंत्री झिरवाळ यांचेहस्ते उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ मे**



हिंगोली शहराची जीवनवाहिनी मानल्या जाणाऱ्या कयाधू नदीच्या स्वच्छता, संवर्धन व सुशोभीकरणासाठी जिल्हा प्रशासन व नगरपरिषद हिंगोली यांच्या संयुक्त विद्यमाने हाती घेण्यात आलेल्या विशेष स्वच्छता मोहिमेचे उद्घाटन राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री तथा पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांच्या हस्ते करण्यात आले. नदी परिसरात आयोजित यावेळी आमदार तान्हाजी मुटकुळे, आमदार संतोष बांगर, नगराध्यक्षा रेखाताई बांगर, जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, मुख्याधिकारी अरविंद मुंडे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी, लोकप्रतिनिधी, सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, स्वयंसेवक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांनी कयाधू नदी पात्राची पाहणी करून स्वच्छता मोहिमेचा शुभारंभ केला. यानंतर नदीपात्रातील गाळ, प्लास्टिक कचरा, निर्माल्य, झुडपे व अन्य घनकचरा हटविण्याच्या प्रत्यक्ष कामास सुरुवात करण्यात आली. या मोहिमेत यंत्रसामग्रीबरोबरच मानवी श्रमदानालाही प्राधान्य देण्यात आले असून विविध स्वयंसेवी संस्था, सामाजिक कार्यकर्ते, विद्यार्थी आणि स्थानिक नागरिकांचा सक्रिय सहभाग नोंदविण्यात येत आहे.

कयाधू नदी स्वच्छता मोहीम ही केवळ एकदिवसीय उपक्रम नसून नदी संवर्धनाचे लोकआंदोलन बनले पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले.

# हिंगोली शहरात होणार ऐतिहासिक भिडेवाडा चित्ररथाचे आगमन, स्वागताची तयारी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ मे**




क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या द्विशताब्दी वर्षानिमित्त क्रांतीसूर्य महात्मा जोतीरावफुले व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे विचार तळागाळातील लोकांपर्यंत पोहचावेत, यासाठी समता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष तथा राज्याचे मंत्री छगनराव भुजबळ यांच्या नेतृत्वाखाली आणि समता परिषदेचे कार्याध्यक्ष माजी खासदार समीर भुजबळ, आमदार पंकज भुजबळ यांच्या संकल्पनेतून तयार करण्यात आलेल्या क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांनी पुण्यातील भिडेवाडा येथे सुरू केलेल्या पहिल्या मुलींच्या शाळेचा भिडेवाडा चित्ररथाचे लवकरच हिंगोली शहरात आगमन होणार आहे.

सदरील चित्ररथाचे आगमन झाल्यानंतर आतिषबाजी फटाक्यांची केली जाणार आहे. हा रथ म्हणजे केवळ एक प्रतीकृती नाही तर शिक्षण, समता, सामाजिक जागरूकतेचा गीत आहे. मुलींच्या शिक्षणासाठी ज्यांनी लढा दिला, त्या महान कार्याची आठवण करून देणारा जिवंत प्रेरणा रथ आहे. रथ यात्रेच्या स्वागतासाठी सर्व समता सैनिक पदाधिकारी, कार्यकर्ते व समाजबांधव प्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन अखिल भारतीय समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष चंद्रलव्हाळे यांनी केले आहे. यात्रेच्या अनुषंगाने समता परिषदेच्या महिला जिल्हाध्यक्ष वनिताताई गुंजकर, जयश्री सातव, प्रा. डॉ. सुखदेव बलखंडे आदी जय्यत तयारी करीत आहेत.

# स्वगणनेत नागरिकांनी सहभागी होऊन विकास प्रक्रियेला बळ द्यावे- पालकमंत्री

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ मे**



भारताच्या राष्ट्रीय जनगणना प्रक्रियेच्या पहिल्या टप्प्यास आजपासून प्रारंभ होत असून ऑनलाईन स्वगणनेची सुविधाही नागरिकांसाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे. हिंगोली जिल्ह्यातील प्रत्येक घर, कुटुंब व मूलभूत सुविधा अशी एकूण ३४ प्रकारची अचूक नोंद या प्रक्रियेतून होणार असल्याने नागरिकांनी जबाबदारीने सहभागी होत विकास प्रक्रियेला बळ द्यावे, असे आवाहन अन्न व औषध प्रशासन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांनी केले आहे.

येथील संत नामदेव पोलीस कवायत मैदानावर मुख्य शासकीय ध्वजारोहण राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री तथा पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांच्या हस्ते झाले. यावेळी आमदार तान्हाजी मुटकुळे, जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, पोलीस अधीक्षक नीलभ रोहन, अपर जिल्हाधिकारी महेंद्रकुमार कांबळे, अपर पोलीस अधीक्षक कमलेश मीना, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुधीर ठोंबरे, निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोधवड, उपजिल्हाधिकारी (सामान्य) अनिल माचेवाड, उपजिल्हाधिकारी (रोहयो) राजेश सरोदे, जिल्हा पुरवठा अधिकारी अप्पासाहेब पाटील यांच्यासह इतर अधिकारी, कर्मचारी यांची उपस्थिती होती.

देशामध्ये १८७२ पासून जनगणना केली जात आहे. आता ही १६वी जणगणना सुरु असून, स्वातंत्र्यानंतरची ही आठवी जनगणना आहे. ती दोन टप्प्यांत होणार असून, या जणगणनेच्या माध्यमातून पहिल्या टप्प्यात घरांची व मूलभूत सुविधांची माहिती संकलित केली जाणार आहे. प्रथमच ऑनलाईन स्वगणना सुविधा उपलब्ध झाल्याने नागरिकांना स्वतः माहिती नोंदविण्याची संधी मिळाली आहे. जिल्ह्यात भेट देणारे प्रगणक व पर्यवेक्षक हे शासकीय ओळखपत्रासह येणार असल्याने नागरिकांनी त्यांना योग्य ते सहकार्य करावे, तर तोतया व्यक्तींपासून सावध राहण्याचेही आवाहन पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांनी केले.

जिल्हा प्रशासनाने यंदाच्या खरीप हंगामापूर्वी कृषी विभागामार्फत खतसाठ्याचे नियोजन केले असून शेतकऱ्यांना वेळेवर व पुरेशा प्रमाणात खत उपलब्ध व्हावे यासाठी कंपन्या व विक्रेत्यांशी समन्वय साधला जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी काळजी करू नये. साठेबाजी, जादा दर आकारणी, खत-बियाण्यांच्या गुणवत्तेबाबत तक्रारींसाठी भरारी पथके नियुक्त करण्यात आली आहेत. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेंतर्गत १ हजार ७६१ शेतकऱ्यांना २ कोटी ६५ लाख रुपयांचे अनुदान वितरित करण्यात आले असून कृषी यांत्रिकीकरण व फळबाग लागवड योजनांमधूनही शेतकऱ्यांना मोठा लाभ मिळत असल्याचे पालकमंत्र्यांनी सांगितले.

महसूल प्रशासन लोकाभिमुख करण्यासाठी 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर अभियान' अंतर्गत २६ महसूल मंडळांमध्ये शिबिरे घेऊन जवळपास १० हजार प्रमाणपत्रे व विविध दाखल्यांचे वितरण करण्यात आले आहे. 'राजस्व अभियान' अंतर्गत पोट हिस्सा मोजणीचे काम सुरू असून मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ता योजनेंतर्गत प्रत्येक तालुक्यात रस्ते मजबुतीकरणाची कामे प्रगतीपथावर आहेत.

जिल्ह्यात एलपीजी गॅस, पेट्रोल व डिझेलचा पुरवठा सुरळीत सुरू असून आवश्यक मागणी पूर्ण केली जात आहे. केंद्र शासनाच्या साधना सप्ताहात हिंगोली जिल्हा परिषदेतील ९५ टक्के कर्मचाऱ्यांनी प्रशिक्षण पूर्ण करून राज्यात अव्वल क्रमांक मिळविला आहे. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमात जिल्ह्याने राज्यात तिसरा क्रमांक तर महाराष्ट्र राज्य सेवा हक्क अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणीत द्वितीय क्रमांक मिळविल्याची बाब अभिमानास्पद असल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत मंजूर ३११ कोटी रुपयांचा निधी शंभर टक्के खर्च करून विविध विकासकामे पूर्ण करण्यात आली आहेत. बालविवाह निर्मूलन मोहिमेत वर्षभरात ५२ बालविवाह रोखण्यात प्रशासनाला यश आले आहे. माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव अभियानाद्वारे ग्रामीण भागात दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न सुरू असून ग्रामस्थांनी निरोगी गाव-सशक्त गाव-समृद्ध गाव या ध्येयाने यात सहभागी व्हावे, असे आवाहन पालकमंत्र्यांनी केले.

# जिल्ह्यातील सर्व घटकांच्या विकासासाठी सदैव कटिबध्द : पालकमंत्री अतुल सावे

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २ मे -**

केंद्र व राज्य शासनाकडून समाजातील सर्व घटकांचा विचार करून विविध कल्याणकारी योजना राबविण्यावर नेहमीच भर आहे. यामध्ये प्रामुख्याने शेतकरी, रोजगार, आरोग्य यासह सर्वांगीण विकासावर विशेष लक्ष केंद्रित केले जात आहे. विकसित भारत २०४७ अनुषंगाने वाटचाल करुन सर्वांगीण विकास व जनकल्याणासाठी कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास व अपारंपरिक ऊर्जा, दिव्यांग सक्षमीकरण मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांनी केले.

महाराष्ट्र राज्याचा ६७ वा स्थापना दिनानिमित्त आज नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते नांदेड येथील पोलीस कवायत मैदानावर सकाळी ८ वा. ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण, महापौर कविता मुळे, पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, अपर जिल्हाधिकारी रत्नदीप गायकवाड, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर अन्य वरिष्ठ अधिकारी आणि ज्येष्ठ सन्माननीय नागरिक तसेच स्वातंत्र सैनिक व त्यांचे कुटुंबियांची उपस्थिती होती. यावेळी त्यांनी कामगार दिनाच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या. ध्वजवंदनाच्या मुख्य कार्यक्रमानंतर पालकमंत्री अतुल सावे यांनी स्वातंत्र्य सैनिक व त्यांच्या वारस पत्नींची भेट घेतली. पालकमंत्र्यांसोबत जिल्हाधिकारी यांच्यासह अन्य अधिकारी उपस्थित होते.

देशात जनगणना २०२७ चा पहिला टप्पा आजपासून सुरू झाला आहे. या राष्ट्रीय उपक्रमांतर्गत स्व-गणना १ ते १५ मे २०२६ या कालावधीत होणार असून, घरांची नोंदणी १६ मे ते १४ जून २०२६ दरम्यान केली जाणार आहे. जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी या महत्त्वाच्या अभियानात सहभागी होऊन आपली जबाबदारी पार पाडावी, असे आवाहन पालकमंत्री अतुल सावे यांनी केले.

यंदाचा 'अर्थसंकल्प' हा विकसित महाराष्ट्राच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण आणि दूरदर्शी पाऊल आहे. हा अर्थसंकल्प राज्याच्या शेतकरी, महिला, युवक, कष्टकरी, सर्वसामान्य नागरिकांना समर्पित आहे. विशेषत: शेतकरी कल्याणाला प्राधान्य देत हा अर्थसंकल्प शेतकऱ्यांच्या जीवनात खरा बदल घडवणारा आहे. पुण्यश्लोक



अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजनेअंतर्गत रुपये २ लाखांपर्यंतच्या कर्जमाफीची मोठी घोषणा शेतकऱ्यांना खऱ्या अर्थाने दिलासा देणारी आहे असे त्यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या सूक्ष्म व प्रभावी अंमलबजावणीमुळे जिल्ह्याला प्रधानमंत्री पिक विमा योजना (खरीप हंगाम २०२५-२६) अंतर्गत ८१३ कोटी रुपयांचा पिक विमा मंजूर झाला असून, लाभार्थ्यांना विमा रकमेचे वितरण सुरू आहे. वाढत्या तापमानामुळे जिल्ह्यात उष्णतेची लाट (हिट वेव्ह) निर्माण झाली आहे. सर्व नागरिकांनी खबरदारीचा उपाय म्हणून आवश्यक ती काळजी घ्यावी. दुपारी १२ ते ४ या वेळेत कष्टाची कामे टाळावीत. तसेच उष्माघाताची लक्षणे दिसताच तातडीने उपचार घ्यावेत असे आवाहन पालकमंत्री सावे यांनी केले.

भारतीय हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार, २०२६ च्या मान्सूनवर 'एल-निनो' (El-Nin) या हवामान घटकाचा प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील पशुधनाच्या संरक्षणासाठी व संभाव्य चारा टंचाईवर मात करण्यासाठी 'जिल्हा चारा सुरक्षा आराखडा' तयार करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

जिल्ह्यात छत्रपती शिवाजी महाराज महास्वराज्य समाधान शिबिराच्या माध्यमातून विविध विभागाच्या योजनांचा लाभ नागरिकांना देण्यात येत आहे याबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले.

यावेळी पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस हवालदार नागेश देवराव कंकाळ, नागरी हक्क संरक्षण विभागाचे लिंगुराम बळीराम पोकलवार व महिला पोलीस शिपाई जयश्री विठ्ठल मुरकुटे यांचा सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देवून सन्मान करण्यात आला. विभागीय आयुक्त कार्यालयाकडून निवड झालेले आदर्श ग्राम महसूल अधिकारी माधव कोंडजी पाटील यांना ५ हजार रुपयांचा धनादेश व प्रशस्तीपत्र देवून सन्मान केला. महिला व बाल कल्याण क्षेत्रात उत्कृष्ठ कार्य करणाऱ्या समाजसेविकांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जिल्हास्तरीय पुरस्कार सुरेखा किनगावकर, अर्चना झाडबुके यांना प्रत्येकी १० हजार रुपयांचा धनादेश, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देवून सन्मान करण्यात आला. जिल्हास्तरीय युवक-युवती पुरस्कार लवकुश मधुकर जाधव व साधना कैलास गायकवाड यांना प्रत्येकी १० हजार रुपयांचा धनादेश, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देवून सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रविंद्र पांडागळे व अंजली नातु यांनी केले.

जिल्हा पोलीस दलाच्या बँड पथकाने सुरवातीला वंदे मातरम गीताचे व राष्ट्रगीतासह राज्यगीत सादर केले. यावेळी राष्ट्रध्वजास मानवंदना व राष्ट्रगीतानंतर पालकमंत्री अतुल सावे यांनी संचलन करणाऱ्या पथकाचे पोलीस वाहनातून निरीक्षक केले. परेड कमांडर वैभव पडवळ, सेंकड इन कमांडर विजय कुमार धोंडगे यांच्या नेतृत्वाखाली पथसंचलनात जलद प्रतिसाद दल, सशस्त्र पोलीस पुरुष पथक, सशस्त्र महिला पोलीस पथक, गृहरक्षक दलाचे पुरूष व महिला पथक, गृहरक्षक दल पुरुष पथक, राष्ट्रीय छात्रसेना, अग्नीशमन दलाचे पथक, पोलीस वाद्य पथक, डॉग स्काड युनिट, बॉम्ब शोधक व नाशक पथक, सर्व्हिलेन्स वाहन, फोरेसिक वाहन, रुग्णवाहिका १०८, अग्निशामक वाहन देवदूत यांचा पथसंचलनात सहभाग होता.

तत्पूर्वी महाराष्ट्र राज्याचा ६७ वा स्थापना दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात सकाळी ध्वजवंदन करण्यात आले. जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. यावेळी वरिष्ठ अधिकाऱ्यांसह सर्व कर्मचारी उपस्थित होते.

## शिवाजी खंडागळे यांची पोलीस उपनिरिक्षक पदी निवड

**भोकर** -नांदेड -भोकर रोडवर असलेले मौजे वाकद पासून दक्षिणेला दोन किमी अंतरावर जंगलाच्या कूशीत वसलेलं बाचोटी कॅम्प हे गाव या गावात जेमतेम ५० ते ६० मातंग समाजाची घरे आहेत. या गावातील शिवाजी खंडागळे हा पोलीस उपनिरिक्षक पदाची परिक्षा उत्तीर्ण झाल्याने त्यांचे सर्वत्र कौतूक होत आहे. भोकर तालुक्यातील बाचोटी कॅम्प हे गाव ताटकळवाडी गट ग्रामपंचायत अंतर्गत येते. गावाला महसूली गावचा सुद्धा दर्जा नाही. चोहोबाजूने जंगल असलेले हे गाव तालुक्यातही बहुतांश लोकांना माहिती नाही. गावात कोरडवाहू जमीन असल्यामुळे अनेक कूटूंबे रोजगारासाठी इतर ठिकाणी स्थलांतर होत असतात. विशेष म्हणजे या गावात शंभरटक्के मातंग समाज रहातो मातंग समाजातील रामा भिवाजी खंडागळे यांचे कुटुंब राहते गवंडी काम करुन आपल्या कूटूंबाचा गाडा चालवत मुलाबाळांना जेमतेम शिक्षण दिले शिवाजी खंडागळे हा त्यांचा मूलगा सन २०१३ मध्ये महाराष्ट्र पोलीस मध्ये पोलिस शिपाई या पदावर रुजू झाला. पण पिएसआय बनण्याचे स्वप्न उराशी बाळगून अनेकवेळा एमपिएससी मार्फत होणाऱ्या पिएसआय पदाची परीक्षा दिली अनेकदा त्यांना अपयश आले अपयशाला खचून न जाता जिद्द ठेवून अखेर सन २०२३ मध्ये सेवा अंतर्गत होणाऱ्या पिएसआय पूर्व मुख्यपरीक्षेत पास झाला आणि तब्बल दोन वर्षानंतर झालेल्या शारीरिक चाचणी परीक्षेतही पैकी च्या पैकी गुण मिळवून चांगल्या रँकसह यशाला गवसणी घातली. आणि दीर्घ प्रतिक्षेनंतर आज एमपिएससी ने निकाल जाहीर केला त्यामध्ये एकूण ६१५ उमेदवारांच्या निवड यादीत शिवाजी खंडागळे यांचा २१४ वा क्रमांक आहे. दुसरा मुलगा सिताराम खंडागळे हा तहसील कार्यालय भोकर येथे महसूल सेवक म्हणून कार्यरत आहे. व मुलगी मनपा नांदेड येथे परिचारिका या पदावर कार्यरत आहे. शिवाजी खंडागळे याची पोलीस उपनिरीक्षक पदी निवड झाल्या बद्दल गावातील व परिसरातील नागरिकांतून कौतुकाचा वर्षाव होत आहे.



## सिडको येथे महाराष्ट्र दिनानिमित्त विविध कार्यालयात ध्वजारोहण

**नांदेड** -सिडको परिसरात तील मनपा क्षेत्रीय कार्यालय, सिडको कार्यालयासह शाळा, महाविद्यालय, ग्रामपंचायत कार्यालय या ठिकाणी महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्त प्रत्येक कार्यालयात ध्वजारोहण करण्यात अगोदर वंदे मातरम गीत मग ध्वजारोहण नंतर महाराष्ट्र गीतांचे सामुदायिक गायन करून ध्वजारोहण उत्साहात पार पडले. सिडको हडको परिसरात दिनांक एक मे रोजी महाराष्ट्र दिन व कामगार दिन उत्साहात पार पडला. परिसरातील सिडको क्षेत्रिय कार्यालय येथे सकाळी ठीक ६:४५ वाजता सहाय्यक आयुक्त डॉ. मिर्झा बेग यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी कार्यालयाचे कार्यालयीन अधीक्षक विलास गजभारे, कर निरीक्षक वसंत कल्याणकर, संजय नागापूरकर यांच्यासह कर वसुली अधिकारी व कर्मचारी यांची उपस्थिती होती. तसेच सिडको कार्यालय येथे सहाय्यक विकास अधिकारी कपिल राजपूत यांच्या हस्ते ध्वजारोहण सकाळी ठीक ७:०० वाजता करण्यात आला. यावेळी लेखा सहाय्यक संकेत गिरी यांच्यासह सुरक्षारक्षक सौ. लता पोहरे, राजू धुमाळ, सुनील कांबळे, साईनाथ गिरी यांची उपस्थिती होती. तसेच महात्मा फुले माध्यमिक आश्रम शाळा वाघाळा येथील संस्थेचे अध्यक्ष तथा मुख्याध्यापक भगवान इंगेवाड यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आला. तसेच गोपाळ चवडी ग्रामपंचायत कार्यालय येथे ग्रामपंचायतचे सरपंच सौ सुरेखा प्रदीप लाखे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी उपसरपंच साहेबराव सेलुकार व ग्रामविकास अधिकारी पाटील मॅडम यांच्यासह ग्रामपंचायतचे सदस्य व ग्रामस्थांची उपस्थिती होती. तसेच धनेगाव ग्रामपंचायत कार्यालय येथे सरपंच गंगाधर शिंदे उर्फ पिंटू पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आला. यावेळी ग्रामपंचायतीचे सदस्य व ग्रामस्थ यांची उपस्थिती होती. तसेच सिडकोतील नामांकित असलेल्या सेवादास शिक्षण प्रसारक मंडळाचे वसंतराव नाईक महाविद्यालय वसरणी, जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालय सिडको व महात्मा गांधी विद्यालय सिडको या ठिकाणी संस्थेचे कोषाध्यक्ष ॲड. श्रीनिवास जाधव यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आला. यावेळी संबंधित शाळा महाविद्यालयाचे प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांची उपस्थिती होती.

## चिन्मय मिशन तर्फे चिन्मय बालसंस्कार उन्हाळी शिबीर

**नांदेड** -येथील चिन्मय मिशनच्या वतीने विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमाच्या अंतर्गत चिन्मय बालसंस्कार उन्हाळी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. प.पू. स्वामी प्रत्ययानंद सरस्वती व प.पू. स्वामीनी निष्कलानंदा सरस्वती यांच्या तज्ज्ञ मार्गदर्शनात दि. ४ ते ८ मे दरम्यान सकाळी ९ ते सायंकाळी ५-३० या वेळेत सदरील शिबीर चिन्मय व्यंकटेश मंदिर, कॅनाल रोड, वाडी, नांदेड येथे ८ ते १२ वर्षे वयोगटातील बालकांसाठी संपन्न होणार आहे. तरी अधिक माहिती व शिबिराच्या नोंदणीकरिता चिन्मय व्यंकटेश मंदिर, कॅनाल रोड, वाडी, नांदेड (९४०४०६००२२) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन चिन्मय मिशनचे अध्यक्ष भीमराव रामीनवार, सचिव अनंत करडखेडकर व कोषाध्यक्ष सुभाष व्यवहारे यांनी केले आहे.

## डॉ. आंबेडकर लिखित 'माझी आत्मकथा' पुस्तकाचे वाटप

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. २ मे -**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त बारड येथील ज्ञानदीप नगरमध्ये विविध कार्यक्रमांनी भीम जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांना डॉ. आंबेडकर यांच्या विचारांची व संघर्षाची प्रेरणा मिळावी, या उद्देशाने काँग्रेसचे तरुण कार्यकर्ते प्रा. संदीपकुमार देशमुख यांच्या संकल्पनेतून मान्यवरांच्या हस्ते डॉ. आंबेडकर लिखित 'माझी आत्मकथा' या पुस्तकाचे शालेय विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले.

बारड येथे डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त माझी आत्मकथा या पुस्तक वाटपाचा कार्यक्रम सामाजिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण ठरला असून विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी आणि त्यांच्या जीवनात डॉ आंबेडकरांच्या विचारांची जडणघडण व्हावी, या उद्देशानेच डॉ. आंबेडकर लिखित पुस्तकाचे वितरण करण्यात आले, अशी माहिती प्रा. संदीपकुमार देशमुख यांनी यावेळी दिली.

कार्यक्रमाची सुरुवात तथागत गौतम बुद्ध यांच्या पुतळ्यास सामूहिक पुष्प अर्पण करून त्रिवार वंदनाने झाली. त्यानंतर भारतीय संविधानाचे



शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. स.पो.नि. दत्तात्रेय मंठाळे यांच्या हस्ते पंचशील ध्वजारोहण पार पडले. समता सैनिक दलाच्या वतीने पतसंचलन करून मानवंदना देण्यात आली. जयंतीनिमित्त गावातील प्रमुख रस्त्यांवरून मिरवणूक काढण्यात आली. मिरवणूक शांततेत व शिस्तीत पार पडावी यासाठी समता सैनिक दलाने उल्लेखनीय कामगिरी बजावली.

यावेळी माजी सरपंच दिलीपराव कोरे, ॲड. कमलेश चौदंते, निलेशराव देशमुख, उत्तमराव लोमटे, प्रतापराव देशमुख, प्रा. संदीपकुमार देशमुख, विजय देशमुख, महेश देशमुख, प्रभाकर आठवले, नरसिंग आठवले, नरहरी आठवले, राहुल आठवले, विजय देशमुख, धोंडीबा आठवले, संजय मुलंगे, पिराजी गाडेकर, अमोल टेकले, संजय सावंत आदींची प्रमुख उपस्थिती होती. भीम जयंती मंडळाचे अध्यक्ष सुरेंद्र आठवले, उपाध्यक्ष अमोल आठवले, निशांत पाईकराव, बाळासाहेब आठवले व राजरत्न धुतडे यांच्या हस्ते मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.

**विद्यार्थ्यांना मिळाली विचारांची दिशा!**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित 'माझी आत्मकथा' या पुस्तकाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना त्यांच्या जीवनातील संघर्ष, जिद्द आणि विचारांची ओळख करून देण्यात आली. प्रा. संदीपकुमार देशमुख यांच्या हस्ते पुस्तकांचे वाटप करण्यात आले असून, विद्यार्थ्यांनी या वाचनातून समाजात आदर्श विचार पोहोचवण्याचा संकल्प व्यक्त केला. हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या वैचारिक विकासासाठी महत्त्वपूर्ण ठरत असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

## बुद्ध जयंतीनिमित्त सहयोग नगरात वॉटर एटीएम प्रकल्प सुरू

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २ मे -**

भगवान गौतम बुद्ध यांच्या जयंतीच्या पवित्र दिवशी सहयोग नगर, बुद्ध विहार परिसरात अत्याधुनिक कॉईन वॉटर एटीएम व शुद्ध पाणी प्रकल्पाचा शुभारंभ उत्साहात पार पडला. नगरसेवक तथा उपाध्यक्ष भाजपा महानगर साहेबराव गायकवाड यांच्या दूरदृष्टीतून साकारलेला हा उपक्रम परिसरासाठी सेवेचा नवा अध्याय ठरत आहे.

महागाईच्या काळात नागरिकांना परवडणाऱ्या दरात शुद्ध पाणी उपलब्ध करून देण्यासाठी उभारण्यात आलेल्या या प्रकल्पाचे वैशिष्ट्य म्हणजे केवळ १० रुपयांच्या एका कॉईनमध्ये तब्बल २० लिटर शुद्ध व थंडगार पाणी उपलब्ध होणार आहे. अत्याधुनिक ठज (Reverse Osmosis) प्रणालीद्वारे शुद्ध केलेले पाणी २४ तास उपलब्ध राहणार असून, नागरिकांना दिवस-रात्र या सुविधेचा लाभ घेता येणार आहे.

या प्रकल्पामुळे विशेषतः सहयोग नगरवासीयांना मोठा दिलासा मिळणार आहे. परिसरात स्वच्छ व सुरक्षित पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध झाल्याने नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

या उपक्रमास भंते शीलरत्न थेरो यांचे मार्गदर्शन व आशीर्वाद लाभले. तसेच बुद्ध कीर्ती चॅरिटेबल ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांनी प्रकल्पासाठी सक्रिय सहकार्य केले.

उद्घाटनप्रसंगी माजी महापौर शीला किशोर भवरे, नगरसेवक दयानंद वाघमारे, सरस्वतीबाई राऊत, सत्यपाल सावंत, नगरसेवक प्रतिनिधी राजू



लांडगे, कुलदीप राक्षसमारे आंबेडकरी चळवळीचे नेते सुभाष काटकांबळे, ट्रस्टचे अध्यक्ष रमेश कोकरे, सचिव राजेश बिऱ्हाडे, भीमराव सोनाळे, बाबुराव पाईकराव, कानिंदे, विशाल भद्रे, नारायण ढेपे, सोपान काळबांडे लक्ष्मण कंधारे, रेखाताई कोकरे भारती बिऱ्हाडे, सागर मल्हारे , अस्मिता सोनकांबळे, प्रभाताई इंगळे, निखाते ताई यांच्यासह महिला मंडळ व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांनी या उपक्रमाचे कौतुक करत, बुद्ध जयंतीच्या पवित्र दिवशी सुरू झालेला हा प्रकल्प समाजसेवेचा आदर्श नमुना आहे, असे मत व्यक्त केले.

नगरसेवक साहेबराव गायकवाड यांच्या पुढाकारातून साकारलेला हा वॉटर एटीएम प्रकल्प हा केवळ सुविधा नसून जनते प्रती असलेली बांधिलकी, सामाजिक उत्तरदायित्व आणि विकासाभिमुख नेतृत्वाचे जिवंत उदाहरण असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.

## हुतात्म्यांना अभिवादन करत मरवाळी तांडा येथे महाराष्ट्र दिन साजरा

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. २ मे -**

तालुक्यातील मरवाळी तांडा येथील बालक शिक्षण प्रसारक मंडळ संचलित प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व पोस्ट बेसिक ज्युनिअर कॉलेजमध्ये महाराष्ट्र दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

शुक्रवार,दि. १ मे रोजी सकाळी७.३० वाजता आयोजित कार्यक्रमास सरपंच डॉ. मधुकर राठोड, सेवानिवृत्त प्राचार्य किशन राठोड, प्रा. श्रीराम राठोड व पोलीस पाटील दशरथ राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती. संस्थेचे संस्थापक



अध्यक्ष रतन राठोड यांच्या हस्ते महात्मा गांधी, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमांचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

यानंतर राष्ट्रध्वजाला मानवंदना देत ध्वजवंदन करण्यात आले. कार्यक्रमात पोस्ट बेसिक ज्युनिअर कॉलेजचे सहशिक्षक अवचित शेजुळ यांनी महाराष्ट्र दिनाचे महत्त्व विशद करत राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी आत्मचिंतनाची गरज व्यक्त केली. तसेच महाराष्ट्र निर्मितीसाठी योगदान देणाऱ्या १४६ हुतात्म्यांना त्यांनी आदरांजली अर्पण केली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हेमंत बावणे यांनी केले, तर आभार प्रदर्शन शंकर राठोड यांनी मानले.

कार्यक्रमास संस्थेचे प्राचार्य विजय देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षकवृंद, वस्तीगृह अधीक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच ग्रामपंचायतीचे पदाधिकारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## परीक्षा केंद्र परिसरात प्रतिबंधात्मक आदेश

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २ मे -**

NEET-UG-२०२६ प्रथम सामाईक प्रवेश परीक्षा रविवार ३ मे २०२६ रोजी दुपारी २ ते ५ या कालावधीत जिल्ह्यातील विविध ४६ परीक्षा केंद्रावर घेण्यात येणार आहे. या केंद्रापासून शंभर मिटरच्या परिसरात ३ मे रोजी सकाळी ८ ते सायं ६ वाजेपर्यंतच्या कालावधीत परीक्षार्थी व परीक्षेच्या कामाशी संबंधीत असलेले अधिकारी-कर्मचारी या व्यक्तीरीक्त इतर कोणत्याही व्यक्तीस प्रवेश करता येणार नाही. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ नुसार पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी याबाबतचा आदेश १ मे रोजी निर्गमीत केला आहे.

या परीक्षेच्या कामाशी संबंधीत असलेले अधिकारी-कर्मचारी याव्यतिरीक्त इतर कोणत्याही व्यक्तीस कॅलक्युलेटर, ट्रॅन्झीस्टर, रेडिओ, लॅपटॉप आदी तत्सम साहित्य परीक्षा केंद्राच्या १०० मिटर पर्यंत परिसरात वापरण्यास व जवळ बाळगण्यास, परीक्षा केंद्रात नेण्यास त्याचप्रमाणे दर्शविलेल्या कालावधीत परीक्षा केंद्राच्या परिसरातील १०० मीटर पर्यंतची सर्व सार्वजनिक टेलिफोन्स,एस.टी.डी., आय.एस.डी., भ्रमणध्वनी, फॅक्स, झेरॉक्स, पेजर आणि ध्वनिक्षेपक चालू ठेवण्यास याद्वारे प्रतिबंध करण्यात आले आहे.

## दिव्यांगांच्या हक्कावर डाका ; ५ टक्के निधी गिळंकृत !

**तभा वृतसेवा**
**इस्लापूर, दि. २ मे -**

इस्लापूर ग्रामपंचायत हद्दीतील दिव्यांग व्यक्तींना शासन नियमानुसार मिळणारा हक्काचा निधी मागील तब्बल सन २०२० ते सन २०२६ या सहा वर्षांपासून रोखून ठेवण्यात आल्याचा गंभीर आणि संतापजनक प्रकार उघडकीस आला आहे. ग्रामपंचायतीच्या एकूण निधीतून दिव्यांगांसाठी राखीव असलेला ५ टक्के निधी देणे बंधनकारक असताना, तो निधी लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात आलेला नाही. त्यामुळे ग्रामपंचायतीच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, हा प्रकार दिव्यांगांच्या हक्कांवर सरळ घाला असल्याचे स्पष्ट दिसून येत आहे.

दिव्यांगांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी लागू असलेल्या दिव्यांग व्यक्ती अधिकार अधिनियम २०१६ अंतर्गत दिव्यांगांना समान संधी, आर्थिक सहाय्य, पुनर्वसन आणि सन्मानाने जगण्याचा अधिकार दिला आहे. यासोबतच ग्रामपंचायतींना त्यांच्या असलेल्या ग्रामनिधी मधून एकूण निधीपैकी ५ टक्के निधी दिव्यांग कल्याणासाठी राखीव ठेवून त्याचा प्रत्यक्ष लाभ देणे आवश्यक आहे. मात्र इस्लापूर ग्रामपंचायत मध्ये हे नियम केवळ कागदावरच मर्यादित राहिले असून, प्रत्यक्ष अंमलबजावणीत त्यांचा पूर्ण अभाव असल्याचे उघड झाले आहे.

इस्लापूर ग्रामपंचायतीकडे दरवर्षी येणाऱ्या ग्राम निधीतून दिव्यांगांसाठी राखीव असलेली ५ टक्के रक्कम मागील सहा वर्षांपासून वितरित न झाल्याने या निधीचा हिशोब संशयास्पद ठरत आहे. निधी नेमका कुठे व कसा खर्च झाला, तो इतर कामांकडे वळवण्यात आला का, किंवा जाणीवपूर्वक रोखून ठेवण्यात आला का, याबाबत कोणतीही स्पष्ट माहिती देण्यात आलेली नाही. पारदर्शकतेचा अभाव आणि सततची



टाळाटाळ यामुळे आर्थिक गैरव्यवहाराचा संशय अधिकच बळावत आहे.

दरम्यान, दिव्यांगांनी अनेक वेळा अर्ज, निवेदने व तक्रारी करून आपला हक्क मागितला. काही लाभार्थ्यांनी वारंवार ग्रामपंचायतीच्या कार्यालयाचे चकरा मारूनही त्यांना कोणतेही समाधानकारक उत्तर मिळाले नाही. अर्जांना प्रतिसाद न देणे, तक्रारींकडे दुर्लक्ष करणे आणि विषय टाळत राहणे हीच भूमिका ग्रामपंचायतीकडून घेतली गेल्याचा आरोप करण्यात येत आहे. हा प्रकार केवळ प्रशासनिक निष्काळजीपणा नसून, दिव्यांगांच्या भावना आणि हक्कांचा उघड अपमान असल्याचे बोलले जात आहे.

हक्काचा निधी न मिळाल्यामुळे अनेक दिव्यांगांचे दैनंदिन जीवन गंभीर अडचणीत सापडले आहे. वैद्यकीय उपचार, आवश्यक साधनसामग्री, स्वयंरोजगारासाठी मदत आणि इतर मूलभूत गरजांसाठी त्यांना संघर्ष करावा लागत आहे. शासनाच्या योजना अस्तित्वात असूनही त्या प्रत्यक्षात लाभ न मिळाल्याने त्यांचे जीवन अधिकच कठीण झाले आहे.

या संपूर्ण प्रकरणामुळे इस्लापूर ग्रामपंचायतीचा कारभार संशयाच्या भोवऱ्यात सापडला असून, पारदर्शकतेचा पूर्ण अभाव उघड झाला आहे. सहा वर्षांचा निधी वितरित न होणे, अर्जांकडे दुर्लक्ष करणे, हिशोब न देणे आणि लाभार्थ्यांना ५ टक्के ग्रामनिधीच्या लाभापासून वंचित ठेवणे या सर्व बाबी अत्यंत गंभीर स्वरूपाच्या आहेत.

गावातील नागरिक आणि दिव्यांगांमध्ये या प्रकरणामुळे तीव्र नाराजी पसरली असून, आता या अन्यायाविरोधात आवाज उठू लागला आहे. संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी करून सहा वर्षांचा संपूर्ण आर्थिक हिशोब जाहीर करावा, जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी आणि थकीत निधी तात्काळ दिव्यांगांना वितरित करावा, अशी जोरदार मागणी होत आहे.

एकूणच, शासनाचे स्पष्ट नियम, निधीची उपलब्धता आणि लाभार्थ्यांचा सातत्याने केलेला पाठपुरावा असूनही दिव्यांगांना न्याय न मिळणे ही अत्यंत गंभीर बाब ठरत आहे. इस्लापूर ग्रामपंचायती मध्ये घडलेला हा प्रकार केवळ निष्काळजीपणाचा नसून, तो दिव्यांगांच्या हक्कांवर झालेला उघड अन्याय असल्याचे स्पष्ट होत आहे. आता तरी संबंधित यंत्रणा जागी होऊन या प्रकरणात ठोस आणि कठोर पावले उचलणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# खुलताबाद तालुक्यातील सर्व नागरिकांनी 1 ते 15 मे या काळात स्वगणना करावी - आ प्रशांत बंब

तभा वृत्तसेवा

खुलताबाद येथे तहसील कार्यालयात गंगापूर खुलताबाद विधानसभा मतदारसंघाचे आ प्रशांत बंब , यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न झाला या नंतर तहसील कार्यालय खुलताबाद येथील सभागृहात आमदार प्रशांत बंब खुलताबाद तहसील कार्यालयाचे तहसीलदार संतोष गुट्टे यांच्या प्रमुख उपस्थितीत पत्रकार परिषद घेऊन माहिती देण्यात आली आजपासून राष्ट्रीय कार्य गणना सुरुवात होत आहे जनगणना हा एक लोकशाहीचा महत्वाचा भाग आहे. जनगणना सुलभ व सोपी व्हावी म्हणून स्वगणना पोर्टल सुरू करण्यात आले आहे १ ते १५ मे पर्यंत प्रत्येक नागरिक पोर्टल जाऊन स्वगणना करू शकतो . खुलताबाद तालुक्यात २१२ विभाग आहेत



त्यामध्ये २६० प्रगणक नेमले आहेत हे प्रगणक १६ मे ते १५ जुन या काळात प्रत्येक नागरिकांच्या घरी जाऊन संपूर्ण माहिती घेऊन फार्म भरुन घेणार आहेत.जे नागरिक १ते १५ मे दरम्यान स्वगणना करतील त्यांना एक आय डी मिळेल तो संभाळून ठेवावा. १६ मे पासून जे सरकारी प्रगणक आपल्याकडे नोंदणी करायला येतील त्यांना तो आय डी दाखवा जेणेकरून त्यांना या आयडीच्या माध्यमातून काम करणे सोपे जाईल.

यावेळी खुलताबाद नगर परिषदेचे नगराध्यक्ष अमीर पटेल तहसीलदार संतोष गुट्टे खुलताबाद नगर परिषदेचे मुख्याधिकारी समीर शेख, खुलताबाद पंचायत समिती च्या सभापती सुनिता संजय खंडागळे . प्रभारी गट विकास अधिकारी बोरणारे खुलताबाद तालुका कृषी अधिकारी तारगे, ,उपनगराध्यक्ष नवनाथ बारगळ, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश वाकळे ,जिल्हा परिषद सदस्य कुणाल दांडगे रेखाताई प्रकाश चव्हाण, प्रतिक्षा विकास कापसे, उपसभापती मंदाताई बद्रीनाथ वाकळे,पंचायत समिती सदस्य दिनेश अंभोरे, योगिता बर्डे, तालुका अध्यक्ष प्रकाश चव्हाण नगरसेवक परसराम बारगळ, , योगेश बारगळ, मोहन तुपे, उमेश आवारे. विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

सरकारच्या सर्व योजनांचा लाभ घेण्यासाठी जनगणना करणे महत्वाचे आहे, सरकारचा येणारा फंड देखील जनगणनेच्या आधारे येणार आहे.देशाची आखणी जनगणनेच्या आराखड्यानुसार ठरणार आहे म्हणून सर्वांनी स्वगणना करून घ्यावी असे आवाहन आ प्रशांत बंब यांनी आज महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने केले आहे.

## मेडिकवर हॉस्पिटलमध्ये किडनी प्रत्यारोपणासाठी आवश्यक प्रक्रिया पूर्ण



**पाथरी (जि. परभणी)** | येथील भगवान रामभाऊ पाथरीकर (वय 57) यांना परभणी येथील देवगिरी हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान डॉक्टरांनी त्यांना ब्रेन डेथ घोषित केले.

दरम्यान, संभाजीनगर येथील मेडिकवर हॉस्पिटलमध्ये संबंधित रक्तगटाचे किडनी प्रत्यारोपणासाठी प्रतीक्षेत असलेले रुग्ण असल्याची माहिती मिळताच अवयवदानाची प्रक्रिया तातडीने राबविण्यात आली. किडनी प्रत्यारोपणासाठी आवश्यक प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी किडनी प्रत्यारोपण तज्ज्ञ डॉ. मयूर दळवी हे परभणीत दाखल झाले होते. तसेच या प्रत्यारोपण प्रक्रियेत सर्जन म्हणून डॉ. शरद सोमाणी यांनी काम पाहिले, तर ट्रान्सप्लांट फिजिशियन म्हणून डॉ. सचिन सोनी आणि डॉ. राहुल रुईकर यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. या अवयवदानामुळे गरजू रुग्णाला नवजीवन मिळण्याची आशा निर्माण झाली आहे.

## ‘राजा शिवाजी’च्या साउंडट्रॅकमधील दुसरे भव्य गीत ‘जय शिवराय’ प्रदर्शित

छत्रपती संभाजीनगर - ‘राजा शिवाजी’ या बहुप्रतिक्षित ऐतिहासिक महाकाव्य चित्रपटाच्या साउंडट्रॅकमधील दुसरे गाणे ‘जय शिवराय’ नुकतेच भव्य स्वरूपात प्रदर्शित करण्यात आले आहे. पहिल्या गाण्याच्या यशानंतर, या नव्या गीताने चित्रपटाच्या संगीत प्रवासाला अधिक व्यापक, भावनिक आणि शक्तिशाली परिमाण प्राप्त करून दिले आहे.

## सर्वात मोठा ग्रीनफील्ड प्रकल्प 3.5 वर्षांपेक्षा कमी वेळात पूर्ण झाला

छत्रपती संभजीनगर : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज हरदोई येथून 594 किलोमीटर लांबीच्या गंगा एक्सप्रेसवेचे उद्घाटन केले. हा उत्तर प्रदेशातील सर्वात मोठ्या ग्रीनफील्ड पायाभूत सुविधा प्रकल्पांपैकी एक असून, तो 3.5 वर्षांपेक्षा कमी वेळात पूर्ण करण्यात आला आहे. हा एक्सप्रेसवे पश्चिम उत्तर प्रदेशातील मेरठला पूर्व उत्तर प्रदेशातील प्रयागराजशी जोडतो, ज्यामुळे राज्याच्या विकासाला गती मिळण्याची अपेक्षा आहे.अनेक वर्षांपासून पूर्व उत्तर प्रदेशात लोकसंख्या आणि आर्थिक क्षमता असूनही अपेक्षित विकास झाला नव्हता. गंगा एक्सप्रेसवे या भागातील लपलेली आर्थिक क्षमता उघड करण्यास महत्त्वाची भूमिका बजावेल. हा प्रकल्प चांगली कनेक्टिव्हिटी, कमी प्रवास अंतर आणि राज्याच्या विकास कॉरिडॉरशी मजबूत कनेक्टिव्हिटी देऊन पूर्व उत्तर प्रदेशला नवी आर्थिक दिशा देईल.

## जेष्ठ कलाकारांना सामाजिक जीवनात भेडसावणाऱ्या समस्यां सोडवण्यासाठी प्रयत्न करेन - रविंद्र चव्हाण

अभिनय क्षेत्रातील दिग्गज कलाकारांना आपण सिनेमाच्या रुपेरी पडद्यावर पाहतो. या क्षेत्रात मिळणारा पैसा व माया यांची चर्चा आपण ऐकतो. पण प्रसिद्धीच्या पडद्याबाहेर गेल्यावर त्या कलाकारांच्या आयुष्यामध्ये किती दुःख असते ते आपल्याला कधीही दिसत नाही. अशा या जेष्ठ कलाकारांसाठी दिलीप कुमार, सुनील दत्त, मिथुन चक्रवर्ती, जॉनी लिव्हर, आशा पारेख यांसारख्या कलाकारांनी एकत्र येऊन जेष्ठ कलाकारांचे दुःख, त्यांच्या गरजा, त्यांचे आजारपण यांसारख्या समस्या सोडवण्यासाठी सीएडब्ल्यूटी सारखा एक मंच तयार केला असून या संस्थेतर्फे केले जाणारे काम अतिशय कौतुकास्पद आहे, असे वक्तव्य भाजपचे महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी आज मुंबईत केले.

## आईकू नियो 10 अल्पाइन व्हाइट आणि अस्फाल्ट ब्लॅक रंगांमध्ये

नवी दिल्ली : आईकू नियो 10 च्या प्रचंड यशानंतर, हाय-एंड स्मार्टफोन ब्रँड आईकू ने आज दोन नवीन कलर व्हेरिएंट्स – अल्पाइन व्हाइट आणि अस्फाल्ट ब्लॅक लॉँच केले आहेत. आईकू नियो 10 ची मजबूत ओळख अधिक वाढवण्यासाठी डिझाइन केलेले, हे व्हेरिएंट्स ताजे आणि आकर्षक सौंदर्यशास्त्र सादर करतात, ज्यामुळे ग्राहकांना या स्मार्टफोनच्या सर्वोत्तम कामगिरीचा, उत्कृष्ट गेमिंग क्षमतांचा आणि उल्लेखनीय नावीन्यपूर्णतेचा आनंद घेताना एक कायमस्वरूपी स्टाईल स्टेटमेंट तयार करता येते.

## विद्यार्थ्यांची जेईई मेन २०२६ परीक्षेत चमकदार कामगिरी

मुंबई - महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांनी जेईई मेन २०२६ मध्ये फारच उत्तम कामगिरी केली आहे. राज्यातून वेदांतुचे १५५ विद्यार्थी जेईई ॲडव्हान्स २०२६ साठी पात्र ठरले आहेत. यामुळे एकूण २२०० वेदांतु विद्यार्थी आता पुढील टप्प्यासाठी तयारी करतील, वेदांतुचे सहसंस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी वामसी कृष्णा म्हणाले,: “महाराष्ट्राने कायमच दमदार शैक्षणिक महत्वाकांक्षा जपली आहे आणि यंदाचे निकाल हीच वृत्ती प्रतित करतात. आम्ही पुणे, नागपूर, अहिल्यानगर आणि जळगाव येथे सुरुवात करत असताना आमचा मुख्य भर राज्यभरातील विद्यार्थ्यांना उच्च दर्जाची शिकवणी आणि सखोल वैयक्तिक मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यावर आहे.”

# एमजीएममध्ये यशराज मुखाटे यांचे संगीत निर्मितीवर विशेष मार्गदर्शन सत्र संपन्न

छत्रपती संभाजीनगर, दि.२ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या स्कूल ऑफ फिल्म आर्ट्सतर्फे व्ही. शांताराम थिएटर येथे ‘संगीत निर्मिती आणि उद्योगातील बदलते प्रवाह’ या विषयावर प्रसिद्ध संगीत निर्माते यशराज मुखाटे यांच्या विशेष मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, सौ.अनुराधाताई कदम, माजी कुलगुरू डॉ.सुधीर गव्हाणे, डॉ.व्ही.एल.धारूरकर, अधिष्ठाता डॉ.रेखा शेळके, विभागप्रमुख डॉ.शिव कदम व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते.

या सत्राचे समन्वयन गायक व संगीतकार साहिल कुलकर्णी



यांनी केले. सत्रादरम्यान मुखाटे यांनी आधुनिक संगीत निर्मितीतील तांत्रिक प्रक्रिया, डिजिटल प्लॅटफॉर्मवरील मार्केटिंगच्या रणनिती तसेच बदलत्या माध्यम परिस्थितीत कलाकारांची भूमिका याविषयी सखोल मार्गदर्शन केले.

कृत्रिम बुद्धिमत्तेसंदर्भात बोलताना यशराज मुखाटे म्हणाले की, कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे सर्जनशील क्षेत्रातील काही नोकऱ्या कमी होऊ शकतात; मात्र सर्जनशील प्रतिभेची गरज कायम राहील. एआयला प्रभावीपणे वापरण्यासाठी आणि त्यातून नवे प्रयोग घडवण्यासाठी सर्जनशील बुद्धिमत्ता अत्यावश्यक आहे.

स्कूल ऑफ फिल्म आर्ट्सच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग

# एमजीएममध्ये उत्साहपूर्ण वातावरणात महाराष्ट्र दिन साजरा

**छत्रपती संभाजीनगर** | महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या ६७ व्या स्थापना दिनानिमित्त महात्मा गांधी मिशन विद्यापीठात महाराष्ट्र दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यापीठाच्या ‘चिंतन गाह’ येथे कुलगुरू प्रा.डॉ.विलास सपकाळ यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. तसेच राष्ट्रगान, राष्ट्रगीत व राज्यगीत सादर करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, विद्यापीठाचे सर्व आधिष्ठाता, संचालक, प्राचार्य, विभागप्रमुख, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी व सर्व संबंधित उपस्थित होते.

यावेळी बोलताना कुलगुरू प्रा.डॉ.विलास सपकाळ म्हणाले, महाराष्ट्र राज्याची स्थापना १ मे १९६० रोजी झाली. आपल्या राज्याच्या निर्मितीसाठी ज्या महान व्यक्तिमत्वांनी आपले योगदान दिले आहे, त्या सर्वांचे आज आपण स्मरण करीत त्यांच्यापासून प्रेरणा घ्यायला हवी. अगदी स्थापनेपासून आपल्या राज्याने प्रत्येक क्षेत्रात प्रगती केलेली आहे. महाराष्ट्र शासनाने नुकतेच आपले आर्टिफिशियल इंटेलिजन्स धोरण जाहीर केले असून



यामध्ये विद्यार्थ्यांसह महिला स्टार्टअप्ससाठी विशेष तरतूद करण्यात आलेली आहे. आज प्रत्येक क्षेत्रात एआय’चा वापर होताना आपण पाहत आहोत.

महाराष्ट्र राज्य हे देशाच्या जीडीपीमध्ये मोठ्या प्रमाणात योगदान देत आहे. महाराष्ट्राच्या प्रगतीमध्ये छत्रपती संभाजीनगर शहर हातभार लावत असून येथील औद्योगिक विकास झपाट्याने होत आहे. शहरात ईव्ही, केमिकल, फार्मसी, फूड प्रोसेसिंग क्षेत्रात मोठी गुंतवणूक होत आहे. या प्रगतीच्या प्रवासात शैक्षणिक संस्थांची भूमिका महत्वपूर्ण आहे. आपल्याला विद्यार्थ्यांना केवळ इंडस्ट्री रेडी आणि फ्यूचर रेडी नाही तर कौशल्याधारित विद्यार्थी तयार करायचे आहे. यासाठी रिसर्च इंटिग्रेटेड एज्युकेशन आणि स्किल ड्रिव्हन टाईम प्रोजेक्ट बेस्ड लर्निंग शिकवत विद्यार्थ्यांना आपल्याला तयार करायचे असल्याचे कुलगुरू प्रा.डॉ.विलास सपकाळ यांनी यावेळी सांगितले.

पुढे बोलताना कुलगुरू प्रा. डॉ.विलास सपकाळ म्हणाले, समकालीन काळामध्ये शाश्वत विकासावर जगभरात मोठ्या प्रमाणावर काम सुरू आहे. उच्च शिक्षणातील सर्वसमावेशक शाश्वतता आणि सामाजिक उत्तरदायित्व हे अत्यंत महत्वाची भूमिका पार पाडत आहेत. एमजीएमच्या माध्यमातून कार्य करीत असताना आपण कायम आपली सामाजिक बांधिलकी जपत नावीन्यपूर्ण उपक्रम राबवित असतोत. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध राहत असताना आपण कौशल्याधारित विद्यार्थी घडविण्याचे काम करीत आहोत.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ.राजू सोनवणे यांनी केले.

## मृदगंध संस्थेच्या कथाकथन कार्यक्रमाला प्रतिसाद

### विविध कथांनी रंगली अविस्मरणीय मैफल



छत्रपती संभाजीनगर : सिडको येथील मृदगंध संस्थेच्या वतीने रविवारी (दि. २६ एप्रिल) सायंकाळी ७ ते १० या वेळेत मृदगंध सभागृहात कथाकथनाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. साहित्यप्रेमींच्या मोठ्या उपस्थितीत हा कार्यक्रम रंगतदार ठरला.

कार्यक्रमाची सुरुवात प्रशांत मानकर यांच्या प्रास्ताविकाने झाली. यावेळी दीप्ती कुलकर्णी यांनी “अदृश्य खुर्ची”, मकरंद गोसावी यांनी “लक्ष्मी”, युसुफ बेन्नुर यांनी प्रा. के. एच. बेन्नुर यांच्या कथासंग्रहातील “नास्तिक” ही कथा सादर केली. तसेच वृषाली चाटोरीकर यांनी “कन्हैया”, हेमलता कुलकर्णी यांनी “तेल” आणि राजन सावरीकर यांनी “वयात आलेला पुरुष” ही कथा प्रभावीपणे मांडली. ज्येष्ठ कलावंत सुधीर कोर्टीकर यांनी “पुष्पलता” ही विनोदी कथा सादर करून श्रोत्यांना खळखळून हसवले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजन सावरीकर यांनी केले. कार्यक्रमाला साहित्यप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

एकेकाळी कथाकथनाचे सुवर्णयुग होते. पु. ल. देशपांडे, व. पु. काळे, शंकर पाटील, द. मा. मिरासदार यांच्या कथाकथनांनी रसिकांना मंत्रमुग्ध केले होते. आज ही कला लोप पावत असल्याच्या पार्श्वभूमीवर मृदगंध संस्थेचे संस्थापक प्रशांत नानकर यांनी कथाकथनाची आवड पुन्हा जोपासण्यासाठी अशा उपक्रमाचे आयोजन केले होते.

## छत्रपती संभाजीनगरमध्ये प्रथमच भिन्न रक्तगटात यशस्वी मूत्रपिंड प्रत्यारोपण

### आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णाला नवे जीवन



तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर, प्रतिनिधी** | शहरातील बीड बायपास परिसरातील ॲडव्हान्स मेडिसिटी हॉस्पिटलमध्ये प्रथमच भिन्न रक्तगट असतानाही यशस्वी मूत्रपिंड प्रत्यारोपण करण्यात आले आहे. या यशस्वी शस्त्रक्रियेमुळे वैद्यकीय क्षेत्रात महत्त्वाची नोंद झाली आहे.

परभणी जिल्ह्यातील मानवत येथील रामा जोंधळे (वय ५०) यांच्यावर ही शस्त्रक्रिया करण्यात आली. त्यांची पत्नी मंदाकिनी जोंधळे (वय ४५) यांनी किडनी दान केली. विशेष म्हणजे दोघांचे रक्तगट भिन्न असतानाही अत्याधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञान, सखोल तपासण्या आणि योग्य नियोजनाच्या मदतीने हे प्रत्यारोपण यशस्वीरीत्या पार पडले.

रुग्णाची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट असल्याने शासकीय योजनांचा लाभ तसेच रुग्णालयाच्या सहकार्यामुळे ही शस्त्रक्रिया शक्य झाली. त्यामुळे रुग्णाला नवजीवन मिळाले असून त्यांचे पुढील आयुष्य अधिक सुलभ होणार असल्याची माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली. या जटिल शस्त्रक्रियेसाठी डॉ. आनंद भुक्तर (किडनी ट्रान्सप्लांट सर्जन), डॉ. सिद्धिविनायक राजमाने (ट्रान्सप्लांट फिजिशियन), डॉ. सुदर्शन चिंचोले (भुलरोगतज्ञ), डॉ. विनोद भुक्तर (अस्थिविकारतज्ञ), डॉ. मनोज भुक्तर (मेंदूविकारतज्ञ), डॉ. अनुजा भुक्तर (नेत्ररोगतज्ञ) आणि डॉ. प्रज्ञा भुक्तर (रेडिओलॉजिस्ट) यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

## पैठणला १२ वी चा निकाल ८७.५६ टक्के.

पैठण दि ०२ :- राज्य उच्य माध्यमिक परीक्षा मंडळाचा निकाल शनिवारी जाहीर झाला असून यात पैठण तालुक्याचा निकाल हा ८७. ५६ टक्के ईतका लागला आहे. शैक्षणिक जीवनात महत्वाचा टप्पा गाठणाऱ्या समस्त नवउत्तीर्ण विद्यार्थ्यांचे आमदार विलास बाप्पू भुमरे यांनी अभिनंदन करून वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. शनिवार दिनांक २ मे रोजी १२ वी चा निकाल जाहीर करण्यात आला. यासाठी पैठण तालुक्यातील ५४१० विध्यार्थ्यांनी परीक्षा फॉर्म भरले होते. त्यातून ५३६६ विध्यार्थ्यांनी परीक्षेत सहभाग घेतला होता. यात ४६९९ विध्यार्थी १२ वी ची परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत. ४३५ मेरिट मध्ये १६५८ प्रथम श्रेणी,२०३२ द्वितीय श्रेणी तर ५७४ पास झाले आहेत. शिक्षण विभागाच्या नवीन नियमानुसार ही परीक्षा प्रथमच सिसिटीव्ही च्या निगराणीत घेण्यात आली होती. नियम कडक असतांना ही परीक्षेत सहभागी विध्यार्थी, विद्यार्थिनी यांनी मेहनतीच्या जोरावर उत्तम यश संपादन केले आहे.

# खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने काटेकोर नियोजन करावे : अब्दुल सत्तार

तभा.वृत्तसेवा
सोयगाव,दि.२ मे

खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी प्रशासनाने काटेकोर नियोजन करावे, असे स्पष्ट निर्देश अब्दुल सत्तार यांनी दिले. सोयगाव येथील पंचायत समितीच्या बचत भवनात त्यांच्या अध्यक्षतेखाली तालुकास्तरीय खरीप हंगाम पूर्व नियोजन व आढावा बैठक पार पडली.

बैठकीत बोलताना त्यांनी सांगितले की, शेतकऱ्यांना बियाणे व खतांचा तुटवडा भासणार नाही यासाठी सूक्ष्म नियोजन करणे अत्यावश्यक आहे. बाजारात चढ्या दराने खत व बियाण्यांची विक्री करणाऱ्या कृषी सेवा केंद्रांवर तसेच बोगस साहित्य विकणाऱ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी विशेष पथके स्थापन करून कडक कारवाई करावी. पात्र शेतकऱ्यांना निर्धारित वेळेत पीक कर्ज



उपलब्ध करून देऊन कोणत्याही प्रकारची अडवणूक किंवा पिळवणूक होणार नाही, याची प्रशासनाने गांभीर्याने दक्षता घ्यावी, असेही त्यांनी नमूद केले.

या बैठकीस उपविभागीय अधिकारी लतीफ पठाण, नायब तहसीलदार संभाजी देशमुख, प्रभारी गटविकास अधिकारी संतोष भालेराव, शिवसेना उपजिल्हाप्रमुख प्रभाकर आबा काळे, कृउबा समितीचे संचालक दारासिंग चव्हाण, शहरप्रमुख संतोष बोडखे, गटनेते अक्षय काळे, कुणाल राजपूत, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता अजय टाकसाळे, जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे उपअभियंता दिलीप फुलारी, सिंचन विभागाच्या उपअभियंता रुचिता घोगरे, तालुका कृषी अधिकारी भारत कासार, जलसंधारण अधिकारी सूर्यकांत निकम, पाणीपुरवठा विभागाचे उपअभियंता विजय वाघ यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.पुढे बोलताना आमदार सत्तार यांनी अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शासकीय मदतीपासून वंचित शेतकऱ्यांना तातडीने अनुदान मिळावे यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. मुख्यमंत्री बळीराजा शेत पानंद रस्ते योजनेअंतर्गत कामे तात्काळ मार्गी लावावीत, पाणीटंचाई निवारणासाठी निविदा प्रक्रिया जलदगतीने पूर्ण करून आवश्यक त्या ठिकाणी विहीर अधिग्रहण करून पाणीपुरवठा सुरळीत करावा, असे त्यांनी सांगितले.

### जाहीर प्रगटन
**मा. श्री. एम. बी. पाटील साहेब, दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, सोयगाव यांचे न्यायालयात.**

दि.क्रि.अर्ज.क्रं. ३६/२०२६ पुढील तारीख ०८/०५/२०२६

अर्जदार : १) आण्णा पि. दगा बकले (गढरी), वय ४८ वर्षे, धंदा- मजुरी, रा. बदरखे, ता. पाचोरा जि. जळगांव. ह.मु. रामवाडी, पिसवली रोड, कल्याण पुर्व, ता. व जि. ठाणे, २) भोला पि. दगा गढरी, वय ४४ वर्षे, धंदा- मजुरी, रा. बदरखे, ता. पाचोरा जि. जळगांव. ३) वंदना भ्र. बापू गढरी, वय- ५१ वर्षे, धंदा- घरकाम, रा. बदरखे, ता. पाचोरा जि. जळगांव.

विरुद्ध

गैरअर्जदार :- निरंक

अर्ज :- बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार क्र. १ ते ३ यांनी त्यांचे विधीज्ञ एस. एन. उपासणी यांचे मार्फत मा. न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळविण्याकरीत अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क्र. १ व २ हे मयत दगा शंकर गढरी व सुभद्राबाई भ्र. दगा गढरी यांचे मुले असून अर्जदार क्र. ३ ही मयतांची विवाहित मुलगी आहे. अर्जदार क्रं. १ ते ३ हे आपसात सख्खे भाऊ बहिण असून अर्जदार क्र. १ ते ३ हे मयत दगा शंकर गढरी व सुभद्राबाई भ्र. दगा गढरी यांचे कायदेशीर वारस आहे. अर्जदार क्र. १ ते ३ यांचे वडील नामे दगा शंकर गढरी व आई सुभद्राबाई भ्र. दगा गढरी हे दोन्ही दि. २४/०५/२०२४ रोजी मौजे मोहळाई येथे अकास्मित मरण पावले आहे. सोबत मयत दगा शंकर गढरी व सुभद्राबाई भ्र. दगा गढरी यांचे ग्रामपंचायत मोहळाई ता. सोयगाव यांनी दिलेले मृत्यू प्रमाणपत्र दाखल केले आहे. अर्जदार क्र. १ ते ३ यांना मयत दगा शंकर गढरी व सुभद्राबाई भ्र. दगा गढरी यांच्या मृत्यू पश्चात तहसिल कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय, उप-अधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय, गाव, नगर व शहर भूमापन कार्यालय, तलाठी कार्यालय, गट विकास अधिकारी कार्यालय व इतर शासकिय व निमशासकिय कार्यालय मध्ये आवश्यक ते कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदार क्रं. १ ते ३ हे मयताचे वारस असल्याबाबत कायदेशीर वारस प्रमाणपत्राची मागणी करीत आहे. सदरील अर्जास मौजे मोहळाई ता. सोयगाव येथे दिनांक ३०/१०/२०२५ रोजी कारण घडले आहे.

त्याअर्थी सदरील जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस सुचीत करण्यात येते की, सदरील प्रकरणाबाबत कोणाचाही काही उजर, अक्षेप अथवा वारस प्रमाणपत्र अर्जदाराला देण्याचा कोणाचीही काही हरकत असल्यास सदरील जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत स्वतः अगर आपले विधीज्ञामार्फत हजर होवुन उजर, आक्षेप नोंदवावा व मुदतीत उजर, आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या हक्कात वारस प्रमाणपत्र देण्याचे आदेश पारीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सबब हे जाहीर प्रगटन. दिनांक २/०५/२०२६

अदिशावरुन

क. लिपीक सहाय्यक अधिक्षक सायगाव

### जाहिर प्रगटन
**मा.दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. ८५/२०२६.

१. सुशीला विठ्ठल बारी, वय ८० वर्षे, धंदा घरकाम रा. शेदुर्णी, ता. जामनेर, जि. जळगांव, २. शोभा अशोक आगे, वय ४४ वर्षे, धंदा घरकाम, रा. सोयगांव, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर ३. सुनिता एकनाथ बारी, वय ३८ वर्षे, धंदा घरकाम रा. पहुर, ता. जामनेर, जि. जळगांव, ४. कल्पना संतोष बारी, वय ३५ वर्षे, धंदा घरकाम रा. शेदुर्णी, ता. जामनेर, जि. जळगांव, ५. पुजा बाळु बारी, वय ३४ वर्षे, धंदा घरकाम रा. जळगांव ता जि. जळगांव,

विरुद्ध

कोणीही नाही

प्रकरण :- वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. शुभम अ. आगे सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत विठ्ठल कचरु बारी यांचा दिनांक ०९/१०/२०२५ रोजी शेंदुर्णी ता. जामने येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्यात वरील अर्जदार हेच वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार हे मयत अशोक सुपडु घनघाव यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार व गैरअर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दिनांक २९/०४/२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु.ता. १७/०६/२०२६

आदेशावरुन

विभीगीय लिपीक सहायक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव

### जाहिर प्रगटन
**मा.दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. ८६/२०२६.

१. शोभाबाई अशोक घनघाव, वय ५७ वर्षे, धंदा शेती, रा. सोयगांव, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर २. गोपीनाथ अशोक घनघाव, वय ३४ वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे. ३. रुखाबाई सुपडु घनघाव, वय ८५ वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे.

विरुद्ध

कोणीही नाही

प्रकरण :- वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. शुभम अ. आगे सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत अशोक सुपडु घनघाव यांचा दिनांक १४/१२/२०२५ रोजी सोयगांव, ता. सोयगांव येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्यात वरील अर्जदार हेच वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार हे मयत अशोक सुपडु घनघाव यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार व गैरअर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दिनांक २९/०४/२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु.ता. १७/०६/२०२६

आदेशावरुन

विभीगीय लिपीक सहायक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव

### जाहिर प्रगटन
**मा.दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. ७८/२०२६.

१. सुमित्राबाई पांडुरंग पाटील, वय ७५ वर्षे, धंदा घरकाम, रा. आमखेडा, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर २. संजय पांडुरंग पाटील, वय ५२ वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे. ३. सुनिल पांडुरंग पाटील, वय ५१ वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे. ४. रविंद्र पांडुरंग पाटील, वय ४८ वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे.

विरुद्ध

कोणीही नाही

प्रकरण :- वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. शुभम अ. आगे सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत पांडुरंग फकिरा पाटील यांचा दिनांक २४/०२/२०२६ रोजी आमखेडा, ता. सोयगांव येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्यात वरील अर्जदार हेच वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार है मयत पांडुरंग फकिरा पाटील यांचे वारस असुन त्यांना शासकिय/ निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार व गैरअर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दिनांक २९/०४/२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु.ता. १२/०६/२०२६

आदेशावरुन

विभीगीय लिपीक सहायक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव